# TOTAL DAMAGE BOOK

UNIVERSAL LIBRARY
OU_196035
UNIVERSAL LIBRARY

महाराष्ट्र थि. फेडरेशनची लघुपुस्तकमाला नं. ७.

# धर्मांचे मूलसिद्धांत.

लेखक
मिसेस् ॲनी बेझंट,
प्रेसिडेंट थिऑसॉफिकल सोसायटी.

१९१६.

किंमत ६ आणे.

# यक्षाज्ञा.

लेखक—लक्ष्मण नारायण जोशी.

प्रसिद्ध ग्रिश्यन तत्त्ववेत्ता **सॉक्रेटिस** याच्या चरित्रावर हें सतरा प्रकरणांचें कथानक लिहिलेलें असून, त्यांत तात्विक विचारांनीं उत्तम तऱ्हेचें मनोरंजन कसें होतें व हरघडी संसारचक्रांत येणाऱ्या अनेक प्रसंगांशीं शांत व धिमेपणानें तोंड देऊन, कजाग स्त्रिया, खरे व स्वार्थसाधु मित्र यांचे स्वभाव, उच्च मान मिळविण्याची आकांक्षा धरणाऱ्यांची तात्विक विवेचनानें झालेली फजिती, मुग्ध परंतु अनुपमेय असा विप्रलंभश्रृंगार, असत्याची ऊरफोड, सत्याचें सोदाहरण निरूपण, राजकर्त्या कुटिल अधिकाऱ्यांच्या कुटिल कृत्यावर निर्भयतेनें केलेली प्रशंसनीय टीका, हलाहलप्राशनसमयीं मृत्यूसंबंधानें केलेलें स्पष्टीकरण, निंदेची स्तुतीनें झालेली कंबरमोड, भूमीवरील व स्वर्गांतील कायद्यांचा नात्याचा संबंध, स्वराज्यांतील तरुण पिढीचा बापपणा, मनोरथ यक्षाची वेळोवेळीं मिळालेली आज्ञा व तदनुरूप वर्तनानें झालेली महती, धनाचा धिःकार व दारिद्र्यावरचें उत्कट सकारण प्रेम वगैरे वगैरे गोष्टींचें या पुस्तकांत मोठ्या खुबीदार अशा तात्विक भाषणानें मुद्देसूद विशदीकरण केलेलें आहे. या तऱ्हेचें पुस्तक, सध्यांच्या भाषावर्धनाच्या धिंगाण्यांत, हें एकच आहे. हा महिनाअखेर छापून तयार होईल. सप्टेंबर १९१६ अखेरपर्यंत हे पुस्तक ट. हं. सह १२ आण्यांत मिळेल. पुढें किंमत जास्त.

**फुटका कान**—डॉक्टर, वैद्य, वगैरेनीं हात टेकल्यावर आमचें औषध घ्या. सात दिवसांत हटकून गुणाची ग्यारंटी. अनुमानपत्र सोबत. बाटली किं. रु. २. व्ही. पी. रु. २ आणे ४.

म्यानेजर—महाराष्ट्र ग्रंथालय,

बुधवार चौक, पुणें.

महाराष्ट्र थिऑसॉफिकल फेडरेशनची लघुपुस्तकमाला नं. ७

# धर्माचे मूलसिद्धांत.

लेखक
मिसेस् ॲनी बेझंट,
प्रेसिडेंट, थिऑसॉफिकल सोसायटी.

पुणें येथें
आर्यभूषण छापखान्यांत अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें व
हरि केशव पटवर्धन, बी. ए. एल्एल्. बी., वकील,
अहमदनगर, यानीं पुणें येथें प्रसिद्ध केलें.

१९१६.

किंमत ६ आणे.

# प्रकाशकांचे दोन शब्द.

इ. स. १९१५ सालची थिऑसॉफिकल सोसायटीची सर्व देशांची वार्षिक परिषद् मुंबई येथें भरली होती. त्या वेळीं थिऑसॉफिकल सोसायटीच्या अध्यक्ष **मिसेस बेझंट** यांचीं गांवदेवी येथें उभारलेल्या भव्य मंडपांत मोठ्या प्रचण्ड जनसमूहापुढें जीं चार व्याख्यानें झालीं त्यांचे विस्तृत रिपोर्ट या छोट्या पुस्तकांत ग्रथित करून महाराष्ट्र वाचकांसमोर ठेविले आहेत. श्रोत्यांस जशीं व्याख्यानें बोधप्रद व स्फूर्तिदायक वाटलीं तशींच तीं सर्व वाचकांसही वाटतील अशी आशा आहे. हीं चार व्याख्यानें स्वतंत्र नसून त्या सर्वांत एकच सूत्र आहे व धर्मांतील महत्वाचे सिद्धांत त्यांत सोप्या भाषेंत विशद केले आहेत हें वाचकांच्या सहज ध्यानांत येईल. विचार जुनेच आहेत पण ते अलीकडच्या काळांत पटतील अशा पद्धतीनें मांडिलेले आहेत. धर्माविषयीं अधिकारानें बोलूं शकणारीं जीं आज जगप्रसिद्ध माणसें हयात आहेत त्यांमध्यें आंतरानुभव, विद्वत्ता, जुने विचार नव्या रीतीनें मांडण्याचें कौशल्य, इत्यादि बाबतींत **मिसेस् बेझंट** यांस बरेंच वरचें स्थान देण्यांत येतें हें सर्वांविश्रुत आहे. अशा माणसांच्या जिवंत वाणीनें धर्माच्या सिद्धांतांचें आकलन करण्यास वाचकांस सहाय्य होतें; तसेंच विचार करण्यासही स्फूर्ति येते हें लक्षांत घेऊन, हीं व्याख्यानें "**धर्मजागृति**" मासिकांत एकदां प्रसिद्ध झालेलीं असूनही त्यांस कायमचें स्वरूप यावें म्हणून पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्यांत येत आहेत.

व्याख्यानाचे रिपोर्ट घेण्यास लघुलेखक न मिळाल्यामुळें साध्या रिपोर्टरानें घेतलेल्या टिपणांवरून हे रिपोर्ट लिहिण्यांत आले आहेत व तेही कार्यबाहुल्यामुळें त्यास ताबडतोब लिहितां आलेले नाहींत. कांहीं रिपोर्ट तर कित्येक महिन्यांनंतर लिहावे लागले आहेत. अशा स्थितींत त्यांत बारिक सारिक चुका राहाण्याचा संभव आहे. अर्थात् या रिपोर्टांची जबाबदारी **मिसेस् बेझंट** यांचेवर नाहीं, हें उघड आहे; पण शक्य तितकी काळजी घेऊन हे रिपोर्ट लिहिण्यांत आलेले आहेत व त्यांत बहुतकरून कोणतीही ढोबळ चूक झालेली नाहीं असा भरंवसा रिपोर्टरास वाटत आहे. "**धर्मजागृतीं**"त तीन व्याख्यानें प्रसिद्ध झाल्यानंतर तीं इंग्रजींत **मिसेस् बेझंट** यांनीं पुस्तकरूपानें प्रसिद्ध केलीं. त्यामुळें प्रकृत रिपोर्टांस चवथ्या व्याख्यानांतच काय तो किंचित् फेरफार करतां आला. पण मूळ पुस्तकाशीं ताडून पाहिल्यास हे रिपोर्ट बहुतांशीं मूळाबरोबर उतरले आहेत हें कोणाच्याही लक्षांत येईल.

**सेक्रेटरी,**
महाराष्ट्र थिऑसॉफिकल फेडरेशन.

# अनुक्रमणिका.


| विषय | पृष्ठ. |
|---|---|
| १. ईश्वर ... ... ... .... ... | १ |
| २. मनुष्य .... ... ... ... ... | १७ |
| ३. नीति आणि अनीति ... ... ... ... | ३५ |
| ४. बंधुत्व .... ... .... ... ... | ५२ |

# ईश्वर.

—:०:—

मित्रहो, हा आठवडा राष्ट्रीय चळवळींचा आठवडा होय. या आठवड्यांत मुंबई शहर अनेक चळवळींनीं गजबजलेलें आहे. व्यापार, उद्योगधंदे, राजकारण इत्यादि राष्ट्रहितांच्या अनेक परिषदांच्या गडबडींमध्यें थिऑसॉफिकल सोसायटीच्या माणसांनीं आपणांस शाश्वत गोष्टींचा विचार करण्यास सांप्रत निमंत्रिलें आहे. दोन दिवस टिकणाऱ्या गोष्टींचे विचार क्षणभर बाजूस ठेवून ज्या विषयांचें महत्त्व मनुष्यजातीस सदैव वाटत रहाणारें आहे, अशा विषयांची चर्चा करण्याचा आमचा संकल्प असल्यामुळें, जे प्रश्न मनुष्याच्या मनासमोर नेहमींच उभे असतात त्याच प्रश्नांचा ऊहापोह या व्याख्यानमालेंत मी करणार आहें. ईश्वर म्हणजे कोण, त्याचे विषयींचें यथार्थ मत कोणतें, ईश्वराचें स्वरूप काय आहे हा विषय मीं आजच्या व्याख्यानांत चर्चेस घेतला असून, उद्यां मनुष्य व त्याचा सृष्टीशीं संबंध या विषयाचा विचार करीन. मनुष्याचा सृष्टीशीं संबंध कोणत्या प्रकारचा आहे याचें विवेचन करतांना त्याचें कर्तव्य काय, त्याची वागणूक कशी असावी, नीति म्हणजे काय, अनीति म्हणजे काय, जगांत जीं नानाप्रकारचीं कर्मे माणसांस करावयाचीं असतात, त्या सर्वांस लागू पडेल अशी नीति व अनीति यांचा भेद दर्शविणारी कसोटी मिळणें शक्य आहे किंवा कसें इत्यादि अनेक प्रश्न उत्पन्न होतात. त्यांचा विचार पुढें परवांच्या व्याख्यानांत करण्याचें योजिलें आहे. व सरतेशेवटीं मनुष्यांचें परस्परांशीं नातें कसें असावें, बंधुत्व म्हणजे काय, बंधुत्वाच्या दृष्टीनें मनुष्यावर कोणकोणत्या कर्तव्याची जबाबदारी येऊन पडते, इत्यादिक गोष्टींचा ऊहापोह करून प्रस्तुत व्याख्यानमालेचा समारोप करण्याचा माझा मनोदय आहे. हे सर्व विषय गहन असून ते सबंध उत्क्रान्तिमार्गांत नेहेमींच मानवजातीसमोर दत्त म्हणून उभे असतात, व जगाच्या धुमश्चक्रींत जर मनुष्यास शान्ति हवी असेल तर हे सर्व विषय समाधानकारक रीतीनें समजून घेणें भाग आहे. बाह्य घडामोडींत शान्ति नाहीं, शान्तीचा उगम अंतरंगांतील नित्य वस्तूंत आहे, व त्या नित्यवस्तूच्या अभेद्य खडकावर जोंपर्यंत मनुष्याचें पाऊल स्थिर झालें नाहीं तोंवर शत्रु,

मित्र व उदासीन यांनीं चोहों बाजूंनीं उत्पन्न केलेल्या वाळवंटांत माणसास शांत रहाणें शक्य नाहीं. या सर्व गहन प्रमेयांची जेव्हां अंतरंगांत प्रचीति येईल तेव्हांच रागद्वेष, आवडनावड, हित अहित इत्यादिक गोष्टींनीं मनुष्याचें मन विकार पावेनासें होतें, व त्यास स्वतःकरितां जगतापासून मिळविण्याचें कांहींच शिल्लक रहात नाहीं. ईश्वरानें उत्पन्न केलेल्या सृष्टिचक्रास सतत चलन देण्याचे कामीं ईश्वराचा हस्तक बनणें इतकाच काय तो विचार तेव्हां त्याच्या मनांत राहिलेला असतो, व त्यामुळें कोणत्याही विकारांनीं त्याचें चित्त क्षुब्ध होईनासें होतें. फक्त अशा स्थितींतच मनुष्यास कर्म कोणतें व अकर्म कोणतें हें चांगल्या रीतीनें समजणें शक्य आहे, व या पदवीस पोंचलेले पुरुषच उत्तम कार्यें उत्तम तऱ्हेनें करण्यास समर्थ झालेले असतात. प्रकृतीचे जे तीन गुण, त्यांच्यापलीकडे गेल्यामुळें त्या पुरुषांस सृष्टि मार्गभ्रष्ट करूं शकत नाहीं. इतकेंच नव्हे, तर हे पुरुष प्रकृतीच्या गुणांचा उपयोग ईश्वर-कार्यास पोषक होईल अशा प्रकारच्या योजना घडवून आणितात, व त्यामुळें चांगल्या-वाईट गोष्टींचा व मानवी विकारांचा उपयोगही त्या कार्याच्या सिद्धीकडेसच केला जातो. मनुष्याची सर्व प्रकारें उत्क्रान्ति व्हावी असें ईश्वरी सूत्र असल्यामुळें या उच्च पदवीप्रत आलेले पुरुष ईश्वरकार्यास हात-भार लावीत असतात, व त्यामुळें मानवी प्रगति शक्य होते. त्यांस ईश्वराचा साक्षात्कार झालेला असतो; त्यांचा जीवात्मा परमात्म्याशीं एकरूप झालेला असतो; जगांत एकच ज्ञान आहे, एकच कर्म आहे व एकच इच्छा आहे, ईश्वराच्या ज्ञानाशिवाय, कर्माशिवाय व इच्छेशिवाय जगांत दुसरें कांहींच नाहीं, असा त्यांस प्रत्यय आलेला असतो. अर्थात् ईश्वरी संकेताप्रमाणें सर्व गोष्टी घडवून आणण्याखेरीज त्यांच्या मनांत दुसरा कांहींच विचार येत नाहीं. व त्यामुळेंच जगांत ईश्वराचें कार्य करण्याच्या कामीं ते अत्यंत कुशल झालेले असतात. तेव्हां या व्याख्यानमालेंतील चर्चा जरी नित्य व अनादि गोष्टींसंबंधानें असली तरी, मानवी व्यवहाराशीं तिचा निकट संबंध आहे, हें उघड आहे.

हें ज्ञान जगाच्या व्यवहाराचें मूळ आहे, व तो व्यवहार जर आपणांस उत्तम प्रकारें करावयाचा असेल-सर्वांशीं समबुद्धि ठेवून, व बाह्य गोष्टींनीं विकारवश न होतां अंतरंगदृष्टीनें जर आपणांस जगांत कर्म करावयाचें असेल तर हें ज्ञान आपणास संपादन करून घेतलें पाहिजे. हाच हेतु मनांत

धरून मी हे विषय आपणासमोर मांडणार आहें. तर मग आपण आजच्या विषयाकडे वळून ज्या ईश्वराचें जीवन सर्वत्र सृष्टींत संचरलेलें आहे, त्याचें अस्तित्व, त्याचा स्वभाव व त्याचेविषयींच्या मनुष्याच्या कल्पना इत्यादिकां-विषयीं विचार करूं या.

## विचार व कृति.

पुष्कळ सुशिक्षित व विचारी माणसांस सांप्रत असें वाटत आहे कीं, असल्या विषयांवरील विचारांस महत्व नाहीं. ते म्हणतात कीं, जोंपर्यंत मनुष्याचा आचार चांगला आहे तोंपर्यंत त्याचे विचार कसेही असले तरी हरकत नाहीं. विचार कांहींही असोत मनुष्याचें वर्तन नीतीस धरून असलें म्हणजे झालें. हें विधान सर्वांशीं खरें नाहीं. युरोपांतील मध्ययुगांत लोक असें म्हणत कीं, माणसाची श्रद्धा धर्मग्रंथावर असली पाहिजे—त्यांचीं मतें ग्रंथांस धरून असावयास पाहिजेत, मग आचार कसाही असला तरी फिकीर नाहीं. या जुन्या समजुतीची प्रतिक्रिया होऊन आजची समजूत उत्पन्न झाली आहे, व तसें होणें स्वाभाविकही आहे. पण ही समजूत बरोबर नाहीं. हिंदुस्थानांत पुष्कळ लोक असे आहेत कीं, त्यांच्या मतें अमुक अमुक जुन्या मतांवर विश्वास असणें हें अत्यंत महत्वाचें समजण्यांत येतें व ते व्यवहारांतील वर्तनास फारशी किंमत देत नाहींत. असें असल्यामुळें जुन्या धर्ममतांचे अभिमानी पण वर्तनानें ऐहिक गोष्टींत गढलेले, व कित्येक तर नीतिदृष्ट्या त्याहूनही कमी दर्जाचे असे पुष्कळ लोक हिंदुस्थानांत दिसून येतात. शंभर वर्षांमागें धर्मग्रंथावर विश्वास नसणाऱ्या माणसांचे हाल होत. युरोपांत रोमन क्याथलिक लोकांनीं या लोकांस प्रथम जिवंत जाळावें, तुरुंगांत घालावें, असे प्रकार केले. पुढें या छळाची तीव्रता कमी होऊन पाखंडमताच्या लोकांवर बहिष्कार घालण्यांत येई व कायद्याच्या दृष्टीनें त्यांस हक्कही कमी असत. इंग्लंडांत हळुहळू हे प्रकार नाहींसे झाले. ज्या समजुतीमुळें धर्मग्रंथांवर श्रद्धा न ठेवणाऱ्यांवर अशा प्रकारचा जुलूम झाला होता, त्या समजुतीची पुढें हकालपट्टी झाली व जनतेच्या विचारांत प्रतिक्रिया होऊन, ग्रंथावर श्रद्धा असो वा नसो, विचार कसेही असोत—माणूस व्यवहारांत भलेपणानें वागणारा असला म्हणजे त्यांत सर्व आलें, हें विरुद्ध मत प्रचलित झालें. मनुष्याच्या विचारांत त्याच्या आचाराचें मूळ असतें ही गोष्ट या नवीन मताच्या लोकांच्या स्मरणांतून गेली आहे. वर्तन केव्हांही स्वतंत्र असत

नाहीं, विचारावर अवलंबून असतें. ‘ श्रद्धामयोयं पुरुषः यो यच्छ्रद्धः स एव सः ’ असें गीतेंत भगवंतांनीं म्हटलें आहे.

## विचारस्वातंत्र्य.

विचार महत्वाचे असतात, माणसाची श्रद्धा ज्या प्रकारची असेल त्या प्रकारची कृति त्याचे हातून घडते हें खरें. पण ही श्रद्धा किंवा हे विचार माणसाचे स्वतःचे असले पाहिजेत हें लक्षांत ठेविलें पाहिजे. जेव्हां विचार स्वतःचे असतील तेव्हां ते कृतींत उतरतील. म्हणून स्वतः विचार करून ठाम ठरविलेलें मत व जनरूढि म्हणून स्वीकृत केलेलें मत यांमध्यें भेद केला पाहिजे. इतर लोक सांगतात म्हणून, ग्रंथांत लिहिलें आहे म्हणून, अमक्या ऋषीची आज्ञा आहे म्हणून किंवा लोकांत प्रचलित आहे म्हणून, एखाद्या मतावर, जर आपण श्रद्धा ठेविली असेल तर ती वर्तनावर परिणाम घडवीत नाहीं. दुसऱ्याच्या विचारावर अवलंबून राहिल्यास त्या विचारांत कृतीचा जन्म होत नाहीं. ज्या विचारांनीं स्वतःच्या मनाची खात्री झालेली असते तेच विचार कृतींत उतरतात. यासाठीं माणसानें आपले विचार उसने न घेतां स्वतः तावूनसुलाखून घेतले पाहिजेत. अशा तऱ्हेचे स्वतःस पटलेले विचार जितके जितके उच्च होतील, तितकी वर्तणूक श्रेष्ठ होते, कृति निर्मळ होते, व दंभ नाहींसा झाल्यामुळें मनुष्याचें चरित्र अधिक योग्यतेचें होतें. दुसऱ्याच्या विचाराची पोपटपंची करून अनुवाद करणें निरुपयोगी आहे, इतकेंच नव्हे, तर अनर्थावहही आहे. विचार करण्यास भिऊं नका, कोणत्याही मताची परीक्षा करणें, व खात्री न झाल्यास संशय घेणें हीं चांगलीं लक्षणें आहेत. संशय ही सत्यसिद्धांताच्या अलीकडची पायरी आहे. ईश्वर वगैरे श्रेष्ठ श्रेष्ठ विषयांचा स्वतंत्रपणें विचार करणें म्हणजे पाखंडपणा आहे असें मुळींच समजूं नका. ज्या माणसाच्या मनांत संशय येत नाहीं तो खरोखरी विचारच करीत नाहीं. स्वतंत्र विचारांनीं कधीं कधीं विश्वास उडतो हें खरें. पण या अविश्वासांतूनच पुढें खरी श्रद्धा उदय पावते. विचार तुम्हांस अमुक एका मर्यादेच्या पलीकडे नेऊं शकत नाहींत, पण विचारांनीं जितकें पुढें जातां येतें, तितकें जावयास पाहिजे. बुद्धिसर्वस्व खर्च करून व अत्यंत काळजीनें विचार करावे, ते विचार यथार्थ असावे, लोक सुधारक म्हणूं लागले तर त्याची पर्वा करूं नये. विचारानें मनाचा विकास होतो व आपल्या चुकांपासूनही आपण शहाणपणा शिकतों. तेव्हां सत्यावर

विश्वास ठेवून निःशंकपणें विचार करावा. खऱ्या दिलानें सत्य शोधणारीं माणसें सरशेवटीं सत्यापाशीं येतात. सद्बुद्धीनें सत्याच्या पाठीस लागलेल्या मनुष्यास कांहीं काळपर्यंत रखरखीत अशा निर्जल अरण्यांतून मार्ग काढावा लागेल, नाहीं असें नाहीं. पण अमळ दम धरून पुढें गेल्यास तोच मार्ग त्यास पुष्पफळभारानें नमलेल्या वृक्षवाटिकेंत नेईल व तेथें सत्याच्या जीवनानें त्याची तृषा हरेल याची शंका नको. यास स्वत: मी साक्ष आहें. सत्यान्वेषणार्थ मीं आप्त इष्ट, लोकसमाज, धर्म इत्यादिकांवर तुलसीपत्र ठेविलें; व सत्यानें माझी प्रतारणा केली नाहीं.

## दोन मार्ग.

ईश्वर शोधण्याचे मार्ग दोन आहेत. एक बुद्धीचा मार्ग व दुसरा आत्म—अनुभवाचा मार्ग. बुद्धीचा मार्ग म्हणजे तत्त्वविचाराचा मार्ग होय. या मार्गानें गेल्यास मनुष्य अज्ञानांतून बाहेर निघतो व त्याच्या वेड्या समजुती नाहींशा होतात. हा मार्ग चांगला असून विचारी माणसानें धरण्यालायक आहे. तो तुमची बुद्धि कुशाग्र करून ईश्वरसंशोधनांत तुम्हांस पुष्कळच पुढें नेईल. पण या मार्गानें जातांना इतकें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, ही वाट एका विवक्षित मर्यादेपलीकडे माणसास नेऊं शकत नाहीं. कारण ईश्वरप्राप्तीचा मार्ग हा बुद्धीचा मार्ग नव्हे. ईश्वरप्राप्तिसाठीं इंद्रियांचा निग्रह करावा लागतो, मन ताब्यांत आणावें लागतें. इंद्रियें व मन हीं प्रशान्त झालीं म्हणजे ईश्वराचें दर्शन होतें. Knowledge of God — ईश्वराचें ज्ञान, हें निरंतर अमृतत्व देणारें — Eternal Life आहे असें जें म्हटलें आहे[1] तें या साक्षात्कारास अनुलक्षून म्हटलें आहे. तत्त्वविचारांचा तिरस्कार करण्याचें कारण नाहीं, पण हृत्कमलावरील किल्मिष धुवून निघाल्याशिवाय ईश्वरप्राप्ति होत नाहीं हें ध्यानांत असूं द्यावें. विवेचक शक्तीनें शोधून ईश्वर सांपडणार नाहीं, इतकेंच नव्हे, तर नुसत्या भक्तीनेंही त्याचा शोध लागावयाचा नाहीं. स्वतःच्या अंतरंगांत शिरावें तेव्हांच तो हातीं लागेल. इंद्रियें म्हणजे "मी" नव्हे असें इंद्रियांस सांगा. मन म्हणजे 'मी' नव्हे असें मनास सांगा. बुद्धि म्हणजे "मी" नव्हे असें बुद्धीस सांगा. अशा रीतीनें

---

१ John XVII, ३ टिपांत दिलेले आधार रिपोर्टरानें व्याख्यानाच्या अनुरोधानें यथामति शोधून नमूद केलेले आहेत. अर्थात् त्यांची जबाबदारी रिपोर्टराचीच आहे.

क्रमानें चला, म्हणजे इंद्रियें स्तब्ध होतील, मन निश्चल होईल, व कांहीं बोलणार नाहीं, वासनांचा शब्द ऐकूं येईनासा होईल. या मार्गानें हृदय-गव्हरांत शिरून सर्वत्र बाह्य उपाधींचें सामसूम झालें म्हणजे, अंतरात्म्याची भेट होईल व तो अंतरात्मा किंवा जीवात्मा म्हणजेच ईश्वर किंवा परमात्मा होय अशी प्रचीति येईल. हा ईश्वरप्राप्तीचा मार्ग कठीण आहे. स्वार्थास तिलांजली देऊन व सेवाधर्माचा अंगिकार करून जेव्हां अनेक जन्म कंठावे तेव्हांच या मार्गावर ईश्वराची भेट होते. पण एकदां हा साक्षात्कार झाला म्हणजे पुनः संशय उत्पन्न होत नाहीं, हा या मार्गातील विशेष आहे. युक्ति-वादानें ईश्वराचें अस्तित्व सिद्ध केल्यास सर्व संशय फिटत नाहींत; व एकदां जरी संशय फिटले, तरी जसजशीं या विषयासंबंधाचीं नवीन प्रमाणें पुढें येतील, तसतसे नवीन संशय उत्पन्न होण्यास अवकाश रहातो. पण अंतरं-गांत ईश्वर सांपडल्यावर मन केव्हांही उलट खात नाहीं. या स्वानुभवापुढें कोणत्याही संशयाची मात्रा चालत नाहीं. तो अनुभव आल्यावर सर्व संशय छिन्न होऊन हृदयांतील गांठ कायमची सुटते, व अंतरंगांतील ईश्वर ओळख-ल्यानंतर सृष्टींत सभोंवार भरून राहिलेल्या ईश्वराचीही तात्काळ ओळख पटते. सृष्टींतील ईश्वर पहावयाचा असल्यास प्रथम अंतरंगांतील ईश्वराची प्राप्ति करून घ्यावयास पाहिजे. अशा रीतीनें सबाह्याभ्यंतर—ईश्वर भरलेला दिसला म्हणजे शाश्वत शान्तीचा लाभ होतो.

## हिब्रू लोकांची प्राचीन कल्पना.

ईश्वराविषयीं मनुष्याच्या ज्या अनेक कल्पना आहेत, त्या सर्वांत थोडें-बहुत तथ्य आहे. त्या कल्पना सर्वांशीं खऱ्या नाहींत, पण त्या सर्वथा चुकीच्या आहेत असें जें आपणास वाटतें तेंही बरोबर नाहीं. कोणतेंही सर्वतोपरी चुकीचें असलेलें मत मनुष्यजातीवर चिरकाल छाप बसवूं शकत नाहीं. खोट्या विचारांनीं बहुत काळपर्यंत जनतेवर पगडा बसविल्याचीं उदाहरणें उपलब्ध आहेत, नाहीं असें नाहीं. पण मनुष्याच्या मनास वेधून धरण्याची शक्ति या खोट्या मतांत जें सत्याचें मिश्रण असतें, त्याची असते हें लक्षांत ठेविलें पाहिजे. लोकांत फार वेळपर्यंत प्रचलित राहिलेल्या चुकी-च्या विचारांत नेहेमीं सत्याचा अंश असतो व हा सत्याचा अंश त्या मतास पोषक झाल्यामुळें त्या विचारांस मनुष्याच्या मनावर पगडा बसविण्याची शक्ति येते. या सत्याच्या अंशामुळेंच खोट्या मताचें निर्मूलन करणें दुष्कर

होतें. त्या मतांतील जेव्हां खरें खोटें वेगळें निवडून काढावें तेव्हांच तें आपणास धड समजतें. अशी निवड करून जेव्हां खोट्या मतांतील सत्य आपण कबूल करूं तेव्हां त्या मताच्या अनुयायांस त्यांतील चुका समजून देतां येतील व मग त्याचें निर्मूलनही सहज करितां येईल. प्राचीन काळाचा विचार केला तर तेव्हां जगतांत अनेक देव आहेत हें मत सार्वत्रिक होतें, असें दिसून येतें. बायबलामधील जो यहुदी लोकांचा पूर्वार्ध आहे—ज्यास आपण जुना करार म्हणतों—त्यांतील ईश्वराची कल्पना अगदीं आकुंचित आहे. जुन्या करारांतील देवाचें ज्ञान व सामर्थ्य हीं मर्यादित आहेत, तो बागेंत हिंडत होता व ॲडम् नांवाच्या आद्यमानवास "तूं कोठें आहेस" अशी त्यानें हांक मारिली, असें वर्णन आहे.[१] पूर्वीच्या काळीं मनुष्यांनीं वर स्वर्गास जाऊन पोंचण्याकरितां पृथ्वीवर एक उंच मनोरा बांधण्याचें काम हातीं धरलें होतें. त्यास व्यत्यय आणण्याकरितां बांधणाराच्या भाषेंत गोंधळ उडवून देण्याची या यहुदी देवानें शक्कल काढली होती, व त्याप्रमाणें त्यानें केल्यावर "एकाचें बोलणें एका न ये" असें होऊन मनोऱ्याचें काम बंद पडलें. या गोष्टीवरूनच Babel of tongues ही ह्मण इंग्रजी भाषेंत रूढ आहे. या देवास डोंगरांतील रहिवासी पिटाळून लावतां आले, पण सपाटीवरील लोकांसमोर त्याचें चालेना, इत्यादि वर्णनें बायबलांत आहेत. त्यावर विश्वास ठेवणारे आजचे यहुदी लोक असें म्हणतात कीं, परिस्थित्यनुसार व लोक अज्ञानी होते म्हणून हीं अशा प्रकारचीं वर्णनें आहेत. पण निःपक्षपात दृष्टीनें पाहिलें असतां हीं वर्णनें सर्वशक्तिमान् ईश्वराचीं नसून, मर्यादित शक्तीच्या स्थानिक देवांचीं आहेत[३] हें समजून येतें. हिब्रू लोकांचा देव म्हणजे एका जातीचा पुढारी—ज्यास इंग्रजींत Tribal God म्हणतात, तो आहे. तो एका राष्ट्राचा नेता असून इतर राष्ट्रांशीं युद्ध करितो व त्या प्रत्येक राष्ट्राच्या मूर्धस्थानीं निराळा एकेक देव आहे. हिब्रू देवावर विश्वास नसणारा मनुष्य पाखंडमताचा किंवा धर्मभ्रष्ट मानला न जातां, राजद्रोही मानला जात असे. या बायबलांतील कल्पना पाहिल्या ह्मणजे यहुदी लोकांची देवाची कल्पना, सर्वशक्तिमान् ईश्वराची नसून जातीच्या पुढाऱ्याची आहे असें उघड दिसतें.

---

१ Genesis III 8 व 9. २ Genesis XI I ते ८. ३ I Kings XX, 25.

## नंतरचें मत.

पुढें यहुदी लोक विस्कळित होऊन दशदिशा पसरले. बॅबिलोनियन लोकांशीं त्यांचा संबंध आला व नंतर पौरस्त्य लोकांशीं संबंध जुळून ईश्वराविषयीं अधिक श्रेष्ठ विचार त्यांच्या धर्मांत शिरले. हा नवा काळ व आत्तांच सांगितलेला जुना काळ यांतील कल्पनांमध्यें भेद आहे. इतिहासज्ञांनीं बॅबिलनोत्तर काल व बॅबिलनपूर्वकाल ( Past Babylonian and Pre-Babylonian ) असे इतिहासाचे दोन विभाग केले आहेत. बॅबिलनोत्तर काळीं पूर्वींच्या कल्पना मागें पडल्या व प्राच्य देशांतील धर्मांत प्रचलित असलेल्या सुंदर कल्पना बायबलांतील ईश्वरास लावण्यांत आल्या. ईश्वरास High, Holy One, Whose name is holy,[१] इत्यादि विशेषणें लावण्यांत आलीं. ईश्वर हा एक स्थानिक व्यक्ति आहे या कल्पनेचें रूपांतर होऊन, ईश्वरविषयक मनांत अध्यात्माचा अधिक भाग शिरला. ईश्वरास अनादि-अनंत ( inhabiteth eternity[१] ) असें म्हणूं लागले, तो सर्वव्यापी आहे ही कल्पना पुढें आली व God made man in the image of his own eternity या विधानांत ईश्वर व मनुष्य हे बिम्ब-प्रतिबिम्ब न्यायानें एकमेकांसारखे आहेत हें जीवशिव-साम्याचें तत्त्व ओळखण्यांत आलें. इतकेंच नव्हे तर ईश्वर हा जसा चांगल्याचा तसा वाईटाचाही कर्ता आहे, तो एकच सृष्टिकर्ता असून जें जें आहे तें तें त्यानेंच निर्मिलें आहे हें मतही प्रचलित झालें. हें I the Lord create good and create evil[२], Shall then be evil in a city and the Lord hath not done it[३]? इत्यादि विचारांत दिसून येतें. हा विचार आपण ध्यानांत धरा. गीतेंत " द्यूतम् छलयतामस्मि " या श्लोकार्धांत हाच विचार आहे हें आपल्या लक्षांत आलेंच असेल. ईश्वर हा वाईटाचाही कर्ता कसा आहे हें तूर्त मी सांगत बसत नाहीं. त्याचा विचार आपण पुढें करूं.

## द्वैतवाद.

बायबलाच्या हिब्रू भागामध्यें ही ईश्वराच्या विभुत्वाची कल्पना—ईश्वर एकच असून गवताच्या काडीपासून तों मोठ्या देवादिकांपर्यंत जें काय

---

१ Isaiah LVII 15 व I Samuel II 2. २ Isaiah XLV, 7.
३ Amos III, 6.

आहे तें सर्व एका ईश्वराचा आविर्भाव आहे—ही कल्पना दिसून येते. उदाहरणार्थ " साम्स् " म्हणून जीं स्तोत्रें आहेत त्यांत ही कल्पना सुंदरपणें स्पष्ट करण्यांत आली आहे. " ईश्वरा, मी स्वर्गलोकांत चढलों तों तूं तेथें आहेस. मी नरकलोकांत पथारी पसरली तों तेथेंही तूंच आहेस, समुद्रावर गेलों तर तेथेंही तूं माझा मार्गदर्शक आहेस[१] " हा सुंदर विचार त्या स्तोत्रांत स्पष्ट आहे. जर ईश्वर सर्वव्यापी, तर नरक ईश्वरविरहित कसा असूं शकेल ? नरकांतही ईश्वर आहेच. मनुष्य ईश्वराचे नियम सांगून ऐकेनासा झाला म्हणजे नियम मोडल्याचे दुःखदायक परिणाम भोगून त्यानें त्या नियमांची सत्यता स्वतःच्या मनास पटवावी व जी गोष्ट सांगून ऐकली नाहीं ती परिणाम—भोगून ऐकण्यास शिकावें, यासाठीं जर नरकाचें अस्तित्व आहे तर तो नरक ईश्वराचा नाहीं असें कसें होईल ? ईश्वर चराचर सृष्टींत सर्वत्र भरलेला आहे ही कल्पना पौरस्त्य आहे. जेव्हां ख्रिश्चन लोकांनीं नवा करार लिहिला तेव्हां बायबलांतील या विशाल कल्पनेस त्यांनीं संकुचित स्वरूप दिलें. वाईटाचा कर्ता ईश्वराव्यतिरिक्त दुसरा कोणी आहे अशा समजुतीनें त्यांनीं सेटन् ( किंवा सैतान ) म्हणून एक ईश्वराचा शत्रु आहे ही कल्पना ख्रिस्ती धर्मांत आणिली. पारशी धर्मांत होर्मज् व अहिर्मान् ही परस्परविरुद्ध व्यक्तींची देवदानववजा दुकल सांगितलेली आहे, तिचा परिणाम ख्रिस्त्यांच्या मनावर होऊन त्यामुळें पूर्वींची ईश्वरासंबंधींची खोल कल्पना बायबलांत उथळ करण्यांत आली. मुसलमानी धर्मांतही हा परिणाम नंतर कायम राहिला व एब्लिस् नामक ईश्वराचा शत्रु त्या धर्मांत प्रविष्ट झाला. चांगलें व वाईट, सत् व असत्, ईश्वर व सेटन् अशा परस्परविरुद्ध दोन स्वतंत्र शक्ति जगांत आहेत व त्या वर्चस्व मिळविण्यासाठीं एकमेकांशीं सारख्या झगडत आहेत, या विचारास याप्रमाणें प्राधान्य आलें व ब्रह्म व माया, पुरुष व प्रकृति अशा प्रकारचीं द्वंद्वें सृष्टींत सदैव असावयाचीं हा द्वैती विचार दृढावला. सृष्टि व्यक्त झाली म्हणजे त्या व्यक्त सृष्टींत ब्रह्म माया, पुरुष प्रकृति हीं असावयाचीं हें खरें आहे, पण या दोघांस वितळून एक करणारें त्यांच्या मागें अव्यक्त असें अद्वैत ब्रह्म आहे. व्यक्त स्थितीस येण्याकरितां या एकाचे दोन विभाग व्हावे लागतात. त्याशिवाय उत्क्रान्तीचा गाडा फिरणें शक्य नाहीं. पण त्यामुळें हे दोन विभाग कायमचे

---

१ Psalms CXXXIX 8 ते 10.

परस्पर भिन्न व विरोधी आहेत असें होत नाहीं. पुरुष, मायेस किंवा प्रकृतीस सजीवत्व देतो व व्यक्त सृष्टींत क्रिया करण्याकरितां प्रकृति पुरुषास साधनीभूत होते. एकाशिवाय दुसरें फुकट आहे. या विरोधिद्वंद्वाच्या सृष्टींत रहाणाऱ्यानें त्या दोघांसही कवटाळून धरणाऱ्या "एका"स विसरतां कामा नये. पण ईश्वर सर्वगामी आहे ही कल्पना मागें पडून हा द्वैती विचार धर्मांत पुढें झाल्यामुळें सृष्टींत गुंतलेल्या लोकांस अद्वैताचा विसर पडूं लागला. द्वैत हें सर्वथ सत्य नव्हे. सत् व असत् ही दुकल आहे—ते एका सत्याचे दोन तुटके भाग आहेत. ते जुळवून हिंदुधर्मानें त्याचें एकत्व शिकविलें आहे. इतर धर्मांतही हा सिद्धांत ओळखलेला आहे. उदाहरणार्थ, पारशी धर्मामध्यें या विरोधी द्वंद्वाचे मुळाशीं अनंत आकाश ( Boundless space ) आहे असें सांगितलें आहे. पण हें मुळांतील 'एक' विसरून ख्रिस्ती धर्मानें वाईटाचें मूर्तस्वरूप म्हणून सेटन कल्पिला व चांगल्याचें मूर्तस्वरूप म्हणून ईश्वर कल्पिला व या चुकीमुळें ख्रिस्ती जनसमूहांत गैरसमज पसरले. ईश्वर व सैतान यांचें पुढें तुंबळ युद्ध माजलें असें ख्रिस्ती ग्रंथांत लिहिलें आहे व त्यांत जय सैतानास मिळाला ही त्यांतल्यात्यांत आश्चर्याची गोष्ट आहे. मीं सैतान विजयी झाला असें म्हणतें, याचें कारण युद्धानंतर सैतानाचें अफाट राज्य तसेंच खुलें राहिलें व देवाच्या स्वर्गाच्या राज्यास मात्र तटबंदी घालावी लागली अशी कथा आहे. पण हे सर्व गैरसमज सामान्य जनतेचे होत. ख्रिस्तधर्मांतील ज्ञानी माणसांचे ते नाहींत. उदाहरणार्थ, सेंट पॉल यानें नरकांत ईश्वर आहे, दुष्टांत ईश्वर आहे तसेंच सैतानांतही ईश्वर आहे, असें म्हटलें आहे. महमदी धर्मांतही जरी ईश्वर व एब्लिस् हे परस्परविरोधी असले तरी ईश्वर हा अनादि अनंत असून All shall perish save his face असें वचन आहे.

## सगुण व निर्गुण.

ईश्वर एक व सर्वव्यापी आहे ही कल्पना धर्मांत याप्रमाणें येण्यापूर्वी मर्यादित शक्तीचे व निरनिराळ्या जातींचे पुढारी असे अनेक ईश्वर आहेत ही कल्पना सर्वत्र पृथ्वीवर होती हें मीं आतांच सांगितलें. या मतांत सत्याचा भाग आहे. प्रत्येक राष्ट्राचा वाली एक एक राष्ट्रदेव असतो हें त्यांतलें तथ्य आहे. हिंदुधर्माच्या भाषेंत या व्यक्तींस आपण देव—किंवा देवी असें म्हणतों. ख्रिस्ती धर्माच्या भाषेंत त्याच व्यक्तींस Angels, Archangels हीं नांवें

आहेत. हीं भिन्न नांवें त्याच व्यक्तींचीं दर्शक आहेत. मनुष्याहून श्रेष्ठ अशा अनेक कोटी सृष्टींत आहेत व त्या ईश्वरी इच्छा व योजना अमलांत आणण्याचा उद्योग करीत असतात. त्यांपैकीं देव ही एक कोटि आहे. जुन्या ज्योतिःशास्त्राकडे पाहिलें तर पृथ्वी मध्यें स्थिर असून तिच्या सभोंवार पाणी होतें व सूर्य, चंद्र, तारे वगैरे सर्व पृथ्वीभोंवतीं फिरत असत. पण नव्या ज्योतिःशास्त्रानें शोध करून असें ठरविलें आहे कीं, एकंदर विश्व पृथ्वीपेक्षां फारच मोठें असून पृथ्वी विश्वाच्या मानानें कःपदार्थ आहे; व पृथ्वी फिरत असून तिच्यासारखे लक्षावधि गोल अंतरिक्षांत भ्रमण करीत आहेत. हे विचार प्रसृत केल्यामुळें ब्रूनो मृत्युमुखीं पडला. कारण जर पृथ्वीसारखे दुसरे अनेक गोल असतील व ते चक्रगतीनें फिरत असतील तर धर्माचा सर्वच कारभार आटपला म्हणावयाचा. एकंदर विश्वांत जी पृथ्वी धुळीच्या कणाइतकीही महत्वाची नाहीं त्या पृथ्वीकरितां ईश्वराचा पुत्र आपला जीवत्याग करील काय ? ख्राइस्ट आकाशांत वर गेला व स्वर्गांत जाऊन पोहोंचला व ईश्वराच्या उजव्या हातास त्याचें आसन आहे हें सगळें झूट आहे काय ? जर पृथ्वी फिरत असेल तर वर किंवा खालीं असें तें काय राहिलें व अंतरिक्षांत स्वर्ग व नरक हे तरी कोठें शोधावयाचे ? स्वर्गारोहणाच्या दिवशीं ख्राइस्ट गेला तो तरी कोठें गेला ? " छे छे हें नवें ज्योतिःशास्त्र सांगणारा ब्रूनो धर्मभ्रष्ट आहे. धर्मांत उलथापालथ—भ्रष्टाकार करणाऱ्या ह्या सुधारकाचा नायनाट केला पाहिजे. अंतरिक्षांत फिरणाऱ्या दुसऱ्या गोलांवर त्यांची रवानगी करूं या " असें म्हणून लोकांनीं ब्रूनोस अग्निकाष्ठें भक्षण करावयास लाविलें. पण त्याच्या शरीराचें सुंभ जळलें तरी त्यांतील मताचा पीळ कायम राहिला. त्याच्या विचाराचें तेज सॅम्युअल नामक मठवाशांमध्यें प्रकट होऊन ब्रूनोचें लोण त्यांनीं पुढें नेलें. ग्यालिलिओचाही छळ असाच झाला. पण ज्योतिःशास्त्राचें पाऊल आंत आलें नाहीं. अशा तऱ्हेनें वृद्धि पावलेलें ज्योतिःशास्त्र आज आपणांस पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरते असें सांगत आहे. आपली सूर्यमाला दुसऱ्या सूर्यमालेभोंवतीं फिरत आहे. सूर्यमालांचीं ब्रह्माण्डें सर्व सूर्यमाला घेऊन अधिक मोठ्या सूर्याभोंवतीं परिभ्रमण करीत आहेत. ब्रह्माण्डांस संख्या नाहीं, अंतरिक्षास अंत नाहीं. त्या अंतरिक्षाच्या अफाट समुद्रांत अनंत ब्रह्माण्डें उदयास येतात व लयास जातात. मानवी बुद्धीस अगम्य असणाऱ्या या प्रचंड घडामोडीचें सत्यत्व आमच्या ज्योतिःशास्त्रानें सिद्ध केलें आहे.

वस्तुमात्राच्या उत्पत्ति-स्थिति-लयविषयक सर्व घडामोडी त्या सर्वव्यापी ईश्वराच्या उदरांत चालल्या आहेत. ब्रह्माण्डें त्याच्या अफाट उदरांत व्यक्त रूप धारण करितात व कालावधीनें त्यांतच विरून अदृश्य होतात. तो ईश्वर सर्वत्र आहे व चराचर सृष्टींतली कोणतीही वस्तु त्याच्या क्षेत्राबाहेर नाहीं. त्या ईश्वरास कोणत्याही नांवानें संबोधितां येत नाहीं किंवा कोणत्याही कल्पनेनें त्याचा निर्देश करितां येत नाहीं. कारण शब्द व कल्पना त्याच्या अफाट स्वरूपास मर्यादा घालूं पहातात व तो तर अनंत आहे. त्याचेंच चैतन्य सर्वत्र पसरलेलें आहे. त्याच्या राज्यांत ज्या अतिमानुष कोटी आहेत त्यांतील चैतन्यही त्या सर्वेश्वराचें आहे व या कोटींचा अधिकार त्या सर्वेश्वराचे संकेत व्यक्त सृष्टींत घडवून आणण्याचा असतो. प्राचीनकाळच्या धर्मांत मर्यादित सामर्थ्याचे जे अनेक ईश्वर किंवा देव सांगितले आहेत ते या कोटींतील असून सर्वेश्वराचे हस्तक आहेत. निर्गुण परमेश्वर व त्याच्या प्रवाहांत अंतर्निविष्ट अनेक श्रेष्ठ सगुण व्यक्ति असा खरा प्रकार आहे. अर्थात् अनेक देववाद किंवा देव अनेक आहेत हें मत व विश्वेश्वरवाद किंवा अखिल-विश्व हेंच ईश्वराचें रूप आहे हें मत हीं दोन्हीं खरीं आहेत. पण युरोपांतील विश्वेश्वरवाद व पौरस्त्य विश्वेश्वरवाद यांच्या स्वरूपांत फरक आहे. स्पिनोझा विश्वेश्वरवादी आहे खरा, पण त्याच्या मतानें ईश्वराचें सर्वत्र पसरलेलें जें मूळचें स्वरूप तें गुणान्वित आहे. पण वेद, झेंदावेस्ता इत्यादि ग्रंथ, प्राचीन ग्रीक, इजिप्शियन किंवा रोमन लोकांचे धर्म हें पहिलें स्वरूप निर्गुण आहे असें सांगत आहेत. स्पिनोझानें त्या स्वरूपास सगुण ठरवून मोठी चूक केली आहे व त्यामुळें त्याच्या मतांत लोकांच्या हृदयास आकर्षून धरणारी प्रतिभा नाहीं. हिंदुधर्मांत या मूळ स्वरूपास अनंत व निर्गुण ब्रह्म असें म्हटलें आहे. व प्रत्येक मोठ्या धर्मानें हें निर्गुणत्व ओळखलेलें आहे. महमदी धर्म, पारशी धर्म, ख्रिस्ती धर्म इत्यादिकांत जरी हा विचार तितका उघड मांडलेला नसला तरी तो त्यांत आहे. मुसलमानांमधील नवव्या व दहाव्या शतकांतील ज्ञानी माणसांनीं ईश्वराचीं उदात्त वर्णनें लिहून ठेविलीं आहेत. ईश्वर हा सर्व आहे, जें पूर्वीं होतें तें, जें आहे तें व जें पुढें अस्तित्वांत येईल तें हीं सर्व ईश्वरांत समाविष्ट आहेत, जें चिंत्य आहे व जें अचिंत्य आहे त्या सर्वांचा त्याच्या स्वरूपांत अंतर्भाव होतो असें त्यांचें म्हणणें आहे. शंकराचार्यांनीं भक्तिनिमित्त आपल्या स्तोत्रादिकांत जे विचार गोंविले आहेत ते क्षणभर

विसरून विचार केला तर ईश्वराचें हें महमदी वर्णन थेट अद्वैत वेदान्तांतल्या वर्णनासारखें आहे. ईश्वराच्या अनाद्यनंत स्वरूपांत अमुक एक नाहीं असें व्हावयाचें नाहीं. त्यांत भूत, वर्तमान व भविष्य या तिहींचें एकत्र वसतिस्थान आहे. या निर्गुणाचा पुढला पर्याय म्हणजे सगुण आहे. हा सगुण ईश्वर—हें सगुण ब्रह्म—म्हणजे निर्गुणाहून अन्य नव्हे—तें फक्त व्यक्त स्थितीस आलेलें ब्रह्म होय. गीतेंत या प्रकारास 'विष्टभ्याहम् इदम् कृत्स्नम् एकांशेन स्थितो जगत्'--एका अंशानें मी सर्व जग व्यापून बाकीचा माझा अंश तसाच उरला आहे—असें म्हटलें आहे. जग व्यापण्यांत त्याच्या स्वरूपास व्यक्त व्हावें लागल्यानें तें निर्गुण स्वरूप या पर्यायानें समर्याद अर्थात् सगुण होतें. या सगुण स्वरूपाचें वर्णन करितांना तें अंधकाराचा नाश करणारें म्हणजे प्रकाशरूप आहे ( मनुस्मृति १,६ ) असें मनूनें म्हटलें आहे. अर्थात् या वर्णनावरून त्यास गुण आहेत हें स्पष्ट आहे. हे गुण मूळच्या स्वरूपाचे नसून व्यक्त स्थितीमुळें उद्भवलेले आहेत व जसजसा व्यक्तरूपांत फरक होईल तसतसे ते बदलतील. सगुण ब्रह्म एके वेळीं तेजःस्वरूपाचें आहे म्हणून तें सदैव तसें असेल असें नाहीं. दुसऱ्या ब्रह्माण्डांत किंवा अन्य युगांत तें निराळेंही असूं शकेल.

## त्रिमूर्ति.

निर्गुण ईश्वराच्या पुढील पर्याय जसा सगुण ईश्वर तसा या सगुण ईश्वराच्या पुढचा पर्याय म्हणजे त्रिमूर्ति होय. हीं एका ईश्वराचीं तीन रूपें आहेत, ज्ञान किंवा अपरोक्षानुभूति, इच्छा किंवा वीर्य अगर प्रभाव, व क्रिया हें तीन ईश्वरस्वरूपाचे घटक आहेत. व त्रिमूर्तीची जी त्रयी किंवा सृष्टींत ज्या इतर त्रयी आहेत त्या सर्वांच्या मुळाशीं हे तीन घटक आहेत; हे तीन एका ईश्वरांत अंगभूत आहेत व त्यामुळें त्रिमूर्तींत जरी तीन स्वरूपें दिसत असलीं तरी तीं वस्तुतः एकच आहेत. त्रिमूर्तींतील ब्रह्मा हा सृष्टीचा उत्पन्नकर्ता व विष्णु हा पालनकर्ता आहे. त्रिमूर्तींतील तिसरी व्यक्ति म्हणजे शिव किंवा महादेव ही होय. तो संहारकर्ता असून सृष्टींतील वस्तुजाताच्या जुन्या रूपाचा नाश करून त्यांस अधिक श्रेष्ठ रूप देण्याचें काम त्याचें असतें. अज्ञ लोक या तिघांचें एकत्व विसरतात व त्यांस निरनिराळे देव समजून विष्णु श्रेष्ठ कीं महादेव श्रेष्ठ, असे वाद माजवितात. असल्या अज्ञानामुळें वैष्णव व शैव यांचे तंटे उत्पन्न झालेले आहेत. पण खरोखरी हीं तीन

स्वरूपें म्हणजे एकाच ईश्वराचे अंश आहेत व त्यांत उच्चनीच भाव किंवा विरोध संभवत नाहीं. त्या तिघांशिवाय ब्रह्माण्डाचें चालावयाचें नाहीं. घारापुरीचीं लेणीं मी पहावयास गेल्यें होत्यें व तेथें फोडून विरूप केलेल्या मूर्ति दृष्टीस पडल्या. त्रिमूर्तीच्या मुळाशीं असलेलें जें ईश्वराचें एकत्व तें विसरून उत्पन्न होणाऱ्या दुराग्रहांचें हें फळ होय. हरिहरांमध्यें भेद नाहीं हें दाखविणाऱ्या अर्ध्या विष्णूच्या व अर्ध्या शिवाच्या अशा ज्या मूर्ति आहेत त्या असल्या दुराग्रही लोकांची कानउघाडणी करणाऱ्या आहेत. असें सांगतात कीं, एक दुराग्रही भक्त हरि व हर या दोहोंपैकीं एकासच श्रेष्ठ समजून त्याच्या मूर्तीसमोर ध्यान करीत बसला होता. इतक्यांत त्या मूर्तीचा अर्धा भाग विष्णूचा व अर्धा शिवाचा झाला व जो भाग एकदां विष्णूचा तो क्षणार्धांत शिवाचा दिसावा व जो भाग शिवाचा तो विष्णूचा दिसावा असा प्रकार सुरू होऊन ही द्विमूर्ति हंसूं लागली. ही गोष्ट तरी हरिहरांमध्यें भिन्नभाव नाहीं हेंच शिकवीत आहे.

## देवादिक कोटि.

त्रिमूर्तीची पुढची पायरी म्हणजे मनुष्यापेक्षां उच्च असणाऱ्या देवादि कोटींची आहे. हे देव अनेक असले तरी त्यांतील चैतन्य त्या एका सर्वेश्वराचेंच आहे. बहुदेववाद ( polytheism ) व सर्वेश्वरवाद ( pantheism ) हीं दोन्ही मतें खरीं आहेत—बहुदेववादाचा अंतर्भाव करणारा सर्वेश्वरवाद हें मत खरें आहे. कोणतीही गोष्ट स्वतः होऊन आपणास प्रिय वाटते असें नसून तींतील आत्मा किंवा सर्वेश्वर मनुष्याच्या हृदयाचें आकर्षण करितो. 'न वा रे देवानाम् कामाय देवाः प्रिया भवन्ति आत्मनस्तुकामाय देवाः प्रिया भवन्ति[1]।'

या देवदेवींच्या ज्या कोटी आहेत त्या माणसाहून उत्क्रान्तीनें श्रेष्ठ आहेत. झेंदावेस्ता व वेद यांत देवादिकांस अनुलक्षून स्तोत्रें गायिलेलीं आहेत. तीं स्तोत्रें वाचणारे पाश्चिमात्य लोक म्हणतात कीं, पृथ्वी, आप, तेज इत्यादि महावस्तूंस मूर्तस्वरूप कल्पनेनें देऊन प्राचीन लोकांनीं देवदेवता मानिलेल्या आहेत. वस्तुतः देव म्हणून कांहीं व्यक्तींची कोटि आहे असें नाहीं. हा

१ बृहदारण्यक उपनिषद याज्ञवल्क्य—मैत्रेयीसंवाद.

विचार चुकीचा आहे. तो उफराटा केल्याशिवाय त्यांतलें तथ्य समजावयाचें नाहीं. पाश्चात्य पंडित म्हणतात कीं, पूर्वीच्या अज्ञानी लोकांनीं पृथ्वीवरील भौतिक अग्नीवर भावनेनें देवाचा वेष चढवून अग्निदेव अस्तित्वांत आणिला आहे. खरें पाहिलें तर उलट भौतिक अग्नि हा खऱ्या अग्निदेवानें पृथ्वीवर व्यक्तस्थितीस येण्याकरितां धारण केलेलें रूप आहे. अग्निदेव काल्पनिक नसून सत्य आहे, तो देवराज आहे, व सिद्ध पुरुषास त्याचें आवाहन करणें शक्य आहे. त्याचे हाताखालीं तद्धर्मी अनेक उपदेवता आहेत व त्याच्याच द्रव्याचा त्या उपयोग करितात. भौतिक अग्नीमध्यें त्या देवराजाचेंच तत्त्व आहे. वायुदेव, वरुणदेव, क्षितिदेव इत्यादिकांचाही प्रकार तोच आहे. हे मोठमोठे देव आहेत. व पृथ्वीवरील पदार्थ हे त्यांनीं प्रकट होण्याकरितां चढविलेले वेष आहेत. कोणास देव नांव नको असल्यास त्यानें दुसरें नांव योजावें. कारण हा नांवाचा प्रश्न नाहीं. सृष्टिनियमांच्या मुळाशीं हीं सचेतन तत्त्वें आहेत व त्या सर्वांत एका सर्वेश्वराचा संकेत ग्रथित आहे. सत् जें आहे तें एक आहे व विप्र त्यास बहुनामांनीं निर्देशितात. एक ईश्वर असंख्य रूपें धारण करितो. एक चैतन्य अनंत मूर्तींत प्रकट होतें. या मूर्तींची चढती परंपरा आहे. व प्रत्येक पायरीवर अनेक व्यक्ति असतात. हा विचार केल्यास या असंख्य रूपांत देवांचाही अंतर्भाव झाला पाहिजे हें समजण्यास अडचण पडणार नाहीं व मानवांच्या प्रार्थना ते कधीं ऐकतात याचें तुम्हांस आश्चर्य वाटणार नाहीं. कित्येक देव राष्ट्रांचे किंवा विशिष्ट प्रांताचे प्रतिपालक असतात. जेव्हां एकादा शेतकरी आपल्या पिकापाण्यासंबंधें देवाची आराधना करितो तेव्हां ती सर्वेश्वराची नसून त्याच्या साम्राज्यांतल्या कांहीं विशिष्ट देवाची असते. व हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांस तुम्हीं विचारून पाहिल्यास देव व ईश्वर ह्यामध्यें भेद आहे हें ते जाणतातसें दिसतें. देवांच्या अनेक कोटींस या अफाट सृष्टींत जागा आहे पण अनंत अशा या व्यक्त सृष्टींत शिरल्यावर सर्वेश्वराचें विस्मरण होण्याचें माणसास भय असतें व शहाण्या माणसानें हें विस्मरण होऊं देतां कामा नये. या सर्वेश्वरास " जीव " ( Spirit ) म्हणण्याची सोय नाहीं. कारण जीव म्हटल्याबरोबर तद्विरुद्ध असणारी जी जडाची कल्पना तीस अर्धचंद्र दिल्यासारखें होतें. तो एक आहे, अद्वैत आहे इतकेंच म्हणतां येईल. जगांतील सर्व ज्ञान, सर्व इच्छा, सर्व कर्म त्याचेंच आहे. कारण त्या

सर्वांचा उगम त्या एकापासून आहे. त्यांत अमुक एकाचा समावेश होत नाहीं असें नाहीं. सर्व चराचराचा योगक्षेम त्यांतच असल्यामुळें मनास कशाचीही काळजी वाटण्याचें कारण नाहीं.

सर्व जगतासंबंधानें ही दृष्टि स्वीकारिली म्हणजे नीति कोणती व अनीति कोणती याची कसोटी ठरविण्यास सोपें जातें. पण त्या प्रश्नांत आपण पुढच्या एका व्याख्यानांत शिरूं. या व्याख्यानांत येथपर्यंत विवरण करून 'सर्व खलु इदं ब्रह्म' हा विचार मननाकरितां आपणांसमोर ठेवून आतां मी रजा घेत आहे. धुळीच्या कणापासून तों देवराजापर्यंत जें सर्व आहे तें त्या एकाचा आविर्भाव आहे. दगड असो, वनस्पति असो, प्राणी असो, मनुष्य असो-सर्व त्या एका अनंताचीं व्यक्त स्थितीस आलेलीं विविध रूपें आहेत. त्याचें सर्वव्यापी चैतन्य या रूपांत नसेल तर तीं जिवंत राहूं शकतील कशीं ? या अद्वितीय चेतनेची ओढ असल्याविना तीं उन्नतिमार्गानें पुढें जाऊन त्याशीं मिळतील तरी कशीं ? अखिल विश्व हें ब्रह्म आहे व तो एक विश्वंभर जगतांत भरलेला आहे. तेव्हां जगावर प्रेम करण्यास भिऊं नका. कारण जग म्हणजे कोणी दुसरें तिसरें नव्हे आहे. या प्रेमदृष्टीनें पाहूं लागलांत म्हणजे तुमची अध्यात्मवृत्ति प्रफुल्लित होऊन तुम्हांस जिकडे तिकडे तो सर्वेश्वर दिसावयास लागेल व कोणतीही वस्तु तद्व्यतिरिक्त नाहीं याची हृदयास उमज पडेल. रात्रंदिवस सतत वहात असणाऱ्या वायूच्या लहरींमध्यें तुम्हांस त्याची ओळख पडेल, पृथ्वीच्या पाठीवर सर्वत्र विस्तरलेल्या धारगंभीर समुद्रामध्यें तुम्हांस तो प्रतीत होईल. जिकडे तिकडे निवांत झालें असतां वृक्षलतांचे दलभार मंदानिलाशीं संयुक्त होऊन मंजुळ शब्द करूं लागले म्हणजे त्यांतही परमात्म्याचें गायन तुमच्या कानांस ऐकूं येईल. तुम्ही गजबजलेल्या लोकवस्तींत जा, जेथें कशाचाच उपसर्ग नाहीं अशा एकान्तवासांत रहा किंवा गगनमंडळास भेदून वर जाणाऱ्या उच्च पर्वतशिखरावर वसति करा, कोठेंही गलांत तरी तो एक परमात्मा सर्वत्र कोंदून राहिलेला तुम्हांस दिसेल व जेव्हां याप्रमाणें जिकडे तिकडे त्याचेंच दर्शन घेण्याची योग्यता तुमच्या अंगांत येईल तेव्हां तुम्हांस परमात्म्याच्या स्वरूपाचा अर्थात् अक्षय शान्तिसुखाचा लाभ होईल.

---

# मनुष्य.

आजच्या विषयास सुरुवात करण्यापूर्वी काल आपण कोठपर्यंत येऊन ठेपलों त्याचा विचार करूं या. कालच्या व्याख्यानांत ईश्वर, त्याचें स्वरूप, त्याचें अस्तित्व इत्यादि गोष्टींचें विवेचन करून शेवटीं परमेश्वर किंवा परमात्मा सर्वव्यापी आहे, त्याचें जीवन विश्वास भरून राहिलेलें आहे, या विचारांतील सत्यपणा ओळखण्यापर्यंत आपण मजल मारिली होती. परमेश्वर हा एक आहे, अद्वितीय आहे, खनिज कोटीपासून चढत चढत देवकोटीपर्यंत असंख्य रूपें धारण करणारे जे जीव आहेत ते त्याचे अंश असून त्याच्या चैतन्याच्या कक्षेबाहेर कांहींच रहाणें शक्य नाहीं हें काल आपण पाहिलें. प्रत्येक ब्रह्मांडाचा नायक जो ईश्वर तोही बल, वीर्य, तेज वगैरे परमात्म्याचे गुण प्रकर्षानें दर्शविणारी एक व्यक्ति होय. प्रत्यक्ष ब्रह्माण्डाचा अधिपतिही अनादि–अनंत–ब्रह्म नव्हे तर त्या ब्रह्माच्या अंशानें धारण केलेलें एक मर्यादित स्वरूप होय. ईश्वर ही एक व्यक्ति असल्याचें श्रीमद्भागवतांत लिहिलेलें आहे व विश्वांत अनेक ब्रह्माण्डें असून प्रत्येकाचा शास्ता ईश्वर वेगवेगळा आहे व तसेंच दरब्रह्माण्डागणिक निराळा ब्रह्मा, निराळा विष्णु व निराळा महादेव असतो असें त्यांत प्रतिपादिलें आहे. ह्या सर्वसंचारी परमात्म्याचा विचार आजच्या विषयास आधारभूत म्हणून स्मरणांत ठेवून त्या परमात्म्यानें परिधान केलेली जी अनंत रूपांची मालिका त्यांतील एका रूपाचा–ज्यास आपण मनुष्य म्हणतों त्या रूपाचा–आज आपणांस विचार करावयाचा आहे. मनुष्य हें आगापिच्छा नसून सृष्टीच्या पोकळींत आधांतरीं राहिलेलें ‘ रूप ’ नव्हे. परमेश्वरापासून उत्पन्न झालेल्या वस्तूंची जी क्रमवार परंपरा आहे तींतील मनुष्यप्राणी ही एक पायरी आहे. खनिज कोटी, उद्भिज कोटी, प्राणिकोटी असा सृष्ट पदार्थांचा चढता क्रम आहे व जसजसें या क्रमानें पुढें जावें तसतसें त्यांत परमात्म्याचें चैतन्य अधिकाधिक व्यक्त होत जातें. सायणाचार्यांनीं म्हटलें आहे कीं, खनिज जीवांत किंवा खनिज पदार्थांत फक्त अस्तित्व किंवा सत्ता प्रकट झालेली असते. वनस्पतिकोटींत व प्राणिकोटींत परमात्मा अधिक व्यक्त झाल्यामुळें त्यांत मनाचे गुणधर्म अंशतः दिसूं लागतात. अधिक परिणत झालेल्या प्रकृतीचें वेष्टण धारण

करणारी मानवकोटी पाहिली तर मनाचे धर्म तींत वृद्धिंगत झालेले दृष्टीस पडतात. मागें काय झालें याचें माणसास स्मरण रहातें व पुढें काय होईल याची तो अटकळ करूं शकतो. मनुष्यकोटीच्या पुढें गेलें म्हणजे जीवन्मुक्तांची कोटी, देव–कोटी इत्यादि लागतात. या मार्गानें जसजसें वर चढावें तसतशी ज्ञान, इच्छा व क्रिया या तिहींत उत्तरोत्तर श्रेष्ठ असणाऱ्या कोटी लागतात व असेंच पुढें गेलें म्हणजे शेवटीं ईश्वराच्या मनोगताप्रमाणें सृष्टींत योजना करणाऱ्या ज्या त्याच्या सभोंवतालच्या महाव्यक्ति (Spirits round Ishwara) त्यांचेपर्यंत आपण येऊन पोंचतों. या व्यक्ति म्हणजे ईश्वराच्या विश्व–साम्राज्यांत त्याच्या हुकमाची अंमलबजावणी करणारे व्हाइसरॉयच होत.

## मनुष्याचें स्थान.

सृष्टीची ही जी चढती परंपरा आहे त्यांत मनुष्याचें स्थान मध्यमार्गी आहे. मानवकोटींत पुरुष व प्रकृति किंवा चिदंश व जडांश यांचें स्वामित्वासाठीं युद्ध चाललेलें असतें. खनिज पदार्थ, वनस्पति व प्राणी यांमध्यें जडांशाचा पगडा असतो. खनिज कोटींतील जीवांभोंवतींचें आवरण अतिशयित स्थूल व अवजड असतें. वनस्पतिकोटी व प्राणिकोटी यांत खनिजकोटीपेक्षां चैतन्यांश अधिक व्यक्त असून जडांशाचें आवरण तितकें स्थूल नसतें. पण एकंदरींत या तिन्ही कोटींत जडांशाचाच पगडा अधिक असतो. मनुष्यकोटींत येऊन हलक्या दर्जाचीं माणसें पाहिलीं तर त्यांतही जडांशच प्रबळ असतो. पण पुढें लवकरच चिदंश व जडांश यांमध्यें चढाओढ सुरू होते व उच्च कोटीच्या माणसांत जडांश मागें पडून त्यावर चैतन्यांश स्वामित्व गाजवूं लागतो. श्रेष्ठ मनुष्यांत चिदंशाच्या शक्तीनें जडांश शुद्ध झालेला असतो व त्यामुळें चिदंशाच्या गळ्यांत जडांशाचें नुसतें लोढणें बांधलें आहे, अशी स्थिति श्रेष्ठ मनुष्यांत रहात नाहीं. श्रेष्ठ माणसाच्या चिदंशास–जीवात्म्यास–जड प्रकृतीचा अडथळा न होतां उलट जीवात्म्याच्या शक्ति व्यक्त करण्यास जडांश साधन होतो. ही स्थिति चिदंश व जडांश (किंवा जीवात्मा व प्रकृति) यांच्यामधील झगड्यामुळें उत्पन्न होते. मनुष्यकोटींत हा झगडा फार काळपर्यंत सुरू असतो. मन हें आत्म्याचें कनिष्ठ स्वरूप होय. हें मन जोंपर्यंत मनुष्यांत निद्रित असतें तोंपर्यंत जड प्रकृति प्रबल असते. पण मनाची शक्ति निद्रितावस्थेंतून

जागी होऊन वाढूं लागली म्हणजे झगडा सुरू होतो व तो बहुतकालपर्यंत टिकतो. या झगड्यापासून मनुष्याची एकसारखी प्रगति होते. उत्क्रांति-मार्गावर त्याचें पाऊल एकसारखें पुढें पुढें पडत असतें व अशा रीतीनें कालगतीनें तो उन्नत होत्साता अलौकिक योग्यतेचा पुरुष बनतो व लोक-समाजांत सत्पुरुष, साधु, संत, ऋषि इत्यादि नांवांनीं ओळखिला जातो. मानवी उत्क्रान्तीचें हें दुसरें टोंक आहे. मनुष्याची पशुवृत्ति नामशेष झाली व अध्यात्मवृत्ति आपलें साम्राज्य माणसावर गाजवूं लागली हें दर्शविणारी ही स्थिति होय. हा जो मनुष्याचा उत्क्रान्तिमार्ग त्या सगळ्याचा अन्तर्भाव आज विवेचनास घेतलेल्या विषयामध्यें होत आहे.

## बीजवृक्ष न्याय.

मनुष्याचा उगम कोठें आहे ? तो येतो कोठून ? तो थेट ईश्वराच्या घरून निघतो. ईश्वराचें घर ही सर्व जीवात्म्यांची जन्मभूमि आहे. तेथून ते बाहेर निघतात. प्रदीप्त पावकापासून जसे सरूप विस्फुलिंग बाहेर येतात किंवा हे श्रुतीचे शब्द साध्या भाषेंत सांगावयाचे झाल्यास पेटलेल्या विस्तवांतून विस्तवस्वरूपीच ठिणग्या जशा बाहेर येतात त्याच प्रकारानें ईश्वरापासून जीवात्मे बाहेर पडतात. विस्तव व ठिणगी हीं एकच—त्यांचे गुणधर्म एकच. तोच प्रकार ईश्वर व जीवात्मा यांचा आहे. गीतेंत भगवान् श्रीकृष्ण कुरु-क्षेत्रावरील एक व्यक्ति म्हणून नव्हे तर परमेश्वर म्हणून सांगतात कीं, जीवात्मा हा ममैवांशो—माझाच अंश आहे, व तो माझा अंश

**मनः षष्ठाणि इंद्रियाणि प्रकृतिस्थानि कर्षति ।**

म्हणजे तो, जड द्रव्यापासून उत्पन्न झालेल्या पांच इंद्रियांशीं व तसेंच मनाशीं संलग्न होतो. जीवात्मा हा मूळचा ईश्वराचा अंश. तो आपलें वसतिस्थान सोडून प्रकृतीच्या—जडाच्या—पसाऱ्यांत जातो व तेथें पांच इंद्रियें व सहावें मन हीं आपणांसभोंवतीं आकर्षण करून घेतो. श्रीकृष्णांच्या ह्या वर्णनांत मनुष्याची व्याख्या आहे. मनुष्य म्हणजे प्रकृतीच्या क्षेत्रांत पेरलेलें ईश्वरांशाचें बीज होय. बीजापासून वृक्ष होतो व बीज मूळ ज्या वृक्षाचें असेल तसा त्यापासून नवीन वृक्ष व्हावा हा सृष्टिनियम आहे. बीं जमिनींत पेरलें म्हणजे त्यास अंकुर फुटतो, पुढें पानें, फुलें व फळें येतात व अशा क्रमानें बीजांत गुप्त असलेली शक्ति हळू हळू प्रकट होत जाते. पुष्पफळयुक्त सुंदर

वृक्ष होण्याचा संकल्प बीजांत सांठविलेला असतो त्या वृक्षाचें सौंदर्य, त्या वृक्षाचा विस्तार, हीं त्या बीजांत निद्रित असतात. तें बीं जमिनींत पेरल्यावर ह्या निजलेल्या शक्ति जागृत होऊन प्रकट होतात व मूर्त स्वरूप धारण करितात. अशा रीतीनें बीजांतील शक्यता सावकाशपणें प्रगटरूप धारण करून शेवटीं ठरलेला वृक्ष अस्तित्वांत यावा ही त्या बीजाची भवितव्यता असते. ईश्वरांशाचें बीज जो मनुष्य त्यांतील गुप्त शक्ति फुलन बाहेर याव्या व अशा प्रकारें चौफेर उत्क्रान्ति होऊन त्या बीजानें शेवटीं ईश्वरस्वरूप प्राप्त करून घ्यावें ही मनुष्याच्या ललाटावर सृष्टिनियमांनीं लिहिलेली भवितव्यता आहे. बीजास वृक्ष झाल्याविन जशी अन्य गति नाहीं तशी मनुष्यास ईश्वर होण्याविना दुसरी भवितव्यता नाहीं. या बीजांत संचित असलेल्या शक्ति उत्क्रान्तिमार्गांत व्यक्त होऊन सरशेवटीं ईश्वरस्वरूपी अव्यय असा अश्वत्थ वृक्ष निर्माण व्हावा हें मनुष्याच्या समोर असलेलें ध्येय आहे. हें ईश्वरीय बीज जेव्हां रुजण्याकरितां प्रकृतीच्या जगतांत घालण्यांत येतें तेव्हां तें परावलंबी—असहाय असतें, त्यांत शक्ति असत नाहीं. पण तें कितीही अल्प सामर्थ्याचें असलें तरी तें ईश्वराचें बीज असतें व कालगत्या त्यांत लपविलेलें ईश्वरी सामर्थ्य आविर्भूत होऊन युगांतरीं त्यापासून बीजप्रद पित्याच्या जोडीचा प्रति–ईश्वर व्हावयाचा असतो. जसें बीज तसा अंकुर हा न्याय निसर्गसिद्ध आहे. जीवात्मा व परमात्मा यांचा बीजवृक्षाप्रमाणें संबंध आहे. बृहदारण्यक श्रुतींत जीवात्मा व परमात्मा यांची तुलना केलेली आहे, व परमात्मा हा सर्वैश्वर्यसंपन्न तर जीवात्मा हा अल्पगुणी, परमात्मा हा सर्व शक्तिमान् तर जीवात्मा हा अल्पबल, असा विचार तेथें नमूद केला आहे. परमात्मा हा सर्व गुणांचें आगर होय. जीवात्म्यांत ते गुण फक्त बीजरूपानें वास करितात. त्या बीजास पुढें अंकुर फुटून गुणांची वाढ व्हावयाची असते. हिंदूधर्मानंतर पुष्कळ कालानें निघालेला जो ख्रिस्ती धर्म त्यांतही Be ye therefore perfect as your Father in heaven is perfect या वचनांत तोच विचार ग्रथित केलेला आहे. ख्राइस्टच्या या शब्दांचा विचार करा. मनुष्यमात्राचें भवितव्य त्यावरून आपल्या ध्यानीं येईल. मनुष्यानें सदा रें रें करीत असावें, नेहमीं निःशक्त व नेभळट रहावें, पोरवयांतील बालिशता व अज्ञान यांत सतत लोळावें असा सृष्टाचा संकेत नाहीं. कालपरत्वें हुबेहूब ईश्वराप्रमाणें सर्वांगसुंदर, सर्वांगपरिपूर्ण, सर्वसमर्थ व्हावें हें मनुष्याचें ध्येय आहे. आपल्यापैकीं कोणतीही

व्यक्ति सरते शेवटीं ईश्वरापेक्षां अणुरेणुभरही कमी रहावयाची नाहीं. पूर्णांशानें निर्मळ ईश्वरस्वरूप तुमच्या वांट्यास यावयाचें आहे. स्वतःच्या मूर्खपणानें प्रगतिमार्गावरील आपलें चालणें तुम्ही मंद करूं शकाल; तुम्ही क्षणभर थांबूं शकाल; वाढ खुंटवूं शकाल; किंवा राजमार्ग सोडून थोडेसे बाजूसही जाऊं शकाल. पण कांहीं झालें तरी शेवटीं तुम्हांस ईश्वराप्रत जाण्याखेरीज दुसरी तोड नाहीं. फार झालें तर स्वतःच्या वेडेपणानें तुम्ही विलंब कराल व त्यानें फुकट कालक्षेप होईल. पण अनादि अनंतास वेळाची काय मातब्बरी आहे? तुम्ही अनादि व अनंत आहां व तुमचें सत्व म्हणजेच परमेश्वर आहे.

## दोन नियम.

तर तुम्ही ईश्वराचें बीज आहां. हे बीजरूप तुम्ही मोठे होऊन ईश्वरसदृश सर्वसुंदर महावृक्ष बनणार कसे? तुम्ही ईश्वराचे—त्या राजराजाचे पुत्र आहां. पण आपण राजाच्या पोटचे आहों हें विसरून आपण मातींत खेळणारीं भिकाऱ्याचीं पोरें आहों असेंही आपल्यास वाटण्याचा संभव आहे. पित्याची दौलत आपली आहे, तीवर आपला जन्मसिद्ध हक्क आहे याचें विस्मरण पडून माणसानें धूळ खात पडावें हेंही शक्य आहे. पण कसेंही झालें तरी तुमच्या अंतरंगांत तेवत असलेली दिव्याची ईश्वरी ज्योत कायमची विझणार नाहीं. तुम्हांमधील ईश्वर कांहींही झालें तरी आपली योजना फिसकटूं देणार नाहीं. हाडामांसांत बद्ध झालेले जे आपण ईश्वरी अंश ते आपल्या उगमस्थानाकडे ओढ घेणारच. मनुष्यास जो हा उत्क्रान्तिमार्ग आक्रमावयाचा व त्या उत्क्रान्तिमार्गावर जी त्याची एकसारखी प्रगति व्हावयाची तीस नियम आहेत—ती दोन मोठ्या सृष्टिनियमानुसार होते. पहिला नियम म्हटला म्हणजे पुनर्जन्माचा नियम होय. जन्ममरणाचे फेरे करीत करीत माणसानें पुढें जावें व जेव्हां स्वतःमधील ईश्वरांशाची त्यास ओळख पटेल तेव्हां त्या फेऱ्यांतून सुटून ईश्वरस्वरूपास मिळावें—मुक्त व्हावें असा हा नियम आहे. अंतरंगांतील ईश्वर ओळखीपर्यंत पुनरपि जननम् पुनरपि मरणम् हा चक्रनेमिक्रम थांबणार नाहीं. पुनर्जन्माच्या नियमाच्या जोडीचा दुसरा नियम ' कर्म ' हा होय. या कर्माच्या सूत्रानें जगांतील सर्व गोष्टी परस्परांशीं बांधलेल्या आहेत. परमेश्वर मूळचा अनंतस्वरूप आहे—अर्थात् त्याचेठायीं यच्चयावत् सर्व गोष्टींचा एकत्र समावेश आहे. परमेश्वरा-

विरहित दुसरें कांहीं आहे असें नाहीं. जें जें काय आहे तें सर्व त्याचे-मध्यें एकसमयावच्छेदेंकरून आहे. जेव्हां तो परमेश्वर व्यक्त होतो. जेव्हां काळ आणि दिक् यांच्या बंधनांत येतो तेव्हां त्याच्या स्वरूपांत अंतर्लीन असलेल्या सर्व गोष्टी बाहेर येतात—एक प्रथम येते दुसरी नंतर येते व म्हणूनच त्या वस्तूंत पूर्वापारपणा येता. या पूर्वापारपणाच्या सूत्रांत सर्व गोष्टी बांधल्या जातात. ईश्वरस्वरूपांत सर्व गोष्टी ज्या एकाच स्थानीं व एकाच काळीं प्रथम मिळून असतात ती घडी व्यक्त होण्याच्या प्रसंगीं मोडते व एकत्र रहाणाऱ्या वस्तू मालिकेच्या रूपानें तुम्हां आम्हांस दिसूं लागतात. एकाच्या पुढें दुसरें दुसऱ्याच्या पुढें तिसरें ही जी व्यक्तस्वरूपांत माला उत्पन्न होते त्यास आपण कार्यकारणभाव म्हणतां व हाच कर्माचा नियम होय. ईश्वरांत **सर्व सदैव विद्यमान आहे**—व्यक्त सृष्टींत व मनुष्यांत तें **क्रमानें होत जातें**. हा 'होत जाण्याचा' क्रम आपणास कार्यकारण संबंध असा भासतो. परमेश्वरांत जें सदैव सांठलेलें आहे तें कालाच्या साम्राज्यांत परिस्फुट होणें, व्यक्त होणें म्हणजेच कार्यकारणाची उत्पत्ति होणें आहे. कार्यकारणभावांत अधिक कांहीं नाहीं.

## नियमांचें ज्ञान.

या दोन नियमांची क्रिया कशी होते तें आपण पाहूं या. या नियमांची क्रिया मनुष्यावर बहुत कालपर्यंत चाललेली असते व उत्क्रान्तिमार्गाच्या एकापुढच्या एक अशा ज्या अनेक पायऱ्या त्यांवर पाउलें टाकून मनुष्य चालून जात असतांना या नियमांशीं त्यांचा एकसारखा संबंध येत असतो. मनुष्यानें एकटें सृष्टींत भटकावें व उत्क्रान्तिनियमांचा शोध स्वतःच्या हिमतीवर शक्य तितका करून त्यापासून ज्ञान शिकावें अशी सृष्टीची योजना नसते. मनुष्यानें हवें तिकडे अडाण्यासारखें जावें, खड्ड्यांत पडून पाय मोडला म्हणजे हा खड्डा आहे असें त्यानें ओळखावें व अशा पद्धतीनें चांचपडत चांचपडत जें काय त्यास ज्ञान होईल तें संपादन करीत त्यानें कसें तरी पुढें जावें अशी त्याची व्यवस्था नाहीं. मनुष्य उत्क्रान्ति-मार्गाच्या आरंभीं जेव्हां अज्ञ स्थितींत असतो तेव्हां त्यास वाट दाखविणारीं वडील माणसें सृष्टींत नेमलेलीं असतात. ह्या मनुष्यरूपी ईश्वरी अर्भकाचा सांभाळ करण्यासाठीं, त्यास शिकविण्यासाठीं, ज्यांची मानवी उत्क्रांति पूर्वीच दुसरीकडे कोठें तरी कल्पांतरीं संपूर्ण झालेली असेल, जे दुसऱ्या कोणत्या तरी

जगतांत मानवी विकसन संपवून अतिमानुष पदवीस पोंचले असतील अशा वडील पुरुषांची योजना केलेली असते. ह्या पुरुषांस मानवी उत्क्रान्तीचा स्वतःचा अनुभव असल्यामुळें ते इतरांस मार्ग दाखवूं शकतात. सृष्टिनियमांची क्रिया समजण्याच्या दोन पद्धति आहेत. ज्यांस ते माहीत आहेत त्यांजकडून ते प्रथम समजून घेऊन व तें ज्ञान स्मरणांत ठेवून त्या अनुरोधानें आपली वर्तणूक ठेवणें व असें करीत असतां आपल्या वर्तणुकीपासून जे परिणाम अनुभवास येतील त्यावरून नियमांविषयींची खात्री करून घेणें ही पहिली पद्धत होय. दुसरी पद्धत म्हणजे भौतिकशास्त्राची पद्धत होय. कोणतीही गोष्ट गृहीत न धरतां भौतिक शास्त्रें नियम शोधितात. समजा, एकाद्या खोलींत अंधार आहे, त्या खोलीची रचना कशी आहे, तिचा विस्तार, तिचा आकार केवढा आहे, तींत कोणत्या जिनसा कोठें ठेविलेल्या आहेत, हें अंधारामुळें मुळींच दिसत नाहीं. अशा खोलींत तुम्ही समोर चालत गेलांत तर तुमचें डोकें कदाचित् एकाद्या जागेवर आदळेल, पण डोकें आदळल्यावर तें कशावर आदळलें, तेथें काय आहे हें तुमच्या लक्षांत येईल. व पुनः जेव्हां तुम्ही त्या खोलींत जाल तेव्हां येथें अमुक अमुक जिन्नस आहे, ती डोक्यास आपटूं देतां उपयोगी नाहीं, यासाठीं तुम्ही जरा बाजूनें जाल. त्या खोलींत जाऊन अंधारांत सगळीकडे हिंडावें, येथें डोकें ठेचाळलें, तेथें पाय घसरला, एकीकडे अमुक जिन्नस अंगावर पडली तर दुसरीकडे पायास भिंत लागली असे अनेक तऱ्हेचे अनुभव घेत घेत आणि चांचपडत व ठेंचाळत पुनः पुनः जावें व ठेंचा लागून शहाणें व्हावें ही भौतिकशास्त्राची नियम शोधण्याची पद्धत आहे. अंधाराच्या खोलींत चांचपडत जाणाऱ्या माणसास ज्या खोंका पडतील त्या त्यास खोलीच्या आकाराविषयीं, रचनेविषयीं, तींतील सामानाविषयीं माहिती करून देतात. असले अनुभव घेऊन शास्त्रज्ञ सृष्टिनियम शोधतात. नियमांचें उल्लंघन करून पाय मोडला म्हणजे हा येथें नियम आहे असें ते ठरवितात. व अशा रीतीनें शास्त्राची उभारणी होते. रॉजर बेकननें जे शोध केले त्यांचाच विचार कराना. तो मठवासी यति होता. शास्त्रांत शोध करणें म्हणजे धर्मभ्रष्ट होणें असें त्या वेळीं समजत असत व शोधकास गुन्हेगार समजलें जाई. रॉजर बेकन हा जरी वेषानें यति होता तरी त्याचा जीव शास्त्रशोधकाचा होता. त्या वेळीं रसायनशास्त्र बाल्यावस्थेंत होतें व रासायनिक पदार्थांचे गुणधर्म माहीत झालेले नव्हते. रसायनशास्त्र म्हणजे एक काळोखाची खोलीच होती. अशा

वेळीं बेकननें निरनिराळ्या पदार्थांचा रासायनिक संयोग घडवून आणावा व काय होईल तें पहावें असा त्याचा क्रम असे. कधीं स्फोट होई व त्याच्या आघातानें तो क्वचित् बेशुद्धही होऊन पडे. एकदां त्याचें बोट तुटलें, एकदां तर डोळा फुटला, पण तो निराश झाला नाहीं. तो तसेच पुढें प्रयोग करीत राहिला. खऱ्या शास्त्रज्ञांत असणारें धैर्य व धिमेपणा त्याच्या अंगीं होता. व एक डोळा फुटला तर फुटला, दुसरा तर धड आहेना, असा विचार करून त्यानें प्रयोग सुरू ठेविले. अशा प्रकारें ईश्वराचे नियम शोधण्यांत येऊन शास्त्रांची वाढ झाली आहे. सृष्टिनियम ह्मणजे ईश्वराचेच नियम होत. कारण सृष्टि ह्मणजे व्यक्त झालेला ईश्वर होय. आज रसायनशास्त्राचे प्रयोग करतांना तुम्हांस धास्ती नाहीं. आज शिकविण्यास प्रोफेसर आहेत व मार्ग दाखविण्यास पुस्तकें आहेत. तीं नवीन विद्यार्थ्यांस सांगतात, बाबांनो, नायट्रोजन व क्लोराईन् एकत्र करूं नका. कारण त्यांचा संयोग स्फोटक आहे. असा अनुभव आयताच हल्लींच्या विद्यार्थ्यांस मिळत असल्यामुळें अपघात टाळतात व शोधकांस भय नसतें. पण पूर्वींच्या शोधकांनीं जेव्हां शास्त्र बनविलें तेव्हां त्यांची स्थिति आजच्या विद्यार्थ्यांसारखी सुखाची नव्हती. त्यांनीं सोसलेल्या हालअपेष्टांमुळें आजचीं पुस्तकें व प्रोफेसर अस्तित्वांत आले आहेत.

## मनुष्याचे गुरु.

मागच्यास ठेंच व पुढचा शहाणा या न्यायानें जसा पूर्वींच्यांचा अनुभव नंतरच्या लोकांस उपयोगी पडतो, त्याप्रमाणें उत्क्रान्तींतही होतें. नव्या विद्यार्थ्यांस शिकविणाऱ्या प्रोफेसराप्रमाणें प्राथमिक स्थितींतील माणसांस उत्क्रान्तीचे नियम दाखवून देण्यास वडील माणसें असतात. सत्पुरुष, ऋषि, संत, धर्मस्थापक हीं तीं माणसें होत. ते मनुष्याच्या बाल्यावस्थेंत अमुक गोष्ट करावी, अमुक करूं नये, अशा प्रकारचा भौतिक शास्त्रांतील प्रोफेसराप्रमाणें उपदेश करतात. अमुक केल्यास धोका आहे, अमुक केल्यास त्यांत हित आहे असे त्यांनीं घालून दिलेले निर्बंध असतात. आम्हांस अनुभव आहे, तो अनुभव तुम्हीं घ्या, असें हे गुरु मनुष्यजातीस सांगत असतात. मनुष्यजात जी आरंभीं उत्क्रान्तिमार्गावर निघाली ती एकटी होती असें नाहीं—तिचेबरोबर हे गुरु होते व त्यांच्या अनुभवाचा तीस फायदा मिळण्याची व्यवस्था केलेली होती. हा अनुभव सृष्टिनियमांविषयींचा आहे. सृष्टिनियम खडकांप्रमाणें अभेद्य असतात व जो नावाडी त्यांस जुमानणार नाहीं

त्याचें तारू त्या खडकांवर आपटून तुकडे झाल्याविना रहावयाचें नाहीं. नीतीनें वागल्यास सुख मिळेल, अनीतीनें वागल्यास दुःख पदरांत येईल, गाडीच्या बैलाच्या पाठीमागें जशीं चाकें असतात तसें नीतीच्या पाठीमागें सुख व अनीतीच्या पाठीमागें दुःख हीं बांधलेलीं आहेत, अशी बुद्धाची शिकवण आहे. ही नीति–अनीति व सुख-दुःख यांची गांठ सृष्टिनियमांनीं बांधलेली आहे. गाडीचा बैल चालूं लागला म्हणजे मागून ज्याप्रमाणें चाक फिरत जातें त्याप्रमाणें नीतीच्या मागून सुख व अनीतीच्या मागून दुःख हीं नियमानें यावयाचींच. हें कां व्हावें याचा विचार आपण पुढील व्याख्यानांत करूं. थोडक्यांत सांगावयाचें झाल्यास नीति ही सृष्टिनियमांस धरून आहे, अनीति त्यांचे विरुद्ध आहे, म्हणून असले सुख--दुःखाचे परिणाम त्यांपासून होतात असें म्हणतां येईल. आतां लक्षांत इतकेंच घ्यावयाचें कीं, ऋषि वगैरेंची शिकवण ही सृष्टिनियमांच्या ज्ञानापासून निघालेली असते व जो तिच्या विरुद्ध वागेल तो सृष्टिनियमांवर आपटून ठेंचाळल्याशिवाय रहात नाहीं.

## प्राथमिक मानवी अवस्था.

संतांचा उपदेश व त्यांनीं घालून दिलेले नियम हे मनुष्याच्या बाल्यावस्थेंत त्याचे समोर असल्यामुळें त्यास सृष्टिनियमांची ओळख करून घेणें सुलभ होतें. जो संतांच्या शिकवणीच्या विरुद्ध जाईल त्यास आपल्या वर्तणुकीचे परिणाम भोगावे लागतात व तो स्वानुभव घेतल्यानंतर संतांचे विधिनिषेध योग्य आहेत हें त्याच्या मनावर ठसतें. प्रारंभीं प्रारंभीं मनुष्य अशा रीतीनें शिकून मधून मधून ठेंचा लागल्यामुळें शहाणा होतो व उत्क्रान्तींत पुढें जातो. एका रानटी मनुष्याचें उदाहरण घेतें, म्हणजे माझें म्हणणें अधिक स्पष्ट होईल. रानटी माणसाच्या वासना प्रबल असतात. आपलें देऊं नये, दुसऱ्याचें घ्यावें असें त्यास वाटत असतें व त्याच्या सभोंवतालचे जे दुसरे रानटी लोक त्यांचीही वृत्ति तसलीच असते. अर्थात् त्यामुळें कलह उत्पन्न होतात व ते त्यांस ज्ञान शिकवितात. एका रानटी माणसास कामवासना अनावर असल्यामुळें दुसऱ्याची बायको हवीशी वाटते व तिच्या नवऱ्यास मारून तो त्याच्या बायकोचा धनी होतो. दुसऱ्यापाशीं खाण्याचे पदार्थ पाहिले म्हणजे तेही आपणास पाहिजेत असें म्हणून तो ते बळजबरीनें त्याच्यापासून घेतो. त्यास वाटतें केवढी मौज झाली ! ही

पहा मला बायको मिळाली, तसेंच भुकेचें निवारण करणारें अन्नही माझ्या हातीं आलें ! पण लगेच त्याच्या दृष्टोत्पत्तीस असें येऊं लागतें कीं, आपल्या वर्तनामुळें आपण शत्रू उत्पन्न केले आहेत. या शत्रूमुळें म्हणा किंवा दुसऱ्या कारणानें म्हणा, त्यासही कमीअधिक कालानें यमाचें बोलावणें येतें व तो मरतो. पण मरण्यानें कांहीं जीवात्म्याचा निकाल होत नाहीं. शरीर मरतें व जीवात्मा कामलोकांत ( भुवर्लोकांत ) जातो. ज्या माणसांचे त्यानें जीव घेतले होते ते व इतर शत्रु त्यास तेथें भेटतात. त्यांपासून त्यास पुष्कळ दुःख भोगावें लागतें व त्या दुःखाच्या अनुभवावरून त्यास समजून येतें कीं, वाईट वासना दुःखदायक असतात. या समजुतीचा थोडासा परिणाम त्याच्या मनावर कायम रहातो. त्या माणसानें त्या स्त्रीवर प्रेमही केलें होतें व तीपासून झालेला मुलगाही त्याच्या आवडीचा होता. मरणोत्तर प्रेतलोकांतून तो पुढें पितृलोक व स्वर्गलोक यांमध्यें जातो व तेथें त्या माणसाची आपल्या बायकांपोरांविषयीं जी प्रेमबुद्धि होती तिचा विकास होतो. त्याचें प्रेम शुद्ध होतें असें नाहीं. पण त्यांत शुद्धपणाचा कांहीं अंश होता. बायको किंवा पोर आजारी पडलें म्हणजे त्याची शुश्रूषा करणें हें निःस्वार्थी प्रेमाचें दर्शक आहे. असले अनेक प्रसंग त्या माणसावर आलेले असावयाचे. मेल्यानंतर स्वर्गलोकांत या प्रेमशक्तीचा परिणाम होतो; व प्रेम करण्याचें अधिक अधिक सामर्थ्य त्याच्या अंगीं येतें. स्वर्गलोकांत शुद्ध प्रेमाचें जें बीज असेल त्याचाच फक्त विकास होतो. तेथें त्यास आपलीं बायकापोरें भेटतात व त्यांच्या सान्निध्यानें त्याच्या मनावर जे परिणाम तेथें होतात, त्यामुळें त्याचा प्रेमळपणा अधिक अधिक फुलतो व दुसऱ्यावर प्रेम करण्याचे संस्कार दृढ होतात. अशा प्रकारें वाईट वृत्ति निर्बल होऊं पहातात व चांगल्या वृत्ति प्रबळ होऊं पहातात. पुनः तो माणूस जन्म घेऊन आला म्हणजे तो आरंभापासूनच उत्क्रान्तींत अमळसा पुढें आलेला असतो व या दुसऱ्या जन्मांत तो जें नवें कर्म करील त्याचे त्या जन्मीं व मरणोत्तर होणारे परिणाम भोगल्यानंतर तो आणखी पुढें जातो. अशा क्रमानें रानटी मनुष्य दर जन्मीं किंचित् किंचित् उत्क्रान्त होतो. त्याची प्रगति फार सावकाश होते. शंभर जन्मांच्या अवधींत त्यानें थोडेंसें पुढें जावें इतकी मंद त्याच्या उत्क्रान्तीची चाल असते. पण संत वाट दाखविण्यास असले म्हणजे प्रगति जलद होते.

## पुढील स्थिति.

अशा रीतीचे पुष्कळ जन्म तो घेतो व हळू हळू आपण ज्यास मध्यम प्रतीचा मनुष्य म्हणतों तितका त्याचा दर्जा होतो. इंग्रजींत ज्यास Man in the street असें म्हणतात, त्या दर्जाचा हा आतां विशेष बरा नव्हे व विशेष वाईटही नव्हे असा मनुष्य झाला. येथपर्यंतच्या उत्क्रांति-मार्गांत त्याच्या मनाची कांहीं वाढ झालेली असते व त्यास विचार करण्याची शक्तिही आलेली असते. त्यास जे यापुढें दर जन्मीं अनुभव येतात त्यांत विविधपणा अधिक असतो व वासना नानाप्रकारच्या होतात. अनेकांविषयीं प्रेम तसेंच अनेकांविषयीं द्वेष त्याच्या मनांत येऊन त्याच्या वृत्तींत जास्ती वैचित्र्य आलेलें असतें. बहुत प्रकारच्या दुर्वासना त्यास असतात व कांहीं सद्वृत्तिही असते. असें झाल्यामुळें दरजन्मीं तो अधिकाधिक अनुभवाचा संचय करितो, त्याचे परिणामही पुष्कळ व विविध प्रकारचे होतात. प्रगतिही अधिक जलद होत जाते. जसा एकादा पक्षी सदा अंतरिक्षांत फिरत असावा व मध्येंच त्यानें जमिनीजवळ यावें, पाण्यांतील मासा चोंचींत धरावा व पुनः आकाशांत उड्डाण करावें तसें मनुष्याचें आहे. मनुष्याचें घर उच्च लोकांत. तेथें तो रहातो, व अनुभवरूपी भक्ष्य धरण्याकरितां भूलोकावर उतरतो व तें भक्ष्य घेऊन पुनः लगेच भरारी मारून उच्च लोकांत परत जातो. भूलोकावर जो अनुभव मिळविला असेल त्याचे परिणाम तो उच्च लोकांत भोगतो व त्यास विचार करून कार्य कोणतें, कारण कोणतें हें ठरविण्याची शक्ति असल्यामुळें अमुक वर्तनाचा परिणाम अमुक होतो, त्यापासून अमुक दुःख किंवा सुख होतें, हें त्यास समजून येतें व अशा प्रकारानें नीति–अनीतीचे सृष्टिनियमही ठरवितां येतात. त्याच्या कृत्यांपैकीं जीं वाईट असतात त्यांचा परिणाम त्यास प्रथम भुवर्लोकांत अनुभवावा लागतो. चांगल्या गोष्टींचा परिपाक नंतर स्वर्ग लोकांत होतो. येणेंप्रमाणें उत्क्रान्तिमार्गावर वाईट संस्कारांचें निर्मूलन होतें व चांगल्या प्रवृत्ति दृढ होतात, स्वर्गांतील अनुभवापासून प्रेम करण्याचें अधिक सामर्थ्य त्याच्या अंगीं येतें, तसेंच दुसऱ्याची सेवा करावी, दुसऱ्याच्या हक्कांस मान द्यावा ही बुद्धि उत्पन्न होते, सद्वासनांचा सांठा अधिकाधिक वाढत जातो व त्याच्या बुद्धीचाही विकास होतो. विचारशक्तीनें मनुष्याची घडण घडली जाते असें जें ' अथ स क्रतुमयः पुरुषः, यथा

क्रतुः अस्मिन् लोके पुरुषो भवति तथेतः प्रेत्य भवति" या वचनांत ऋषींनीं म्हटलें आहे तें सर्वथा खरें आहे. कारण स्वर्गलोकांत मनुष्याचा जो काळ जातो त्यांत त्यानें भूलोकीं घेतलेल्या अनुभवाचें रूपान्तर होऊन त्याचे अंगीं नवीन नवीन शक्ति येतात. जिवंत असतांना ज्या त्याच्या उच्च आकांक्षा असतील त्या मृत्यूच्या द्वारानें तो पुढें जातो तेव्हां त्याचेबरोबर बिनहरकत जाऊं शकतात व त्याच्या मनाशीं स्वर्गलोकांत एकजीव होतात. एकजीव होऊन त्या त्याच्या स्वभावांत मुरल्या, म्हणजे ततःपर त्याच्या वृत्तींचें तें एक अगच बनतें. असें होऊन ज्याप्रमाणें उभ्या आडव्या धाग्यांनीं कापड विणलें जातें तसें मनोवृत्तींनीं त्याचें मन विणलें जातें. पुढें दर जन्मीं मनुष्य जो येतो तो प्रारंभापासूनच निरनिराळ्या शक्ति, निरनिराळे अधिकार व निरनिराळे गुण घेऊन येतो. तो अधिक बुद्धिमान्, अधिक नीतिमान्, अधिक समर्थ व कार्यकारी व जगाच्या सेवेस अधिक लायक असा सावकाशपणें बनत जातो. ही कमाई अनेक जन्मांची असते. एकाद्या मनुष्यास सारासार विचार करून कोणत्याही गोष्टीचा निर्णय करण्याची शक्ति कमी असते. त्यामुळें त्याच्या हातून चुका होतात व त्याचें नुकसान होतें. त्याचें स्मरण स्वर्गलोकांत जीवात्म्यास राहून स्वतःच्या विचारशक्तीनें तो तेथें निर्णयशक्तीची वाढ करितो व पुढच्या जन्मीं त्या बाबतींत थोडीअधिक निर्णयशक्ति घेऊन येतो. अशा प्रकारें कांहीं गुणांनीं जीवात्म्याची बौद्धिक बाजू व कांहीं गुणांनीं त्याची नैतिक बाजू घडली जाते व सर्व अंगांनीं त्याचा विकास होतो.

## वैराग्याचा उदय.

मनुष्यानें दर जन्मीं जे जे प्रयत्न केले असतील त्यांपैकीं एकही फुकट जात नाहीं. एकाद्या लहान मुलांत एकादी शक्ति विशेष आढळली तर त्यानें पूर्वी जे अनेकवार श्रम केले असतील त्यांचें तें फळ होय हें लक्षांत ठेविलें पाहिजे. कोणताही एकादा गुण किंवा कोणतीही शक्ति तुमच्या अंगीं विशेषशी असली तर त्यासाठीं तुम्हीं पुष्कळ खटपट केलेली आहे हें खास. जशी माणसाच्या शारीरिक सामर्थ्याची गोष्ट आहे तशीच मनाच्या सामर्थ्याची आहे. शरीरपोषणासाठीं मनुष्य अन्न खातो, तें पक्वाशयांत पचविलें जाऊन शरीराशीं एकरूप होतें व त्यानें मेंदूची, स्नायूची व मज्जातंतूंची वाढ

१ छांदोग्योपनिषत्.

होते. त्या अन्नांतील जो निरुपयोगी अंश असतो त्याचा मळरूपानें शरीराकडून त्याग केला जातो. अशा रीतीनें एकदां जेवलेल्या जेवणाचा शरीरांत परिपाक झाल्यावर त्यापासून शरीरानें आपल्या वाढीकरितां जीं जीं जरूर तीं तीं द्रव्यें घेऊन शरीराची बांधणी केली म्हणजे पुनः मनुष्यास भूक लागते व तो पुनः अन्न खातो. दर जन्मीं मनुष्य जे जे उद्योग करितो त्यांचाही असाच मरणोत्तर अनुभवरूपी परिपाक होऊन त्यांतील वाईट भाग जीवात्मा टाकून देतो व सत्वाचा स्वीकार करतो, व अशा रीतीनें अनुभव संपून गेल्यानंतर त्यास पुनः भूलोकाची भूक लागते व दुसरा जन्म घेतो, हा मीं मवांशीं सांगितलेला पुनर्जन्माचा नियम आहे. अशा पुनर्जन्माच्या येरझारा एकसारख्या चालू असतात. आरंभीं माणसाची प्रगति अगदीं थोडी होत असते, पण पुढें भराभर होऊं लागते. प्रगति होऊन बराच पुढें गेल्यावर त्याच्या वृत्तींत बदल होऊं लागतो. नंतर भूलोकीं त्यास पैसा मिळविण्याचा कंटाळा येऊं लागतो व सत्तेची हौसही मंदावत जाते. त्यास खरी भूक लागली असल्यानें सत्ता व धन यांनीं ती शमेनाशी होते. पुष्कळ पैसा मिळवावा पण मिळविल्यानंतर त्याचा स्वतःस भार वाटतो, हवी तितकी सत्ता संपादन करावी, पण त्यानेंही निराशा होते व चित्तास समाधान मिळत नाहीं, असा मनुष्यास अनुभव येतो व ऐश्वर्य, संपत्ति इत्यादिकांकडे त्याचें मन ओढ घेईनासें होतें. त्याच्या मनास आंतून शाश्वत वस्तूची ओढ लागलेली असते तेव्हां दोन दिवस टिकणाऱ्या वस्तूंनीं त्याचें समाधान कसें व्हावें. मनुष्यरूपी ईश्वरी अंशास जी तृष्णा लागली ती प्रेमानें ओथंबलेल्या अनाद्यनंत ईश्वराशिवाय दुसऱ्या कशानेंही शांत होणें शक्य नाहीं, तेव्हां अर्थातच त्यास अशाश्वत वस्तूंच्या संग्रहाचा कंटाळा येतो. सभोंवतालच्या वस्तू त्याचें विटलेलें मन ओढून धरूं शकत नाहींत. त्याच्या अंगीं वैराग्य येतें व या वैराग्यरूपी देवी असंतोषानें भरल्यामुळें तो दुसरीकडे शोध करूं लागतो. त्यास शाश्वत समाधान पाहिजे असतें. एका कवीनें म्हटलें आहेः—

प्रथम जयिं हरीनें जीव हे निर्मियेले।
कलश जवळि ठेवी मंगलीं जे भरीले ॥
म्हणत " करिन वृष्टी मंगलांचीच सर्व ।
मनुजिं सकल येवो सृष्टिचें जें अपूर्व ॥ १ ॥

" जगतिं पसरलासे मंगलाचा पसारा ।
परि जगतिं पडे तो आज संकीर्ण सारा ॥

सकल मिळुनि आतां मंगलें एक व्हावीं ।
सकलहि इतुक्याशा जीविं ह्या तीं रहावीं " ॥ २ ॥
प्रथम हरि करी तें पूर्ण सामर्थ्य-दृष्टि ।
मृदु मग सुख वाहे, मान कीं ज्ञान येती ॥
सकल खुलवि विश्वा तेंहि सौंदर्य आलें ।
थबकुनि मग तेव्हां ईश्वरें पाहियेलें ॥ ३ ॥

' अजुनि उरुनि कुंभीं कांहिं का राहिलेंसे ? '
बघत, उरलि तेव्हां एक ' विश्रान्ति ' दीसे ॥
" अधि परि जरि ही ही देइ मीं हृष्ट जीवां ।
परतुनि " हरि चिंती " जीव हो केंवि यावा ? ॥ ४ ॥

जगतिं तरिहि माजे वाद सारा स्वभाव[1] ।
पुसत कुणि कशाला कोण हा काय देव !
वितरिं सकळ मी, हे विस्मृती पावुनियां ।
सुखचि हरि गणोनी जीव जातील वांया ॥ ५ ॥

" फसुनि जगिं तरी हें जीवही व्यर्थ गेलें ।
करुनिच इतुकेंही मीहि हें व्यर्थ केलें ॥
खचित न कधिं ऐसा सृष्टिचा अंत होवो ! ।
तदपि जगतिं जीवां अल्प विश्रान्ति लाहो ॥ ६ ॥

" जगतिं कधिं न तृप्ती, पूर्ण विश्रान्ति, राहो ।
करुनि करुनि यत्ना जीव हा क्लान्त होवो ॥
जगिं धन मिळवोनी अंतिं त्या वीट येवो ।
बघुनि विफल सारें त्रस्तता प्राप्त होवो ॥ ७ ॥

" गमत मजासि जीवां भक्ति निर्माण व्हावी ।
परतुनि मग येण्या बुद्धि त्यांतें सुचावी ॥
परि जरि हृदिं कोणां भक्ति येईच ना हो ।
गुरु तरि परताया त्रस्तता हीच होवो[2] " ॥ ८ ॥

हें अगदीं खरें आहे. जगांतील कोणत्याही गोष्टीनें माणसाच्या मनास कायमचें सुख मिळूं शकत नाहीं. पैसा, अधिकार, मान्यता इत्यादिकांच्या पाठीस मनुष्य सुख मिळविण्याकरितां लागतो, पण तीं प्राप्त झालीं ह्मणजे लगेच सुख देईनाशीं होतात—माणसाचा हात लागला ह्मणजे हीं दुरून साजरीं दिसणारीं फुलें कोमेजून जातात. लहान मुलासमोर त्याची आई जशी रंगीत खेळणीं धरते त्याप्रमाणें ईश्वर मनुष्यासमोर संपत्ति वगैरे खेळणीं नाचवितो. हेतु हा कीं, तीं घेण्यास मनुष्यानें धांवून यावें, त्यासाठीं हरप्रयत्न करावा व असें करीत असतांना त्याचा निश्चय, त्याची बुद्धि,

---

१ स्वभाववाद. हा योगवासिष्ठांत सांगितला आहे. हे हल्लींचे नेचरवाले. सर्व कांहीं स्वभावतःच—'नेचरनें' होतें व झालें असें यांचें ह्मणणें आहे. २ George Herbert.

त्याचा उद्योग, त्याचें सामर्थ्य इत्यादि गुणांची वाढ व्हावी. पैसे मिळवून श्रीमान् होण्याच्या खटाटोपांत माणसाचें सामर्थ्य वाढत जातें. पण आईनें पुढें केलेलें तकलादी खेळणें मुलानें घेतलें म्हणजे तें जसें लवकरच मोडून जातें त्याप्रमाणें ऐहिक गोष्टी हस्तगत झाल्या ह्मणजे त्याही मोडतात व मन आकर्षण करीनाशा होतात. ईश्वरानें तुम्हांपुढें जीं खेळणीं धरलीं आहेत त्यांस वस्तुतः कांहीं किंमत नाहीं. तीं फक्त तुमचें मन आकर्षण करण्याकरितां आहेत व तीं घेण्याच्या आशेनें तुम्हीं शिकावें असा ईश्वराचा हेतु आहे. किंमत आहे ती तुम्ही जे श्रम करतां त्यांस आहे. पृथ्वीवरील सुवर्णानें जीवाची तहान भागूं शकत नाहीं. जी आई मुलास चालावयास न शिकवितां स्वतः त्यास उचलून नेते तिची बुद्धि मूढ आहे असें आपण मानतों. कारण मुलास चालावयास न शिकवितां त्यास ती नेहमीं कडेवर घेऊन जाईल तर तो कधींही चालावयास लागणार नाहीं. मनुष्य हा ईश्वराचें लेंकरूं आहे व तो शहाण्या आईप्रमाणें मुलास स्वावलंबी होण्यास शिकवितो. भोग्य पदार्थांत पैसा, सुख, सत्ता यांत ईश्वर लपून राहिलेला आहे; व ह्मणूनच या वस्तु माणसाचें मन मोहीत करतात व त्यांच्यामागें मनुष्य लागतो. त्या वस्तु माणसास प्राप्त झाल्या ह्मणजे त्यांमध्यें इतका वेळपर्यंत लपून राहिलेला ईश्वर चटकन् निघून बाहेर जातो. ही माणसास शिकविण्याची ईश्वराची रीत आहे. ह्या पद्धतीनें आपण शिकून बुद्धीनें व नीतीनें मोठे होतों व नंतर ऐहिक वस्तु मनाचें आकर्षण करीतनाशा होतात. ‘ विषया विनिवर्तन्ते निराहारस्य देहिनः ।’ पुढें श्रेष्ठ मनुष्यापासून विषय दूर जाऊं लागतात, त्यांनीं माणसाच्या शक्तीचा विकास करण्याचें काम संपविलेलें असतें, तेव्हां ते विषय त्या श्रेष्ठ माणसाजवळ राहून उपयोग काय ? त्यांचें काम झालेलें असतें म्हणून ते दूर जाऊं लागतात व दुसऱ्या एकाद्या माणसाच्या जवळ जाऊन त्यास आपल्यामागें पळावयास लावितात. श्रेष्ठ माणसास खऱ्या ईश्वराविना दुसरा कोणीही ओढूं शकत नाहीं व तो भेटला म्हणजे विषयांची चवही नाहींशी होते. ‘ रसवर्जं रसोप्यस्य परं दृष्ट्वा निवर्तते ’ असें या स्थितीस अनुलक्षून श्रीकृष्णांनीं म्हटलें आहे. सर्व सौंदर्याचा ठेवा जो ईश्वर तो एकदां दृष्टीस पडला म्हणजे, त्याच्याच सौंदर्याच्या अंशानें सुंदर दिसणारें पृथ्वीवरील सौंदर्य त्या माणसाच्या मनास गुंतवूं शकत नाहीं. ह्या पृथ्वीवरील सौंदर्यांत पूर्वी माझें मन गुंतत असे ही आठवण मात्र पुढें राहते व त्यांतील सौंदर्य तरी मूळचें ईश्वराचें आहे व

त्यानें आपणांस शहाणपणा शिकविला आहे या स्मरणामुळें त्याविषयीं आदरबुद्धिही मनांत असते, पण पुढें त्यांत मन गुरफटून मात्र रहात नाहीं.

अशा प्रकारें पुढें जाऊन ईश्वर भेटला म्हणजे सर्व सामर्थ्य व सर्व प्रेम त्याच्यांत आहे असें मनुष्यास आढळून येतें. सृष्टीच्या पसाऱ्यांतील जडांशाचीं नानाविध रूपें जरी उत्क्रान्तिक्रमांत नाश पावत असलीं तरी प्रेमास्पद अशी कोणतीही वस्तु खरोखरी नाश पावत नाहीं, याचा त्यास प्रत्यक्ष अनुभव येतो. पुरुषास स्त्रीविषयीं प्रेम वाटतें, त्यांत वावगें असें कांहीं नाहीं. प्रेम ही चित्तशुद्ध करणारी मोठी शक्ति आहे. पुरुषाच्या मनाचें आकर्षण ज्या कारणामुळें स्त्री करूं शकते तें पुरुषाच्या डोळ्यांत भरणारें सौंदर्य तरी ईश्वराच्याच घरचें आहे, ' नवा अरे पत्युःकामाय पतिः प्रियो भवति, आत्मनस्तु कामाय पतिः प्रियो भवति '--पति आवडतो तो पतीकरितां आवडतो असें नाहीं. भार्येस्तव भार्या प्रिय वाटते असें नाहीं. पुत्राकारणें पुत्राविषयीं वात्सल्य वाटतें असें नाहीं. तर पति, पत्नी व पुत्र हीं त्या सर्वांत असलेल्या आत्म्यास्तव प्रिय वाटतात. तो एकच आत्मा त्या सर्वांत विभक्त झाल्यानें तीं परस्परांस आकर्षितात. त्यांनीं आपलें मन ओढून घ्यावें हें योग्य आहे. ही प्रेमाची शक्ति पुढें कदापि नाश पावावयाची नाहीं. कारण जे जीवात्मे उत्क्रान्तिमार्गांत एकमेकांचे स्नेही होतात ते सर्व प्रवासभर एकमेकांच्या सोबतीनें मार्गक्रमण करीत रहातात व पुढें त्यांची ताटातूट होत नाहीं.

## अखेर.

प्रवृत्तिमार्गानें पुढें गेलेला मनुष्य हळूहळू पृथ्वीवरील सुखांस कंटाळत जाऊन त्याच्या मनांत येणेंप्रमाणें वैराग्य दृढमूल होतें व ऐहिक विषयांकडे पाठ फिरवून तो निवृत्तिमार्गानें पुढें चालूं लागतो. वैराग्याच्या पुढची पायरी म्हणजे निष्काम बुद्धीनें केलेल्या जनसेवेची किंवा लोकसंग्रहाची होय. हा लोकसंग्रह करीत असतांना त्याच्या मनांत स्वार्थबुद्धि व ममत्व ह्यांचें वास्तव्य असत नाहीं. स्वतःसाठीं अमुक अमुक करावें ही त्याची बुद्धि पूर्वींच लयास गेलेली असते. जी ईश्वरी इच्छा जगच्चक्र फिरवीत आहे त्या इच्छेनुसार सेवा करीत रहाणें हें ध्येय मनांत वागवून त्यानें स्वतःस जगाच्या कल्याणास अर्पण केलेलें असतें. स्वतःकरितां जरी कांहीं करणें त्यास जरूर नसलें तरी ईश्वराच्या मनोगताप्रमाणें सृष्टीचें यंत्र फिरविणें व त्याच्या संकल्पाप्रमाणें पृथ्वीवरील योजना घडवून आणणें हीं कामें करावयाचीं असतात व वैरा-

ग्यानें शुद्ध होऊन ज्यानें फलेच्छेवर तुळशीपत्र ठेविलें तो पुरुष या मार्गानें लोकसंग्रह करीत रहातो. गीतेंत श्रीकृष्ण अर्जुनास सांगतात 'बा अर्जुना! या तिन्ही लोकांत मला स्वतःचें असें कर्तव्य उरलें नाहीं. पण जर मी स्वस्थ बसेन व कर्मच्च अजीबात सोडून देईन, तर ह्या जगद्रूपी उत्क्रान्तीच्या शाळेचा विध्वंस होऊन सर्वत्र संकर होईल व मानवी प्रजेचा नाश होईल. या कारणामुळें तो पुरुष लोकसंग्रह करीत असतो, गीतेंत सांगितल्याप्रमाणें ईश्वरी सूत्र हृदयांत वागवून श्रेष्ठ माणसानें इतरांस आपल्या वर्तनानें धडा घालून द्यावा, अज्ञांचा बुद्धिभेद न करितां त्यांमध्यें कर्माची अभिरुचि उत्पन्न करावी[1] व जगाची स्थिति नीट रहावी म्हणून निरपेक्षपणें सतत कर्म करीत असावें हें मनुष्याचें अखेरचें ध्येय आहे व निवृत्तिमार्गाच्या शेवटास पोंचलेला मनुष्य या ध्येयाच्या अनुसंधानानें जगाच्या हितार्थ वर्तत रहातो. त्यांच्या हातून होणारें कर्म त्यास बंधक होत नाहीं. कर्माचा पाश त्यांतील ममत्वबुद्धींत आहे, ती ममत्वबुद्धि सुटली म्हणजे कर्माचा बंध तुटतो. 'यज्ञार्थात् कर्मणोन्यत्र लोकोयम् कर्मबंधनः' हें गीतावचन आहे. अर्थात् निरहंकार बुद्धीनें जो मनुष्यजातीच्या हितार्थ खटपट करितो त्यास कर्म बांधूं शकत नाहीं. आर्यांची जी जुनी चातुर्वर्ण्य–व्यवस्था होती त्यांतील पहिला शूद्रवर्ण ह्मणजे इतर वर्णांची सेवा करणाऱ्यांचा वर्ग होता. मनुष्य उत्क्रान्तिमार्गाच्या शेवटापर्यंत पोंचला व संन्यासी बनला ह्मणजे शूद्रांचें जें सेवेचें कर्तव्य तें तो वरच्या भूमिकेवर व मोठ्या प्रमाणावर करूं लागतो. पूर्वकाळची वर्णाश्रमधर्माची व्यवस्था उत्क्रान्तीस पोषक होती. प्रथम शूद्रवर्णांत जन्म घेऊन उत्क्रान्तींतील आरंभींचे धडे शिकावे, पुढें वैश्यवर्णांत जन्म घेऊन वैश्याचे गुण अंगीं आणावे, नंतर क्षत्रिय होऊन क्षात्र धर्म शिकावा व प्रगति करावी, पुढें सर्वांत वरचा जो ब्राह्मणवर्ण त्याचीं कर्तव्यें करावीं व असें क्रमानें करीत शेवटीं परमहंस व्हावें, मुक्त व्हावें अशी वर्णव्यवस्था पूर्वी ठरविलेली होती.

ही आरंभापासून शेवटपर्यंत जी उत्क्रान्ति होते ती कर्माच्या नियमानुसार सतत होत असते. जसें करावें तसें भरावें, हा तो नियम आहे व तो अनुल्लंघनीय आहे. 'Be not deceived: God is not mocked: for whatsoever a man soweth that shall he also reap'—प्राण्या भुलूं नको,

---

1 जोषयेत् सर्वकर्माणि विद्वान्युक्तः समाचरन् । गीता ३, २६.

ईश्वराची अवज्ञा होणें नाहीं, कारण जसें पेरावें तसें उगवतें—असें ख्रिस्ती धर्मांतील वचन आहे. आज ख्रिस्ती लोक सांगतात त्याप्रमाणें मोक्ष हा कांहीं ईश्वराच्या कृपेनें ( divine grace ) मिळावयाचा आहे असें नाहीं. एकाचीं पापें दुसऱ्यावर लादून किंवा दुसऱ्याचें पुण्य आपण घेऊन मोक्ष मिळत नसतो. प्रत्येकानें स्वतःच्या उत्क्रान्तीकरितां व मोक्षाकरितां खटपट केली पाहिजे तरच यश मिळेल. ईश्वराची कृपा आहे खरी, पण तिचा फायदा घेण्यांत प्रत्येकानें परिश्रम केले पाहिजेत, त्याशिवाय मोक्षाचें गांठोडें ईश्वराच्या कृपेमुळें कोणी आपल्या हातीं अचानक आणून थोडेंच देणार आहे! Doctrine of Divine Grace—ईश्वरी कृपेचा सिद्धांत—म्हणून जो ख्रिस्ती धर्मांत आहे त्याचा अर्थ प्रयत्नाशिवाय माणसास मोक्ष मिळतो असा नाहीं. सर्वत्र सूर्य प्रकाशत असला तरी जर आपण आपल्या घराची खिडकी उघडली नाहीं तर तो प्रकाश आपणास काय उपयोगी? सूर्यप्रकाशाप्रमाणें ईश्वराची कृपा सर्वत्र आहे. तिचा प्रवेश माणसाच्या अंतःकरणांत केव्हांही होण्यासारखा आहे, पण त्यासाठीं त्यानें आपल्या अंतःकरणाचे दरवाजे खुले केले पाहिजेत. ईश्वराच्या साम्राज्यांत जावयाचें असलें तर त्याच्या दाराशीं जाऊन तें ठोठाविलें पाहिजे म्हणजे तें उघडेल. तुम्हीं सूर्याकडे पाठ फिरविलीत म्हणून जसें सूर्याचें तेज कमी होत नाहीं पण तुम्ही मात्र प्रकाशास अंतरतां तोच प्रकार ईश्वरी कृपेचा आहे. खिडकी बंद केल्यावर घरांत काळोख झाल्यास त्याचा दोष सूर्याचा नाहीं; व प्रयत्न केल्याविना जर ईश्वरी कृपेचा लाभ झाला नाहीं तर त्याचें कारण ईश्वरस्वभावांत शोधावयास नको. सूर्याकडे पाठ केल्यास डोळ्यांसमोर सांवली दिसते व सांवली म्हणजे प्रकाशाचा अभाव होय. पण ही सांवली आपली आहे, आपण पाडिली आहे, सूर्यप्रकाशांत कांहीं वैगुण्य नाहीं हें आपण लक्षांत ठेविलें पाहिजे. ईश्वरास विन्मुख न होतां सन्मुख झालों म्हणजे डोळ्यांपुढचा अंधकार नाहींसा होऊन त्याचा प्रकाश आपल्या अंतःकरणांत जाऊं शकेल. ईश्वरस्वरूप प्राप्त करून घेणें हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व त्यासाठीं मी नेटानें अखंड प्रयत्न करीन, हा निश्चय माणसाच्या मनां बाणला म्हणजे त्याचा भाग्योदय त्याच्या पुढेंच आहे. कारण मनुष्या, तूं ईश्वराहून निराळा नाहींस.—तूं तोच आहेस—तत् त्वम् असि ।

# नीति आणि अनीति.

आज ज्या विषयाचा विचार आपणांस करावयाचा आहे तो कठीण व मोठ्या भानगडीचा आहे. कार्य कोणतें, अकार्य कोणतें, नीति कोणती अनीति कोणती, या प्रश्नांविषयींचे बहुजनसमाजाचे विचार पाहिले तर त्यांत कांहीं ताळतंत्र असल्याचें दिसून येत नाहीं व सुशिक्षित लोकांच्या विचारांमध्येंही या विषयासंबंधानें पुष्कळ घोंटाळा आढळून येतो. अमुक आचार नीतीचा व अमुक आचार अनीतीचा हें ज्या नियमानें ठरवावयाचें तो नियम मनुष्यास समजेल अशा गोष्टींवर व ठरींव तत्त्वांवर बसविलेला असला पाहिजे. नाहींतर त्या नियमाचें रहस्य मनुष्याच्या ध्यानांत येत नाहीं व त्याची वर्तणूक आंधळेपणाची होते. नीति-अनीति हीं ओळखण्याचीं ठरींव तत्त्वें मनुष्यास अवगत नसलीं ह्मणजे तो व्यवहारांत अनेकशः किंकर्तव्यमूढ होतो व कित्येकदां तर त्यास असें वाटतें कीं, नीति व अनीति यांमधील भेद नेहमीं दाखवूं शकणारी कसोटी सांपडणेंच शक्य नाहीं. कांहीं लोकांचें असें ह्मणणें आहे कीं, नीति ही परिस्थितीवर अवलंबून असत नाहीं तर ती कधींही न बदलणारी, शाश्वत व सर्व काळीं एकच अशी असते. या विचाराचा असा परिणाम होतो कीं, सर्व लोकांच्या वर्तणुकीस सरसकट नीतीचें एकच प्रमाण लावण्यांत येऊन जी गोष्ट साधु, संत किंवा संन्यासी यांस नीतीची असते ती सामान्य मनुष्यासमोर अनुकरणीय म्हणून मांडण्यांत येते. असाच प्रकार होऊन ख्रिस्ती धर्मांतील गिरीवरील प्रवचन ( Sermon on the Mount ) किंवा श्रीमद्भगवद्गीतेंतील निष्काम कर्म करण्याची शिकवण हीं सर्व लोकांस सारखींच लागू आहेत असें आज लोक समजत आहेत व त्यामुळें अर्थातच लोकांच्या बोलण्यांत व करण्यांत मेळ राहूं शकत नाहीं. अमुक एक गोष्ट नीतीची, असें तोंडानें म्हणावयाचें व व्यवहारांत मात्र ती नीति बाजूस गुंडाळून ठेवावयाची असा आचार व विचार यांचा विरोध यामुळेंच उत्पन्न होतो. गिरीवरील प्रवचनांतील आज्ञा सर्वांनीं मानल्या पाहिजेत असें एकीकडे म्हणावयाचें व राष्ट्रा–राष्ट्रांच्या संबंधांत त्या आज्ञा खुशाल मोडावयाच्या हा प्रकार आपण पहातच आहों. इंग्लंडांतील एका बिशपनें असें म्हटलें आहे कीं, त्या आज्ञांप्रमाणें जर एखादें

राष्ट्र चालूं लागेल तर त्याची इतिश्री होण्यास आठ दिवस सुद्धां लागावयाचे नाहींत. हें म्हणणें अक्षरशः खरें आहे. एक अंगरखा जर चोरानें चोरला तर दुसराही त्यास देऊन टाकावा ही शिकवण जर अमलांत आणली तर चोरास दोन अंगरखे व सावास मुळींच नाहीं अशी अवस्था होईल. एका गालावर चपराक बसली तर दुसरा गाल पुढें करावा हें प्रतिकार न करण्याचें तत्त्व जर व्यवहारांत आणिलें तर जुलमी लोकांस पाहिजे तें करावयास सांपडेल व प्रतिकार केल्यानें जी प्रगति व्हावयाची ती बंद होईल. पाश्चिमात्य राष्ट्रांनीं आपल्या धर्मग्रंथांतील या आज्ञा एका बाजूस ठेविल्या आहेत. व्यवहारांत नीति-अनीतीचा विचार करतांना ते सारासारबुद्धीनें वागतात. ते वाइटापुढें मान न लवविता त्याचा प्रतिकार करितात, जशास तसें या न्यायाचा आश्रय करितात, कोणी अन्याय व जुलूम करूं लागल्यास उलट हात उगारण्यास कमी करीत नाहींत. बोलावयाचें एक व करावयाचें एक अशी जोंपर्यंत स्थिति आहे तोंपर्यंत कितीही सुंदर नियम घालून दिलेले असले तरी त्यांचा उपयोग होत नाहीं. कारण सत्कर्म करण्यास जो मनाचा निश्चय व जोम लागतो तो हे नियम उत्पन्न करूं शकत नाहीं. पौर्वात्य देशांतही अशीच स्थिति आहे. गीतेंत जो फलासक्ति सोडून कर्म करण्याचा कर्मयोग भगवंतांनीं सांगितला आहे तो अर्जुनासारख्या श्रेष्ठ पुरुषास सांगितलेला आहे. संसारावर आसक्ति असणाऱ्या सामान्य प्रतीच्या माणसास जर तुम्हीं फलेच्छा सोडून कर्म करण्यास सांगितलें तर तो आळशी व कर्तव्यपराङ्मुख होईल. फळ मिळविण्याच्या लालचीमुळेंच जो मनुष्य कर्म करितो त्यास फल मिळविण्याची इच्छा धरूं नको असें शिकविलें तर कर्मास प्रवृत्त करणाऱ्या त्याच्या प्रेरणेवरच घाव घातल्यासारखें होतें व ती प्रेरणा नाहींशी झाली म्हणजे तो निरुद्योगी बनतो. फळाची अपेक्षा सोडून कर्म करणें ही सर्वांत श्रेष्ठ पायरी आहे हें मला कबूल आहे. पण सिद्धावस्थेस पोंचलेल्या लोकांचे नियम जर अर्धवटबुद्धीच्या माणसांस आपण लावूं तर अनर्थ होईल. सिद्धास लागू असलेला नियम सामान्य माणसाचा नियमच नव्हे. ईश्वराच्या सूत्राप्रमाणें चालण्याची योग्यता अंगीं आल्यावर मग फलेच्छेचा पूर्ण त्याग करावयाचा आहे. सर्व लोकांस सरसकट निष्काम कर्म करण्यास सांगितलें म्हणजे हिंदुस्थानांतील कर्मप्रवृत्तीस जसा आज अर्धांग-वायु झाला आहे तसें होऊन लोक नेभळे आणि शिपाई होतात व अन्याय व [illegible]

## आर्यऋषींचें मत.

हिंदुधर्मांतील प्राचीनकाळच्या ऋषींनीं जी धर्म व अधर्माची मांडणी केली आहे ती असल्या प्रकारची मुळींच नाहीं. नीति सर्वांस एक नाहीं, शाश्वत नाहीं, ती सापेक्ष आहे असें हिंदुधर्माचें सांगणें आहे. हिंदुधर्मानें समाजाचे वर्णानुसार विभाग पाडिले होते व जो मनुष्य ज्या वर्णांत असेल—जो ज्या पायरीवर असेल—त्याप्रमाणें त्याचें कर्तव्य होय असें ठरविलें होतें. शूद्राचे जे धर्म ते क्षत्रियाचे किंवा ब्राह्मणाचे धर्म नसत. समाजाची सुस्थिति ठेवणें, वाईटाचें निर्मूलन करणें, अन्यायास शासन करणें हा क्षत्रियाचा धर्म तर दुसऱ्याचा प्रतिकार करावयाचा नाहीं—त्यानें अपकार केल्यास तो सहन करावयाचा—हा ब्राह्मणाचा धर्म. या धर्मविभागाबरोबरच प्रत्येकानें आपापल्या धर्माप्रमाणें वागावें, आपल्या धर्मांत वैगुण्य आहे असें जरी वाटत असलें तरी त्या धर्माच्या आचरणांत मरण आलेलें पत्करलें पण दुसऱ्याच्या धर्माचा स्वीकार करूं नये, अशी हिंदुधर्माची आज्ञा होती. कारण दुसऱ्याचा धर्म केव्हांही भयावह असतो. आज जरी नांवाचा जातिभेद दिसत आहे तरी वर्णधर्माचीं हीं तत्त्वें अलीकडे हिंदुलोकांच्या स्मरणांतून गेलीं आहेत. जसे वर्णाचे धर्म निरनिराळे तसे आश्रमांचे धर्महि निरनिराळे होते. ब्रह्मचाऱ्याचे धर्म वेगळे, गृहस्थाचे वेगळे, वानप्रस्थाचे वेगळे व संन्याशाचेही वेगळे. नीति-अनीति, सदाचार—दुराचार, धर्म--अधर्म सापेक्ष आहेत व माणसाच्या उत्क्रान्तीबरोबर ते बदलत जातात हें आर्यऋषींस माहीत होतें. आज मात्र आपण हें सर्व विसरलों आहों. उदाहरणार्थ, ब्रह्मचर्याश्रम अर्थात् विद्याश्रम व गृहस्थाश्रम यांचा आपण संकर केला आहे, व ब्रह्मचर्यवृत्तीनें रहाणारे धडधाकट तरुण लोक नाहींसे होऊन गृहस्थाश्रमी विद्यार्थ्यांमुळें जनतेचें शरीरबळ ओहोटत आहे.

## नीतिनियमांचें स्वरूप.

नीतिअनीतीच्या प्रस्तुतच्या गुंतागुंतीसंबंधानें तसेंच नीतीच्या सापेक्षपणासंबंधानें हे प्रास्ताविक विचार ध्यानांत धरून नीति व अनीति ठरविण्यास एखादा सामान्य नियम सांपडतो किंवा कसें तें आपण पाहूं या. प्रथम नीतिशास्त्र म्हणजे काय तें ठरवून आपण त्याची व्याख्या करूं या. ज्यांस बुद्धि आहे अशा व्यक्तींचे परस्पर संबंध सुरळीत व सुखाचे ठेवण्यास जें

शास्त्र शिकवितें तें नीतिशास्त्र होय. ज्यांस बुद्धि नाहीं अशांच्या संबंधाचें नीतिशास्त्र असणें शक्य नाहीं. खनिजकोटि, वनस्पतिकोटि, प्राणिकोटि यांविषयीं नीति-अनीतीचा प्रश्न उद्भवत नाहीं. या कोटींतील व्यक्ति जीवनकलहांच्या नियमानें बद्ध आहेत व तो नियम त्या व्यक्तींस बळानें उन्नतिमार्गावर पुढें लोटीत असतो. या नियमाच्या कचाटींत त्या सांपडलेल्या आहेत त्यामुळें जीवनार्थ कलह सुरू होऊन त्यापासून अनेक गुण त्यांचे अंगीं येतात व अशा रीतीनें त्यांची प्रगति होते. त्या कोटींपासून भविष्यकाळीं जी मानवकोटी उत्क्रांत होऊन अस्तित्वांत येणार तीस उपयोगी पडतील असे हे गुण असतात. प्राणिकोटींतील प्राण्यांमध्यें नीति-अनीतीच्या कल्पनांचा उदयच झालेला नसल्यामुळें प्राण्यांस नीतिमान् किंवा अनीतिमान् असें म्हणतां येणार नाहीं. त्यांमध्यें नीतीचा अभाव असल्यामुळें ते नीतिहीन आहेत. जोंवर समजून उमजून नियमाप्रमाणें वागण्याची बुद्धि व्यक्तींत उत्पन्न आली नाहीं तोंवर तिचा नीतिशास्त्राशीं संबंध येणार नाहीं. समजून उमजून नियमाच्या अनुरोधानें वागण्याचा विचार मनुष्य करूं शकतो म्हणून नीतिशास्त्राचा उगम मनुष्यकोटीपासून होतो. नियम म्हणजे काय व नियमांच्या अनुरोधानें वागणें म्हणजे काय, याचाही विचार आपणास येथें केला पाहिजे. नियम अनेक प्रकारचे असतात. कायद्याचे नियम म्हणजे कायदे करणाऱ्या संस्थेनें ठरविलेल्या आज्ञा होत. अमुक करा किंवा करूं नका, अशा प्रकारच्या ह्या आज्ञा असतात व त्या पाळल्या नाहींत तर त्यांबद्दल शिक्षा सांगितलेली असते. कायद्याचे जे हे नियम असतात ते कायमचे नसतात तर बदलणारे असतात. तसेंच ते कायदे करणाराच्या मर्जीवर अवलंबून असल्यामुळें नियमभंग करणाऱ्यास ठरविलेली शिक्षाही ठराविक नसते. तीही त्याच्याच मर्जीची गोष्ट असते. नीतीचे नियम या प्रकारचे नाहीत. ते सृष्टिनियमांसारखे असतात. कायद्याप्रमाणें अमुक करा किंवा अमुक करूं नका, असें ते आज्ञार्थानें सांगत नाहींत; तर अमुक कारणांपासून अमुक परिस्थितींत अमुक परिणाम होईल असें ते फक्त विधान करतात. सृष्टिनियम म्हणजे कार्यकारणभावाचें विधान होय. रसायनशास्त्र हायड्रोजन व ऑक्सिजन यांपासून पाणी उत्पन्न करा, असा तुम्हांस हुकूम करीत नाहीं. पाणी उत्पन्न करणें किंवा न करणें ही तुमच्या इच्छेची गोष्ट आहे. रसायनशास्त्र इतकेंच सांगतें कीं, अमुक उष्णतामान असेल व अमुक हवेचा दाब असेल तर हायड्रोजन व ऑक्सिजन यांच्या संयोगापासून पाणी उत्पन्न

होईल. हा पाणी उत्पन्न होण्याचा रसायनशास्त्रांतील नियम आहे. अमुक कारणपरंपरा जुळविली म्हणजे अमुक परिणाम होईल असें सांगणारा हा नियम आहे. तो नियम कोणाच्या मर्जीवर अवलंबून नाहीं व कोणासही बदलतां येणार नाहीं. कारणें जुळविलीं तर कार्य झालेंच पाहिजे, कार्य आपणास हवें असल्यास त्याचीं कारणें सिद्ध करण्याविना तें उत्पन्न होणार नाहीं असें सांगणारे सृष्टिशास्त्राचे नियम असतात. ते निश्चित असतात व ठराविक कार्यें घडवून आणण्यास कदापि चुकत नाहींत. नियम अचूक असल्यामुळें ज्यास ते समजले असतील त्यास त्यांच्या योगानें पाहिजे ते परिणाम घडवून आणितां येतात व नियमानें बांधलेल्या सृष्टींत असला ज्ञानी मनुष्य स्वतंत्र किंवा मुक्त राहूं शकतो. अज्ञानी मनुष्य मात्र या नियमांच्या तावडींत सांपडून चोहोंकडून बांधला जातो. नियमांस दयामाया नसल्यामुळें अज्ञानानें त्यांचा भंग त्याच्या हातून झाला म्हणजे त्याचें प्रायश्चित्त त्यास दरवेळीं भोगावें लागतें. त्यास सृष्टिनियमामध्यें ठेंचाळत व एक-सारखे फटके खात बावरावें लागतें व कोणीकडे जावें हें त्यास उमजत नाहीं. त्या नियमांचें ज्ञान करून घेतलें म्हणजे त्यांचा निर्दयपणा व ठराविकपणाच ज्ञानी माणसाच्या उपयोगास येतो, आणि म्हणूनच ज्ञानी मनुष्य सृष्टि-नियमाच्या साम्राज्यांत पूर्ण स्वातंत्र्य उपभोगितो. सृष्टींतील कार्यकारणभाव अवगत असल्यामुळें निरनिराळीं कारणें जुळवून पाहिजे तीं कार्यें त्यास घड-वून आणितां येतात. एका नियमाच्या विरुद्ध दुसरा नियम लावून, एका नियमाचा परिणाम दुसऱ्या नियमाच्या योगानें नाहींसा करून व अनेक नियमांची क्रिया एकदम करून आपणास इष्ट असेल तें तो साधून घेतो. सृष्टीचे नियम पाळून तीस जिंकतां येतें असें जें म्हणतात तें अगदीं खरें[1] आहे. अशा रीतीनें सृष्टीस स्वतःच्या आधीन करून तो तिच्या कचाट्यांतून सुटतो व स्वतंत्र होतो. नीतीचे नियम हे सृष्टि—नियम आहेत. ते कायद्या-प्रमाणें कृत्रिम नाहींत; नीतीचे नियम हे ईश्वराच्या स्वभावाचें व्यक्त स्वरूप होत. जगाच्या उत्क्रांतींत जी ईश्वरी प्रेरणा आहे तिचें स्वरूप म्हणजे हे सृष्टिनियम. जीवमात्राची उत्क्रान्ति व्हावी हा ईश्वरी संकेत आहे. हा संकेत मनुष्यमात्रास उत्क्रान्तिमार्गावरून पुढें पुढें नेत असतो. आतां ज्या-अर्थीं नीतिअनीतीचे नियम हे सृष्टिनियम आहेत व सृष्टिनियम हे ईश्वरी

---

१ Nature is conquered by obedience.

स्वभावाचे दर्शक आहेत, तसेंच ज्याअर्थी उत्क्रान्ति ही ईश्वराची योजना आहे त्याअर्थी जी जी गोष्ट उत्क्रांतीस पोषक ती नीतीची व उत्क्रान्तीस हानिकारक ती अनीतीची हें उघडच झालें. नीति अनीति ठरविण्याची ही कसोटी आहे. नीति म्हणजे उत्क्रान्तिमार्गावर प्रगति करणारें कर्म व अनीति म्हणजे उत्क्रान्तिमार्गावर पीछेहाट करणारें कर्म.

## सारासार विचार.

हा नीतिअनीतीचा जो मुख्य नियम तो नीट समजण्यास व व्यवहारांत लागू करण्यास ज्ञान लागतें. गुणाकार–भागाकार करून त्रैराशिकाचें जसें हवें त्यानें उत्तर काढावें त्याप्रमाणें वाटेल त्या माणसास नीतिशास्त्रांतील ह्या मुख्य तत्त्वावरून व्यवहारांतील अडचणींत हटकून बरोबर उत्तर देतां येईलच असें नाहीं. म्हणूनच ऋषींनीं उत्क्रांतींत व्यक्त होणारा जो ईश्वरी संकेत त्यास अनुसरून नीतिअनीतीचे नियम अज्ञजनांकरितां घालून दिले आहेत. उदाहरणार्थ, सर्व नीतिशास्त्रांचें सार म्हणून 'परोपकारः पुण्याय पापाय परपीडनम्' हा व्यासांनीं जो सिद्धांत सांगितला आहे किंवा 'दुसऱ्यांनीं तुमच्याशीं असें वागावें असें तुम्हांस वाटतें त्याप्रमाणें तुम्हीं दुसऱ्याशीं वागलें पाहिजे,' हा जो ख्राइस्टनें उपदेश केला आहे तो सामान्यतः उत्क्रान्तीच्या ईश्वरी प्रेरणेस धरून आहे. सामान्यतः म्हणण्याचें कारण हे नियम नेहमीं लागू पडलेच पाहिजेत, त्यांस आपवाद निघणार नाहीं असें नाहीं. नीतीच्या नियमांचा विचार करून मग ते व्यवहारास लागू केले पाहिजेत, व त्यांतील खांचा खोंचा ध्यानांत ठेविल्या पाहिजेत. नाहीं तर दुसऱ्यानें जसें आपल्याशीं वागावें असें आपणास वाटतें तसें आपण त्याच्याशीं वर्तन ठेविलें पाहिजे या म्हणण्याचा विपर्यास करून एखादा न्यायाधीश खुनाच्या खटल्यांत असें तर्कशास्त्र लढवूं लागेल कीं, ज्याअर्थी या खुनी मनुष्यानें मला फांसावर चढवावें असें मला वाटत नाहीं त्याअर्थी मीही त्यास फांशीची शिक्षा न देतां सोडून दिलें पाहिजे! मला या आरोपीनें कोणतीही शिक्षा करूं नये म्हणून मीही त्यास कोणतीही शिक्षा करणार नाहीं असें न्यायाधीशानें किंवा राजानें म्हणणें म्हणजे स्वतःचें कर्तव्य विसरणें आहे. नीतीचे नियम डोळे मिटून लावतां येणार नाहींत. माणसाचा समाजांत जो दर्जा असेल व जो अधिकार त्याजकडे असेल तो पाहून नीति-अनीति ठरविणें जरूर आहे. अपराधी मनुष्यास तुम्हीं आम्हीं तुरुंगांत अडकवून ठेवलें तर तें बरोबर

होणार नाहीं. पण न्यायाधीशाचें तें कर्तव्य होय म्हणून नीति–अनीतीचा विचार करतांना परिस्थिति व तशाच इतर गोष्टी हिशेबांत घेतल्या पाहिजेत. भल्या माणसाशीं भलेपणानें वागावें व वाईट माणसाशींही भलेपणानें वागावें असें लॅओट्झीचें वचन आहे. यासंबंधानें संशय वाटून कांहीं लोक कॉन्फ्यूशिअसकडे गेले व त्यास त्यांनीं प्रश्न केला कीं, वाईट माणसाशीं संबंध आला म्हणजे आम्हीं कशी वर्तणूक ठेवावी? आम्हीं बऱ्याशीं बरेपणानें वागावें व वाईटाशींही बरेपणानें वागावें काय? कॉन्फ्यूशिअस मुत्सद्दी व व्यवहारचतुर होता. त्यानें उत्तर दिलें 'दुष्कृत्यांची फेड जर आपण उपकारानें व सद्वर्तनानें केली तर सत्कृत्यांची फेड करण्यास आपणाशीं काय शिल्लक राहील? तेव्हां चांगल्याची फेड चांगुलपणानें करा व वाईटाची फेड न्यायानें करा' हा व्यवहारास शोभण्यासारखा उपदेश आहे. वाईटाशींही चांगलेपणानें वागणें ही नीति साधुकरितां, योग्याकरितां व जे उत्क्रान्तिमार्गांत फार पुढें गेले आहेत त्यांचेकरितां आहे. तसें करण्यानें त्यांची प्रगति होते म्हणून त्यांस ती नीति होय. पण राष्ट्रास ती नीति उपयोगास येणार नाहीं; कारण राष्ट्रें उत्क्रान्तिदृष्ट्या त्या स्थितीपर्यंत अद्याप येऊन पोहोंचलेलीं नाहींत. म्हणून राष्ट्रानें शत्रूस आपल्या हद्दींत येऊं देऊन खुशाल धुमाकूळ घालूं द्यावा व त्याचा प्रतिकार करूं नये, हें नीतीविरुद्ध होइल. यावरून आपल्या लक्षांत येईल कीं, नीति-अनीति ठरवितांना आपण पूर्ण विचार केला पाहिजे व व कोणत्याही कृत्यास नीतीच्या किंवा अनीतीच्या वर्गांत घालतांना त्या कृत्यापासून काय काय परिणाम होतील तेही जमेस धरले पाहिजेत.

## उत्क्रांतीचा प्रकार.

आतां उत्क्रांति कशी होते हें आपण थोडक्यांत पाहूं. कधींही मोडतां येणार नाहींत असे जे सृष्टीचे नियम ते उत्क्रान्तीस साधनीभूत होतात. आरंभीं आरंभीं या नियमांची उपाधी सर्व जातींवर सरसकट लादलेली असते. खनिजकोटी, वनस्पतिकोटी किंवा प्राणिकोटी घेतल्या तर, त्यांतील व्यक्तीव्यक्तींचा फारसा भेदभाव न करतां सृष्टिनियम त्या त्या सर्व वर्गांवर सरसकटपणें आपला अम्मल गाजवितात असें दिसून येतें. व खनिजकोटी व उद्भिजकोटी यांतील व्यक्तींच्या उपजत बुद्धीवर नियमांचा दाब पडून त्या कोटींत नियम पाळले जातात. प्राणिकोटींत व्यक्तींव्यक्तींमध्यें कलह सुरू

होतात व त्यामुळें त्यांची प्रगति होते. आपसांतील कलहामुळें पशूंचीं इंद्रियें तीक्ष्ण होतात व त्यांचे अंगीं धूर्तपणा येतो, व हे गुण ज्या व्यक्तीचे अंगीं येणार नाहींत ती जीवनकलहांत मरून जाते. रानटी माणसांतही बहुतांशीं असाच प्रकार असतो. त्यांस चांगलें वाईट याबद्दलच्या कल्पनाही नसतात. यहुदी लोकांमध्यें एक अशी प्राचीन गोष्ट आहे कीं, जगाच्या आरंभीं ईव्ह आणि ॲडॅम नांवाचें मनुष्यजातीचें पहिलें जोडपें होतें. तें ईश्वराच्या बागेंत रहात असून त्याचें मन लहान मुलांप्रमाणें निष्पाप होतें. त्या वेळीं त्यांस बरें वाईट याची कल्पनाच नव्हती. त्यांस बागेंत पूर्ण स्वातंत्र्य होतें. पण चांगलें व वाईट यांचें ज्ञान ज्या एका झाडाचें फळ खाल्ल्यानें मनुष्यास समजेल असें होतें, तें फळ त्यांनीं खाऊं नये अशी त्यांस सक्त मनाई होती. अज्ञानामुळें त्यांनीं तें मना केलेलें फळ खाल्लें, व त्यामुळें तीं स्वर्गांतून च्युत होऊन त्यांस या मृत्युलोकावर येणें भाग पडलें, ही गोष्ट खरी मानिली तर अर्थात् अन्यायाची आहे. पण बारकाईनें शोधून पाहिल्यास प्रथमारंभीं मनुष्य-जातीस चांगलें व वाईट यांचें ज्ञान नव्हतें हा गूढार्थ त्यांत आहे असें दिसून येईल. ज्याप्रमाणें पशूस चांगलें, वाईट, नीति, अनीति यांच्या कल्पनाच नसतात त्याप्रमाणें रानटी स्थितींत मनुष्याच्याही मनांत या कल्पना उदय पावलेल्या नसतात. रानटी माणसाच्या मनाची स्थिति कशी असते हें एका उदाहरणानें स्पष्ट करतें, म्हणजे आपल्या ध्यानांत येईल. ऑस्ट्रेलि-यांतील रानटी माणसांच्या स्थितीचें अवलोकन करीत असतां एके समयीं एका मिशनऱ्याची व कांहीं रानटी माणसांची गांठ पडली; त्या वेळीं मिशन-ऱ्यास असें आढळून आलें कीं, त्या माणसांपैकीं एकास फार भूक लागल्या-मुळें त्यानें कांहींही विचार न करतां आपल्या बायकोस दंडप्रयोग करून ठार मारिलें व तिच्या मांसानें स्वतःची क्षुधा शांत केली. मिशनऱ्यानें त्या मा-णसाशीं उरस्फोड करून त्यास हें कृत्य वाईट व अनीतीचें आहे हें समजावून देण्याचा प्रयत्न केला; पण बायकोस मारणें यांत अनीति आहे हा विचार त्या माणसास कळणेंच मुष्किलीचें पडलें, कारण अनीति या शब्दांत अंतर्भूत असलेली कल्पना व्यक्त करण्यास त्या रानटी माणसास माहीत असलेला शब्दच मिळेना. तव्हां त्यानें केलेल्या प्रकाराकडे बोट दाखवून मिशनऱ्यानें सांगितलें, 'हें चांगलें नाहीं.' त्यावर तो रानटी माणूस बोलला 'छे ! ती फार चांगली होती. ती मला फारच गोड लागली.' कारण त्याच्या डोक्यांत सदाचार-दुराचार, योग्य-अयोग्य ह्या कल्पनाच नव्हत्या !! त्याच्यांत

नीतीचा अभाव असल्यामुळें तो 'अनीतिमान्' नव्हता तर मीं मघाशीं सांगितल्याप्रमाणें तो 'नीतिहीन' होता. अगदीं प्रारंभींच्या मानवी अवस्थेंत लोक या माणसाप्रमाणें नीतिहीन असतात. अॅडम् आणि ईव्ह हीं प्रारंभीं अशींच होतीं. अनुभवानें नीतीच्या अंधुक कल्पना पुढें माणसाच्या मनांत येऊं लागतात व त्यांची प्रगति होते. बायकोचा खून करतांना त्या रानटी माणसाला जरी कांहीं वाटलें नाहीं तरी तिची जेव्हां गरज लागेल तेव्हां ती नाहींशी आलेली पाहून त्यास आपण चूक केली अशी समजूत हळूहळू येईल. बायकोच्या सोबतीपासून चिरकाल सुख होतें, तिला मारून खाल्ल्यानें थोडा वेळ भूक राहिली, पण नेहेमींच्या सुखास मी कायमचा अंतरलों इत्यादि विचार त्याच्या मनांत येऊं लागतील. रानटी लोकांस दारूची किंवा मादक पदार्थांची चटक गोऱ्या लोकांच्या संगतीनें लागली म्हणजे त्या व्यसनाच्या भरांत ते दारू पितात. मनुष्य दारू प्याला म्हणजे लगेच त्यानें त्याचें डोकें दुखूं लागतें व या व्यसनानें डोकें दुखतें हें त्यास समजूं लागतें. तरी त्याचें तें व्यसन सुटत नाहीं. तो अधिकाधिक व्यसनाधीन होऊन एखादे वेळीं फारच अतिरेक करितो व अतिशय निशा येऊन तींत मरूनही जातो. या गोष्टींचा इतर रानटी माणसांच्या मनावर परिणाम होऊन मादक पदार्थांनें माणूस अल्पायुषी होतो हें त्यांस समजतें, व दारू पिणें हा दुराचार आहे, ती अनीति आहे ही कल्पना उत्पन्न होते. अशा रीतीनें त्यांस ज्ञान येऊन नीति—अनीतीचा उदय होतो. ज्ञान मिळविण्यास त्यांस दुसरा कोणताही मार्ग नसतो. सुखदुःखाचा अनुभव त्यास सत व असत् ओळखावयास शिकवितो. व शेवटीं नियमांप्रमाणें वागलें म्हणजे सुख होतें व त्यांचेविरुद्ध गेलें म्हणजे दुःख होतें हा निष्कर्ष त्यांस काढतां येतो. प्राथमिक स्थितींतील रानटी माणसांस हें शिकण्यास फार अवकाश लागतो व म्हणूनच त्यांस मार्ग दाखविण्यास धर्मसंस्थापक किंवा दुसरे श्रेष्ठ पुरुष असतात.

## मरणोत्तर स्थिति.

दारू पिऊं नये असा निर्बंध धर्मगुरूंनीं घालून दिला आहे पण तो मोडून राजपुतान्यांतील मागच्या पिढीचे राजे दारू पिऊं लागले व पक्के व्यसनाधीन बनले. नियम मोडल्याचें त्यांस प्रायश्चित्त मिळून ते बहुतेक अल्पायुषी होऊन मृत्युमुखीं पडले. आज गादीवर बसलेले बरेच राजपुत्र अगदीं लहान वयाचे आहेत ही गोष्ट त्यांच्या वडिलांच्या अल्पायुषित्वाची जिवंत साक्ष आहे.

पूर्वींचे राजे—ते हिंदु वा मुसलमान असोत—दारू पीत नसत व आपले वडील दारूच्या व्यसनामुळें फार दिवस जगले नाहींत या गोष्टी हल्लींच्या राजपुत्रांच्या नजरेसमोर आहेत व त्यांपासून शहाणपणा शिकून ते पहा कसे निर्व्यसनी निपजलेले दिसत आहेत ! हें उत्क्रान्तीचें उदाहरण झालें. अशा रीतीनें दुसऱ्याच्या सुखदुःखांपासूनही मनुष्य उत्क्रान्तीचे धडे शिकूं शकतो. नीति—अनीति ओळण्यास धर्म व सुखदुःखांचे अनुभव हे मनुष्यास मार्गदर्शक होतात. मरणोत्तर मनुष्याच्या वांट्यास येणाऱ्या सुखदुःखांचाही असाच परिणाम होतो. मेल्यानंतर मद्यपी मनुष्यास भयंकर परिणाम भोगावे लागतात. दारूची चटक ही स्थूल शरीरांत नसून सूक्ष्म शरीरांत असते व मनुष्य मेला तरी सूक्ष्म शरीर कायम राहिल्यानें तशीच राहिलेली असते. विषयासक्त माणसाची कामवासनाही मृत्यूनंतर कायम असते. असल्या सर्व दुर्वासना मृत्यूनंतर सूक्ष्मशरीरांत प्रबळ होतात, त्या त्या विषयाचा माणसाच्या मनास एकसारखा ध्यास लावितात व कोणत्याही वासनेची तृप्ति करण्याचें आद्य साधन जें पार्थिव शरीर त्याचा मृत्युसमयींच नाश झालेला असल्यामुळें वासना पूर्ण करणें अशक्य झालेलें असतें. त्यामुळें वासनांचें काहूर माजून त्यांखालीं मनुष्य अत्यंत बेजार मात्र होतो. वासना मस्त होऊन तृप्तिसाठीं चोहोंकडून आक्रोश करून सोडतात व साधनांच्या अभावीं तृप्तीच्या नांवानें आवळ्याएवढें पूज्य असल्यामुळें त्या वासना सावकाशपणें झिजून झिजून नाहींशा होतात. अशा प्रकारें माणसाच्या स्वभावांतून त्या जणूंकाय सोलून निघत असतात व त्यामुळें व्यसनाधीन माणसास असह्य यातना सोसाव्या लागतात. हा सगळा परिणाम दुर्वासनांस थारा दिल्यामुळें झाला हें त्या माणसास माहीत असतें. उपभोग शक्य नसल्यामुळें वासना क्षीण होत जाऊन कालांतरानें निर्मूल होतात व निर्मूल होईपर्यंत दुःख देत रहातात. येणेंप्रकारें दुर्वासना वाईट आहेत हा संस्कार जणूं काय तापवून लाल केलेल्या लोखंडी ठशानें माणसाच्या मनावर छापला जातो. भुवर्लोकांत वासनांची उपासमार होऊन त्या नष्ट होत असतांना जें दुःख होतें तें माणसास नीति शिकवितें व उपभोगाविषयीं मनांत वीट उत्पन्न करितें. असा अनेक जन्मीं अनुभव घेऊन माणूस वासनांस स्वभावतःच विन्मुख बनतो. तुम्ही विचाराल, उत्क्रांतिक्रमांत जें इतक्या निर्दयपणानें दुर्वासनांबद्दल माणसास दुःख दिलें जातें त्याची काय जरूरी आहे ? त्या दुःखाशिवाय चालावयाचें नाहीं काय ? हें दुःख एकंदरीनें माणसाच्या

हिताचें आहे, त्यांत खरोखरी दया आहे असें माझें आपणांस उत्तर आहे. कारण या दुःखाग्नीनें वासनांचें बीजच जळून जातें व उपभोगाची हांव नष्ट होते. असें दुःख न होतें तर मनुष्यास विषयाचा मोह पुनः पडण्यास जागा राहिली असती. तुम्हांपैकीं बहुतेकांस दारू किळसवाणी वाटते, कारण ती दुःखदायक आहे याचा तुम्हांस पूर्वकाळचा अनुभव आहे. तिचा उपभोग म्हणजे दुःखाचें जन्मस्थान—नीतिच्या शब्दांनीं सांगावयाचें म्हणजे दुःखाची योनि—आहे. याची प्रचीति तुम्हांस असल्यामुळें तुम्ही मदिरेच्या मोहांतून सुटलां आहां. तुम्हीं स्वतः हा दुःखाचा अनुभव घेतला नसता तर असा दृढ संस्कार उत्पन्न झाला नसता.

तुम्हांपैकीं जे वडील असतील त्यांनीं ह्या सृष्टिक्रमावरून एक धडा शिकण्यासारखा आहे. कधीं कधीं आईबापांचें मुलगा कांहीं केल्या ऐकत नाहीं व दुराचारी होतो, असें आपण पहातों. आईबाप सांगतात. या मुलास आम्हीं उपदेश केला, धाक दाखविला, हजार विनविण्या करून पाहिल्या, त्याची समजूत घातली—होतें नव्हतें तें सर्व करून पाहिलें पण मुलगा ऐकत नाहीं, तो एकसारखा कुमार्गाकडे वळतो. दुर्दैवानें ज्या आईबापांच्या पोटीं असला मुलगा आला असेल त्यांस माझें सांगणें आहे कीं, तुम्ही ईश्वर सर्वत्र आहे हें विसरूं नका. दुःखांत आणि नरकांत सुद्धां ईश्वर आहे. तुम्हांस आपल्या मुलाविषयीं जितकें प्रेम वाटतें त्यापेक्षां ईश्वरास अधिक प्रेम वाटतें. खरोज ईश्वराच्या प्रेमांत अजागपणा असतो. जो सांगून ऐकत नाहीं, ज्यास उपदेश शिकवूं शकत नाहीं त्यानें दुःख भोगून ताळ्यावर यावें अशी त्याची योजना असते. नियमांचें अतिक्रमण करणारास ईश्वर दुःखाच्या रूपानें भेटतो व त्याचा परिणाम असा होतो कीं, पुढें तो मनुष्य ईश्वराचे नियम ओळखून स्वतःच्या इच्छा त्यांचे अनुरोधानें जाईशा करितो. ज्यांचें अस्तित्व अद्याप लक्षांत आलेलें नाहीं अशा सृष्टिनियमांवर आपटून आपटून रानटी मनुष्य नीतिहीनावस्थेंतून बाहेर निघून नीति--अनीतीच्या कक्षेंत येतो. त्या कक्षेंत आल्यावर त्यास नीति कोणती व अनीति कोणती हें समजतें, पण तें समजूनही तो वासनांच्या मोहजालांत गुरफटल्यामुळें अनीतीकडेच प्रायः झुकत असतो. पण अनीति दुःखपर्यवसायी असल्यामुळें पुनः पुनः दुःखाग्नीचे चटके खाऊन तो अनीतीच्या मोहांतून सुटतो व शेवटीं त्याच्या स्वभावांत जें अनीतीचें बीज असेल तें त्या दुःखाग्नींत

पार जळून जातें. तुम्ही लोकांचे खून करीत नाहीं यांत कांहीं तुमचा मोठेपणा आहे असें नाहीं. तुम्हीं मागें खून केले आहेत व म्हणूनच आज ती प्रवृत्ति तुमच्या स्वभावांतून निर्मूळ झालेली आहे. तुम्हांस खून करण्याचा मोह पडतो पण तुम्ही दृढनिश्चयामुळें त्या मोहास बळी पडत नाहीं, असाही प्रकार नाहीं. तर खुनाची तुमच्यांत प्रवृत्तिच उरलेली नाहीं इतकी तुमची प्रगति झालेली आहे. मोहांत सांपडूं नये याबद्दल धडपड करणें हा सद्गुण आहे, पण वाईट गोष्टींचा मोहच न पडणें ही त्याच्या पुढची पायरी आहे. मोहास बाजूस सारून नेटानें सन्मार्गानें जाण्याचा जो प्रयत्न करतो तो मनुष्य मोठा निश्चयी खरा; पण जो मनुष्य जातिस्वभावानेंच सन्मार्गानें जातो व हें करूं कीं तें करूं याचा घोंटाळाच ज्यास पडत नाहीं तो मनुष्य अधिक श्रेष्ठ होय हें आपण विसरतां कामा नये. मनाची पूर्ण खात्री झाली असल्यामुळें असा माणूस केव्हांही अनिश्चित असत नाहीं व त्याचें वर्तन सदासर्वदां आपोआप नीतीचेंच व्हावयाचें असा त्याचा स्वभाव बनलेला असतो. इतक्या पल्ल्यावर मनुष्य आला व ईश्वरी इच्छेच्या अनुरोधानें त्याच्या वैयक्तिक इच्छेचा प्रवाह अयत्नतःच वाहूं लागला म्हणजे त्यास मोक्ष फार दूर नाहीं, असें समजावें.

## दोन कर्तव्यांचा पेंच.

नीतिअनीतीच्या क्षेत्रांत येऊन उत्क्रान्तिपथावर मनुष्य पुढें जाऊं लागला म्हणजे दोन कर्तव्यांपैकीं कोणतें स्वीकारावें अशा प्रकारचे पेंच त्याच्या समोर येऊं लागतात. जी गोष्ट अनीतीची अशी ठरलेली आहे तिचा त्यास मोह पडत नाहीं, पण समोर असलेल्या दोन कर्तव्यांपैकीं कोणतें श्रेयस्कर हें त्यास उमजेनासें होतें व या दोन कर्तव्यांच्या ओढाताणींत त्याची त्रेधा उडून जाते. खरें कर्तव्य या बाजूस आहे असें दर्शविणारीं प्रमाणें दोन्हीं पक्षांकडे असतात. प्रमाणांच्या झोंपाळ्यावर बसून तो एकदां इकडे व एकदां तिकडे असे हेलकावे खात रहातो व काय करावें हें न सुचल्यामुळें पराकाष्ठेचा खिन्न होतो. ईश्वराची इच्छा आपणांस प्रमाण आहे हें त्याचें पूर्वींच ठरलेलें असतें, पण ती इच्छा कशी ओळखावी याचें ज्ञान नसल्यामुळें त्यास कर्तव्याचा व्यामोह पडलेला असतो. ही सामान्य मनुष्याच्या पुढें गेलेल्याची स्थिति होय. असले प्रसंग पुढें गेलेल्या माणसा-समोर अनेकवार येत असतात. ‘ नैतद्विद्मः कतरन्नो गरीयः ’ असें म्हण-

त्यास लावणारा कर्तव्याकर्तव्यामधील लढा मनासमोर उत्पन्न झाला म्हणजे त्यावरून आपण असें अनुमान काढावयाचें कीं, अशा प्रकारचा प्रश्न उत्क्रान्तिमार्गांत त्या माणसापुढें पूर्वी आलेला नव्हता. सदसद्विवेकबुद्धि कांहींच निर्णय देऊं शकत नाहीं, याचा अर्थच हा कीं, असला प्रश्न त्या बुद्धीच्या पूर्वानुभवांतला नाहीं. सृष्टींत जे अनुभव घेतले असतील त्यापासून सद्-असद्-विवेक-बुद्धि उत्पन्न होते. चोरी करूं नये, दुसऱ्याचा जीव घेऊं नये असें माणसास सदसद्विवेक बुद्धि सांगते, कारण अशा गोष्टींपासून दुःख होतें, हा अनुभव त्यानें पूर्वी घेतलेला असतो. रानटी मनुष्याचें मूल घेतलें तर तुम्हां–आम्हांस जितकी सदसद्विवेकबुद्धि जागृत झालेली असते तितकी त्या मुलामध्यें जागृत होत नाहीं असा अनुभव आहे. ज्याचा जितका अनुभव असेल तितका त्याचा सदसद्विवेकबुद्धीचा सांठा असतो. कोणाचा कमी तर कोणाचा अधिक असतो. दोन कर्तव्यांसंबंधानें माणसाच्या मनांत लढा उत्पन्न होतो, याचें कारण तो प्रश्न त्या माणसास नवीन असल्यामुळें त्याचा निर्णय करण्याइतका पूर्वानुभवाचा संचय त्याजपाशीं नसतो हें होय. अशा रीतीनें ज्या प्रकारच्या परिस्थितींत आपण पूर्वी आलेलों नाहीं. त्यांत सांपडून जेव्हां मनुष्य कर्तव्यमूढ होतो, तेव्हां त्यानें आपलें कर्तव्य कोणत्या युक्तीनें ओळखून काढावें हा मोठा महत्वाचा प्रश्न आहे. दोहोंपैकीं कोणतें तरी कर्तव्य स्वीकारलेंच पाहिजे, कांहींच न करूं तर चालणार नाहीं, असा हा प्रसंग असतो. अशा वेळीं उत्तम पक्ष म्हटला म्हणजे माणसानें आपल्या बुद्धीचा पूर्ण उपयोग करून साधक बाधक प्रमाणाचा शक्य तितका विचार करावा. हा विचार करतांना स्वतःच्या नफ्यातोट्याचा प्रश्न, स्वतःची आवड-निवड व दुराग्रह–एकंदरींत ज्या ज्या गोष्टी आपणांस एका बाजूस ओढून नेऊन मनाचें समत्व नाहींसें करितात, त्या सर्व गोष्टी एका बाजूस ठेवाव्या. हें साधणें अवघड आहे, त्यास अभ्यास पाहिजे असतो. पण शक्य तितका प्रयत्न करून हे मनाचे आग्रह दूर सारावे म्हणजे मन विनाकारण भलतीकडे झुकणार नाहीं. येणें प्रकारें मन निवांत झालें म्हणजे सत्वस्थ वृत्तीनें स्वतःच्या अंतरंगांत शिरून तेथें कांहीं अभिप्राय किंवा उपदेश परिस्फुट होतो किंवा काय त्याचा शोध घ्यावा. कारण असें केलें असतां अंतरंगांतील ज्योति प्रकाशमान होऊन त्यानें आपणास वाट दिसण्याचा संभव आहे. किंवा देवादि श्रेष्ठ कोटींतील, एकादी व्यक्ति कांहीं सुचविण्याचाही संभव आहे. या सर्व गोष्टी हिशेबांत घेऊन मग काय करणें त्याचा निश्चय करावा व त्या निश्चयाप्रमाणें

वागावें. जरी आपल्या हातून निश्चय करण्यांत चुकी झाली असली तरी त्याबद्दल मग खेद करूं नये. कारण आपलें शक्तिसर्वस्व खर्च करून, आपली पराकाष्ठा करून आपण निवड केली आहे; व यापरतें दुसरें कांहीं कोणी करूं शकत नाहीं. चूक झाली असल्यास ती समजून येईल व आपण तीपासून शहाणपणा शिकूं; जर करणें बरोबर असेल तर ठीकच, त्यापासूनही आपल्या ज्ञानांत भर पडेल. या मार्गानें गेल्यास श्रेष्ठ ध्येयें मनासमोर राहून त्याविषयीं माणसाची अभिरुचि वाढत जाते व व्यक्तीपेक्षां मनुष्यजाति अधिक आहे, याची हृदयांत खूण पटण्यापर्यंत पल्ला गांठतां येतो.

## वीराचा धर्म.

येथपर्यंत ज्यानें मजल मारली तो वीरपुरुषाच्या पदवीच्या जवळ आला आहे, असें समजावें. अखिल मानवजातीचा जो आपल्यावर हक्क तो शिरसावंद्य मानून श्रेष्ठ ध्येयांसाठीं आयुष्य वेंचावें किंवा जी गोष्ट प्राकृत जनांस मात्र नीतीची आहे ती स्वीकारून कनिष्ठ मार्गानें जावें हा पेंच वीरवृत्तीच्या पुरुषासमोर असतो, व खरी वीरवृत्ति त्याच्या अंगीं बाणली असल्यास देह खर्ची पडला तरी श्रेष्ठ मार्गाचा त्याग करावयाचा नाहीं, अशी त्याची प्रतिज्ञा असते. हा वीरप्रभाव तुम्हांपैकीं कोणाच्या अंगांत संचारत असेल तर ती मोठी आनंदाची व भाग्याची गोष्ट आहे. सामान्य जनांच्या नीति–अनीतीच्या कक्षेंतून बाहेर पडून तुम्ही वर गेलां असून नीतीच्या उच्च तत्त्वापर्यंत तुमची दृष्टि पोंचल्याची ही खूण आहे. या पदापर्यंत पोंचलेल्या माणसाची नीति निराळी असते व जी गोष्ट इतरांस नीतीची ती त्यास अनीतीची होण्याचा संभव असतो. सगळें जग आडवें आलें तरी, तुम्ही एकाकी सत्याचें निशाण धैर्यानें वर धरून पुढें जाल काय हा वीराच्या समोर प्रश्न असतो. व सभोंवतालच्या सामान्यजनांच्या मार्गानें जावें किंवा अंतरंगांतील सद्सद्विवेकाची दिव्य ज्योति जो मार्ग दाखवील तो मार्ग निर्धास्तपणें धरावा. मग कांहींही होवो. या दोहोंशिवाय तिसरी तोड शक्य नसते. देहपात झाला तरी सत्यास अंतर देऊं नको, सत्याची प्रतारणा करण्यापेक्षां आप्तइष्टांचा द्वेष, सरकारांचा कोप किंवा लोकांचा बहिष्कार शांतपणानें सोसणें सोपें आहे असें तुमची मनोदेवता तुम्हांस निक्षून सांगत असेल तर तुह्मी खरे वीर आहां व तुमचा जगतास उपयोग आहे. पण लक्षांत ठेवा, हा मार्ग दुरून जितका मनोहर दिसतो तितकाच तो बिकट आहे. वीर पुरुषाचा खरा शत्रु

बाहेर नसून आंत असतो. बाहेरच्या शत्रूंच्या छळापेक्षां अंतरंगांतील शत्रूचा मारा भयंकर असतो. इतरांनीं हाल केल्यास ते सोसतां येतात, त्यांचा प्रतिकार करतां येतो, पण अंतरंगांतील श्रद्धा व निश्चय हीं डळमळूं लागलीं ह्मणजे वीराचें वीर्यच खचतें व मूले कुठारः या न्यायानें त्याच्या सर्वस्वभूत सत्वाचें हरण होतें. लोकांच्या जुलमास तोंड देतां येतें, पण मनांत जेव्हां संशय उत्पन्न होतो,–सर्व जग सांगतें तें खोटें काय? मीच कायतो एकटा खरा काय? अशा ऊर्मि हृद्यांत येऊं लागल्या ह्मणजे सर्वच कारभार आटपतो. 'बाबारे! माथेफिरूपणा करून संकटांत उडी घालूं नकोस,' असें मायेचीं माणसें डोळ्यांत अश्रु आणून विनवूं लागलीं ह्मणजे तो प्रेमपाश तुटण्यास अत्यंत कठीण असतो. 'जगांतील चांगलीं व सुशील माणसें मला सगळीं वेड्यांत काढतात व ते सर्व चुकले व मीच कायतो एकटा शाहणा असें मला वाटतें. हा गर्व नसेल ना? हा अहंकार नसेलना?' अशा संशयलहरी वीराच्या हृद्यांत येऊं लागल्या ह्मणजे त्याचें अंतःकरण शतधा विदीर्ण होऊं लागतें. या अंतरंगांतील माऱ्यापुढें निभाव लागणें पराकाष्ठेचें बिकट आहे. पण ज्याची वीरवृत्ति अस्सल जातिवंत आहे तो अशा बिकट प्रसंगींही डगत नाहीं. तो म्हणतो, जी गोष्ट बरोबर आहे अशी माझी मनोदेवता मला ग्वाही देत आहे तिचा त्याग जिवांत जीव आहे तोंवर मी करणार नाहीं. आज माझी बुद्धि चुकली असली तर उद्यां माझी चूक ध्यानांत येईल, पण मी मनोदेवतेचा दासानुदास तिचे चरण कालत्रयीं सोडणार नाहीं. वीराचें धैर्य या उच्च कोटींतील असतें व अशा वीर पुरुषांच्या प्राणांची आहुति तत्कालीन जनसमाजानें घेतली तरी तो पुढच्या पिढीकरितां भूमंडळीं कीर्तिरूपानें उरतो. "एकदां मरावें कसें हें जो जाणतो तो सदासर्वदा लोकांच्या हृद्यांत कीर्तिरूपानें रहातो" असें ब्रूनोनें म्हटलें आहे. शिवाय त्यानें असेंही म्हटलें आहे, कीं मुळीं प्रयत्नच न करण्यापेक्षां श्रेष्ठ होण्याचा प्रयत्न करून अपयशाचे वांटेकरी होणें यांतही भूषण आहे. वीराच्या या असामान्य नीतीपर्यंत ज्यांची नजर पोहोंचते त्याच्या हृद्यांत दिव्य अंतःस्फूर्तीचा उदय होतो. ही स्फूर्ति आत्म्याच्या घरची असण्याचा संभव असतो व अशा स्फूर्तीची अवज्ञा करणें म्हणजे पराकाष्ठेचा कृतघ्नपणा होय.

## सावधपणाची आवश्यकता.

वीरवृत्तीच्या धर्माचा अंगिकार करण्याचा बिकट प्रश्न आला असतां माणसानें आपली योग्यता काय, आपण उत्क्रान्तिमार्गावर कोठवर आलों

आहों याचा शांतपणानें विचार केला पाहिजे. नीतिशास्त्राचे कितीही नियम ठरविले तरी शेवटीं मजकरितां नीति कोणती व अनीति कोणती हा निर्णय त्याचा त्यानेंच स्वतः करावयाचा असतो. हा निर्णय ठरवितांना तुमचें दुसऱ्यांशीं न जमल्यास त्यांचा तिरस्कार करूं नका. ते तुम्हांस नांवें ठेवितील तर त्यांच्या दोषदृष्टींतही जो सत्याचा भाग असेल त्याकडे लक्ष द्या. उत्क्रान्तीच्या चढावावरून जात असतां मनुष्यजातीस जे पूर्वकाळीं अनुभव आले असतील ते शांतपणें हिशेबांत धरणें जरूर आहे. नीति-अनीतींची निवड करतांना माणसावर समाजदृष्ट्या फारच मोठी जबाबदारी असते हेंही विसरून चालावयाचें नाहीं. "यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः। स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥" ह्या गीतावचनांत ती जबाबदारी स्पष्ट दाखविलेली आहे. वीरवृत्तीच्या असामान्य धर्माचा अंगिकार करतांनाही सावधपणानें वागलें पाहिजे व परिस्थितीचा विचार केला पाहिजे. नाहींतर ज्यांची तयारी झालेली नाहीं, अशीं माणसें तुमचें उदाहरण पाहून भराभर तुमच्या मार्गानें येऊं लागतील व अनर्थ होईल. करावें काय व करूं नये काय ? हा प्रश्न नेहेमीं भानगडीचा असतो व म्हणून भगवंतांनीं अर्जुनास ' कर्मणो गहना गतिः ' असें सांगितलें आहे. यासाठीं प्रत्येकानें आपले विचार सुसंस्कृत केले पाहिजे, निर्णयशक्ति वाढविली पाहिजे, व कर्तृत्व-बुद्धीस योग्य वळण द्यावयास पाहिजे, नाहींतर मनाचा तोल भलतीकडे जाऊन आततायीपणाचें आचरण हातून घडेल. वीरवृत्तीच्या माणसास आंतून प्रेरणा असते. जे लोक इतरांस सल्ला विचारावयास जातात त्यांच्या हृदयांत ती प्रेरणा नसल्यामुळें ते वीरवृत्तीचे जीवात्मे असण्याचा संभव फारच कमी आहे. तुम्हांपैकीं तरुणांनीं हें विशेष लक्षांत ठेविलें पाहिजे, " एखाद्या श्रेष्ठ ध्येयासाठीं प्राकृत जनांच्या नीतीचे जे सामान्य नियम त्यांच्या विरुद्ध जाऊं किंवा नको ? " असा तुम्हीं मला प्रश्न केलात तर ' सामान्य जनांच्या नीतीनें जा ' असेंच मी तुम्हांस म्हणेन; कारण ज्यास आंतून तीव्र प्रेरणा असते तो लोकांस विचारावयास जात नाहीं. ' वीरवृत्तीचा तेजस्वी धर्म अंगिकारण्यासाठीं मी बापाची आज्ञा मोडूं काय ? ' असा प्रश्न तुम्हां तरुणा-समोर येऊन जर तुमच्या मनांत भवति नभवति चाललेली असली, तर बापाच्या आज्ञेप्रमाणें चालणें श्रेयस्कर आहे, हा त्याचा अर्थ होतो. मनास संशय आला म्हणजे सामान्य नीतिनियमांचें अतिक्रमण करूं नये. जेव्हां आत्मा अंतरंगांतून बोलूं लागतो तेव्हां त्याचे शब्द निर्वाणीचे असतात व मग दुस-

त्याच्या उपदेशाची गरज लागत नाहीं. महत्कार्यांचे निश्चय अंतरंगाच्या एकांतांत ठाम होतात, त्यांस चव्हाठ्यावरील माणसांची अपेक्षा नसते. लोकांची गरज वाटणाऱ्यानें वीराच्या धर्माचा अवलंब करूं नये, कारण त्या मार्गावरील पंचानन दृष्टीस पडले म्हणजे त्याचे पाय कांपावयास लागतील.

## उपसंहार.

यासाठीं 'तुम्ही अमुक अमुक स्वार्थत्यागाची गोष्ट करा' असा मी केव्हांही कोणास उपदेश करीत नाहीं. नीतीचे नियम काय याचें सामान्य विवेचन मी करितें, स्वार्थत्याग ही उच्च माणसाची नीति आहे असेंही सांगतें, पण विशिष्ट स्वार्थत्यागाचा प्रश्न आला असतां 'तुम्ही अमुक करा' असें कोणासही सांगत नाहीं. तो विचार ज्याचा त्यानेंच केला पाहिजे. तुमच्याबद्दल मी विचार करून भागणार नाहीं, व कोणासही आपले विचार दुसऱ्यावर बळजबरीनें लादण्याचा हक्क नाहीं. मजमध्यें वैगुण्य कोणतें आहे हें मला अवगत आहे. तसेंच माझें धैर्य किती आहे व माझी शक्ति किती आहे हेंही मला माहीत आहे. ती अनेक जन्मांची कमाई आहे. जो मार्ग स्वीकारणें मला स्वतःला इष्ट वाटतें त्या मार्गानें मी दुसऱ्यांस बोलावणें उचित नाहीं. कारण स्वार्थत्यागाचा निश्चय ज्याचा त्यानें डोळे उघडून केला पाहिजे. नाहीं तर दुःखाचे प्रसंग आले म्हणजे धीर सुटून जाईल. सत्याचें निशाण घेऊन पुढें जाणाऱ्या वीर पुरुषानें टाकींचे घाव सोसण्यास तयार असलें पाहिजे, नाहींपेक्षां त्यास प्राकृत जनांची वाट मोकळी आहे. शरपंजरीं पडून शोणितधारा वाहूं लागल्या तरी वीरास आनंदच वाटत असतो. हा त्याच्या जीवात्म्याचा पराक्रम होय. दोन कर्तव्यांचा लढा उत्पन्न झाला असतां 'काय करूं' म्हणून विचारण्यास मजकडे अनेक विद्यार्थी येतात. मी त्यांस कर्तव्याचे फक्त सामान्य नियम सांगतें. अमुक अमुक परिस्थितींत काय करावें हा प्रश्न आपापला मगदूर पाहून ज्याचा त्यानें सोडविण्याचा असल्यामुळें मी त्यांस निश्चित उपदेश करीत नाहीं. स्वतःची जबाबदारी ज्यानें त्यानें पाहून घ्यावी. ती पाहतांना ध्येय काय असावें इतकेंच सांगणें मला शक्य आहे. ज्याचे अंतश्चक्षु उघडले आहेत त्यानें सर्व आकाश कोसळलें तरी सत्याची कांस कदापि सोडतां कामा नये, ही नीतीची पराकाष्ठा आहे—हें नीतीचें ध्येय आहे. या ध्येयाकडे दृष्टि लावून जो वीरपुरुष सदैव आचरण करतो त्यास ईश्वरी इच्छेचे आपण हस्तक आहों ही प्रचीति आल्यामुळें त्यावर केवढीही मोठी संकटपरंपरा कोसळली तरी त्याच्या शान्तीचा भंग होत नाहीं व त्याच्या वांट्यास जो आनंदानुभव येतो तो व्यक्त करण्यास वैखरी वाणी समर्थ नाहीं.

# बंधुत्व.

—:०:—

थिऑसॉफिकल सोसायटीच्या परिषदेच्या व्याख्यानमालेंतील आजचें व्याख्यान शेवटलें होय. एकंदर विषय नीटपणें ध्यानांत येण्यासाठीं मागील व्याख्यानांत जे विषय प्रतिपादिले त्यांची प्रथम आठवण करून आपण प्रस्तुत विषयाच्या चर्चेस आरंभ करूं या. या व्याख्यानमालेंत प्रथमतः आपण परमेश्वराच्या स्वभावाचा विचार करून त्याचें अस्तित्व, विभु व सर्वगामी आहे व तो प्रेम, आनंद, सामर्थ्य इत्यादि गुणांचें माहेरघर आहे हा सिद्धांत निश्चित केला. नंतर मनुष्य म्हणजे कोण आहे या गोष्टीचा अभ्यास करून तोही ईश्वराचा अंश आहे, व बीजवृक्षन्यायानें कर्म व पुनर्जन्म या दोन नियमांप्रमाणें त्याची वाढ होऊन तो शेवटीं ईश्वरस्वरूपाप्रत येऊन पोहोंचणार हें आपण पाहिलें. त्यानंतर तिसऱ्या व्याख्यानांत नीति-अनीतीची गुंतागुंत सोडवून आपण कर्माची गहन गति आकलण्याचा यत्न केला व मनुष्य उत्क्रान्तिमार्गावर कोठेंही असला तरी जर तो आपलें बुद्धिसर्वस्व खर्च करून जो मार्ग सर्वांत श्रेष्ठ दिसेल त्यानें सदैव जाण्याचा निश्चय करील तर तो एकसारखा अधिक अधिक श्रेष्ठ होईल व शेवटीं सामर्थ्य, भक्ति व ज्ञान या तिन्ही गोष्टींत तो अघाडी मारील, हा विचार प्रस्थापित केला. प्रकृत व्याख्यानमालेंतील विचारसरणीचा आजच्या व्याख्यानांत समारोप व्हावयाचा आहे. आजचा विषय बंधुत्व हा आहे. बंधुत्व म्हणजे काय, समाजाची सुव्यवस्थित घटना बंधुत्वाच्या तत्त्वावर करतां येईल किंवा कसें, इत्यादि प्रश्न आजच्या व्याख्यानांत यावयाचे असून जमल्यास बंधुत्वाच्या दृष्टीनें भविष्यकाळीं कोणत्या सुधारणा अमलांत आणणें इष्ट आहे, व भावि संस्कृति कोणत्या वळणावर जाणार आहे याचें कांहीं दिग्दर्शन करण्याचा माझा मनोदय आहे.

## बंधुत्वाचा अर्थ.

बंधुत्व—Brotherhood हा शब्द जुना आहे व वेळोवेळीं त्याचे अर्थही निरनिराळे करण्यांत आलेले आहेत. बंधुत्व याचा अर्थ सारखेपणा किंवा समता असा होत नाहीं. तत्त्वाच्या दृष्टीनें, किंवा जातीच्या दृष्टीनें पाहिल्यास बंधुत्वाच्या कल्पनेंत जरी समतेचा व ऐक्याचा अंतर्भाव होत असला–

तरी वयामध्यें व सामर्थ्यामध्यें बंधुबंधूंमध्यें तारतम्यभाव असतो, तेव्हां बंधुत्वाच्या कल्पनेंत योग्यतेच्या बाबतींत समता येऊं शकत नाहीं हें उघड आहे. फ्रान्सच्या राज्यक्रान्तीच्या वेळीं स्वातंत्र्य, समता व बंधुता या तीन तत्त्वांचा घोष करण्यांत आला होता हें आपणांस विदित असेलच. या त्रयींपैकीं पहिली स्वतंत्रता व शेवटली बंधुता यांचा स्वीकार केल्यास मधली समताही त्यांत आपोआप येते असें कित्येक लोक गृहीत धरून चालत असतात. बंधुत्वाच्या कल्पनेंत जन्मस्थानाची समता किंवा ऐक्य असतें असा जर त्या विचारसरणीचा अर्थ असला तर तो बरोबर आहे. ईश्वर हें मनुष्याचें उगमस्थान होय व सर्व माणसें त्या एकाच स्थानापासून जन्मलेलीं असून अखेरीस तीं त्याचेकडे परत जावयाचीं आहेत. तेव्हां जातिदृष्ट्या सर्व माणसें सारखीं आहेत; त्यांची उत्पत्ति एकच असून भवितव्यताही सर्वांची तीच आहे. अर्थात् या दृष्टीनें जर कोणी सर्व माणसांत समता आहे, असें म्हणत असेल तर तें म्हणणें बरोबर आहे. आपण ईश्वरापासून निघून उत्क्रान्तिमार्गावर आलों, आपणांत प्रसुप्त असलेल्या बीजरूपी ज्या अनेक शक्ति आहेत त्या उत्क्रान्तिमार्गांत विकसित होऊन त्यांपासून "नाना सामर्थ्यें" वाढावयाचीं आहेत व तीं वाढल्यावर आपण सर्व ईश्वरस्वरूपी होऊन ईश्वरांत लीन होणार आहों. तेव्हां जर आपण आरंभीं व शेवटीं सर्व एकच स्वरूपाचे आहों तर सर्व माणसें या दृष्टीनें सारखींच आहेत—त्यांत समता आहे हें म्हणणें ओघासच येतें. पण बीजापासून वृक्ष होण्याचा जो लांबच लांब क्रम आहे त्या उत्क्रान्तिक्रमाच्या दृष्टीनें पाहिल्यास माणसामाणसांत समभाव नाहीं हें ध्यानांत बाळगलें पाहिजे. उत्क्रमणमार्गावर जी पुरुष व प्रकृति यांची चढाओढ लागलेली असते, तिच्याकडे दृष्टि फेंकल्यास माणसें व माणसांचे वंश हे सम नसून विषम आहेत, कांहीं पुढें तर कांहीं मागें आहेत असें आढळून येतें. ब्रह्मदृष्ट्या सर्व माणसें सारखीं, पण संसृतिदृष्ट्या व जीवदृष्ट्या तीं अगदीं भिन्न आहेत. सृष्टीमध्यें सारखेपणा मुळींच नाहीं. अठराव्या व एकोणिसाव्या शतकांत सर्व माणसें सारखीं आहेत असें सांगणारा समतावाद जो प्रचलित होता त्याचा निषेध मोठ्या जोरानें सृष्टि पदोपदीं करीत आहे. शहाणा आणि मूर्ख, पहिलवान आणि पंगु, रोगी व निकोप यांत सारखेपणा आहे काय ? उत्क्रान्तिपंथाच्या आरंभीं चालणारा रानटी माणूस व प्रवास संपवून कृतार्थ झालेला ऋषि या दोहोंमध्यें तुमच्या डोळ्यांस समता दिसते काय ? सृष्टींतील प्रत्येक गोष्ट या

साम्यवादास एकसारखें खोटें पाडीत आहे. बंधुत्वाचा अर्थ विषमता-भिन्नपणा-वयाच्या दृष्टीनें भिन्नपणा, सामर्थ्याच्या दृष्टीनें भिन्नपणा, कर्तव्याच्या दृष्टीनें भिन्नपणा असा होतो. लहानमोठ्यांचीं कर्तव्यें एक असत नाहींत. मातेच्या अंगावर दूध पिणारें मूल व मुलाबाळांचा संसार चालविणारा गृहस्थ यांची योग्यता व कर्तव्यें यांत जमीनअस्मानाचें अंतर आहे. सृष्टीची रचना समजून घ्यावयाची असेल तर व्यक्तिव्यक्तीमध्यें समता आहे व सर्व माणसें योग्यतेनें सारखीं असतात हा विचार आपण दूर झुगारून दिला पाहिजे. याचा अर्थ सर्व माणसांस--समाजांत सारखेपणानें वागवूं नये असा करावयाचा नाहीं. कोणत्याही माणसाचें नुकसान होईल अशी समाजाची कृत्रिम घटना करूं नये, नागरिकांस समतेनें वागविण्यांत यावें व कायद्याच्या दृष्टीनें राव व रंक हे सारखेच समजण्यांत यावे, हीं ध्येयें योग्य आहेत व मी त्यांस आक्षेप घेत नाहीं. सर्व माणसांस सारख्या सवलती मिळाव्या हें समाजरचनेचें ध्येय मला कबूल आहे. पण पुढें येण्यास समाजांत सर्वांस सारखा अवकाश मिळेल अशी जरी समाजाची व्यवस्था केली तरी सर्व लोक एकसारखे होणार नाहींत. कारण माणसामाणसांत निसर्गतः उच्चनीच भाव असतो. सर्वांस सारखा अवसर मिळेशी व्यवस्था केली तरी संधि मिळाल्याबरोबर लगेच तिचा फायदा घेऊन पुढें येण्याचें सामर्थ्य सर्व माणसांत सारखें नसतें. मिळालेल्या संधीचा फायदा घेण्यांत जो माणसामाणसांत फरक असतो तो मूळचाच असतो व मानवी कायद्यानें तो नाहींसा होण्याजोगा नाहीं हें लक्षांत ठेवावयास पाहिजे.

## नवीन ध्येय.

पण बंधुत्वांत जरी उच्चनीच भाव येत असला तरी त्यांत समाजरचनेची नवीन कल्पना आपणास मिळणार आहे. प्रत्येक माणसाच्या सामर्थ्याच्या मानानें समाजानें त्याचेकडून सेवा घ्यावी व प्रत्येक माणसास आवश्यक असेल ती मदत त्यास समाजानें करावी हें समाजरचनेचें तत्त्व बंधुत्वांत अंतर्भूत झालेलें आहे. सामर्थ्यानुरूप काम घेऊन आवश्यकतेनुरूप दाम देण्याचें तत्त्व समाजास लागू केल्यास समाजास जें कलहाचें स्वरूप आलें आहे, तें पालटून त्यांत प्रेम व स्वार्थत्याग सर्वत्र दिसूं लागेल. हिंदुस्थानांतील एका ऋषीच्या वचनास अनुसरून हक्स्ले यानें म्हटलें आहे कीं ' जितकें बळ अधिक तितका जीवनकलहांत टिकाव धरण्याचा संभव

अधिक (survival of the fittest), हा नियम पशूंच्या उत्क्रांतीस मात्र लागू आहे. मनुष्याच्या उन्नतीस स्वार्थत्यागाचा नियम लागू आहे. जितका स्वार्थत्याग असेल त्या मानानें माणसाची प्रगति होत असते. तर येणेंप्रमाणें बंधुत्वाच्या कल्पनेंत समाजरचनेचें उच्च ध्येय आहे. बंधुत्वाच्या दृष्टीनें जगांतील माणसें लहानमोठीं आहेत, कांहीं जीवात्मे वडील आहेत तर कांहीं अल्पवयी आहेत. वयांत फरक आहे, म्हणून त्यांच्या योग्यतेंत फरक आहे. योग्यतेंत फरक आहे म्हणून त्यांच्या कर्तृत्वशक्तींत फरक आहे. कर्तृत्वशक्तींत फरक आहे म्हणून त्यांच्या कर्तव्यांत—धर्मांत—फरक असला पाहिजे. लहानमोठेपणा व तदनुषंगिक भेद जसे बंधुत्वांत समाविष्ट असतात त्याचप्रमाणें बंधुत्वांत परस्परांविषयींच्या प्रेमाचाही अंतर्भाव होतो. तेव्हां जरी समाजांतील कांहीं माणसांस अधिक सामर्थ्य असलें तरी तें सामर्थ्य 'बळी तो कान पिळी' या न्यायानें दुसऱ्यांवर जुलूम करण्याकरितां नसून कमी सामर्थ्याच्या माणसांच्या रक्षणाकरितां आहे, असा बंधुत्वाचा अर्थ होतो. जे का रंजले गांजले । त्यांसि म्हणावें आपुले । ही समर्थांच्या शिरावरील जबाबदारी आहे. अनाथांचें रक्षण करणें हें समर्थांचे कर्तव्य आहे. म्हणून ख्राइस्टनें लोकांस उपदेश केला आहे कीं, 'तुम्हांपैकीं जो सर्वांत मोठा असेल त्यानें इतरांचा सेवक व्हावें' उत्क्रांन्तींत जें सामर्थ्य मिळवावयाचें असतें तें दुसऱ्यास सहाय्य करण्याकरितां आहे, त्यास पायांखालीं तुडविण्याकरितां नाहीं. अशा रीतीनें वरचे लोक खालच्यांस उपयोगीं पडूं लागले व त्यांच्या बळावर खालच्यांतील उणेपणा भरून निघूं लागला म्हणजे सृष्टींत जो मूळचाच न्यूनाधिकभाव आहे तो नाहींसा होईल. बंधुत्वासही सृष्टींत सारखेपणा हवा आहे. स्वभावतःच उच्चनीचपणा असलेल्या सृष्टींत प्रेमाची सर्वत्र भर टाकून तो सारखेपणा उत्पन्न होईल.

## ऋषिमंडळ व दैवी राजवंश.

बंधुत्वाचीं तत्त्वें व्यवहारांत कशीं चालतात तें पहावयाचें असल्यास प्राचीन-काळच्या राजांचीं उदाहरणें घेतलीं पाहिजेत. जुन्या काळच्या राजांचें ध्येय बंधुत्वाच्या कल्पनेवर बसविलेलें आहे. या प्राचीन राजांनीं जें स्वतःसमोर ध्येय ठेविलें होतें, व जी व्यवस्था केली होती ती मुळांत **ऋषिमंडळांतील** रचनेवरूनच घेतली होती. ऋषिमंडळ म्हणून जी संस्था आहे ती योग्यतेनें

एकापेक्षां एक अधिक असणाऱ्या व्यक्तींचा—निरनिराळ्या पायरीवर असणाऱ्या व्यक्तींचा—संघ आहे. ज्यास आम्ही गुरुदेव किंवा मास्टर्स असें म्हणतों तीं माणसें या संघांतील आहेत. या गुरुदेवांस वडील बंधु या संज्ञेनें संबोधिल्यास त्यांस तें विशेष प्रिय वाटतें. कारण ते स्वतः जेथपर्यंत पोहोंचले आहेत तेथपर्यंत आह्मां लहानांस हात धरून नेणारे ते खरोखरीचे वडील बंधु आहेत. या ऋषिसंघांत बंधुत्वाचें उत्कृष्ट स्वरूप दिसून येतें. त्यांतील व्यक्ति जीवन्मुक्त असून त्या ज्ञानाच्या पैलथडीस गेलेल्या असतात. हीं माणसें मुक्त म्हणजे स्वतंत्र असतात. पण जरी तीं हक्कानें बंधनांतून सुटलेलीं असलीं तरी प्रेमाच्या सांखळीनें पृथ्वीशीं बांधलेलीं असतात. आपलें सामर्थ्य व ज्ञान तीं जगाच्या कल्याणाकडे लावितात व मानवांस मार्ग दाखविण्यासाठीं, त्यांचा सांभाळ करण्यासाठीं, त्यांस धीर देण्यासाठीं आपल्या शक्तीचा व्यय करीत असतात. त्यांच्या बंधुत्वाचा अर्थ मनुष्याची सेवा असा होतो व त्यांच्या संघांत बंधुत्वाचें उत्कृष्ट स्वरूप दृष्टीस पडतें. ऋषिसंघांतून बंधुत्वाचें ध्येय प्राचीनकाळच्या राजवंशांत आलें. हिंदुस्थानच्या व मिसर देशच्या प्राचीन इतिहासांत दैवी राजे व राजवंश नमूद आहेत. त्यांच्यापूर्वी चीन देशांतील धर्मकथांमध्यें वर्णिलेले राजे होऊन गेले. हे राजे मनुष्यजातीच्या चवथ्या मूळवंशांतील असून **सुवर्णद्वारावती** शहरांत ( City of the Golden Gate ) त्यांची राजधानी होती. तेथें राहून या दैवी राजांनीं **टॉल्टेक** लोकांच्या जगड्व्याळ साम्राज्याची उभारणी केली होती. पण आज इतक्या प्राचीनकाळचा मी विचार करीत नाहीं; तसेंच, आपणांस ईजिप्त देशांतील राजांचें उदाहरण घेऊन कालक्षेप करण्याचीही गरज नाहीं. कारण आपल्या हिंदुस्थानच्या वाङ्मयांत दैवी राजांसंबंधाची माहिती सहज मिळण्यासारखी आहे. इक्ष्वाकुवंशास ललामभूत झालेल्या श्रीरामचंद्राचें उदाहरण ध्यानांत आणा. उत्कृष्ट राजा कसा असावा हें आपल्या चरित्रानें दाखवून देणारा तो आदर्श होता. त्याचें चरित्र आपणांस बंधुत्व म्हणजे काय हें शिकवीत आहे. श्रीरामचंद्राच्या चरित्रांत राजाचा धर्म म्हणजे स्वार्थत्याग व जनहित होय, ऐश्वर्य व संपत्ति यांचा उपभोग नव्हे हें स्पष्ट दिसत आहे. प्रजेस सुखाची झोंप यावी म्हणून तो जागरणें करी; प्रजेवर संकटें येऊं नयेत म्हणून तो आपला जीव संकटांत घाली; तो दीनांचा दयाळ, अनाथांचा नाथ, पितृहीन अर्भकाचा पिता व

सौभाग्यहीन अबलेचा प्रतिपाळक असे, अशीं वर्णनें ग्रंथांत आहेत. दैवी राजांच्या नंतरचे राजे हा राजधर्म पाळीत असत किंवा नाहीं याची ऋषि चौकशी करीत असत. याचेही दाखले प्राचीन वाङ्मयांत आहेत. उदाहरणार्थ, **नारद** राजदरबारीं जाऊन लोकस्थितीबद्दल बारकाईनें चौकशी करी व " राजा, तुझ्या छत्राखालीं असणाऱ्या कारागिरांची स्थिति ठीक आहे काय? शेतकरी लोकांस पाण्याचा पुरवठा तूं मुबलक करतोस काय? त्यांचेपाशीं आउतें आहेत ना? तुझ्या सैनिकांस तूं योग्य वेतन देतोस ना? लढाईत कामास आलेल्या लोकांच्या बायकापोरांच्या पोटाची तूं काय तजवीज केली आहेस?" वगैरे नाना तऱ्हेचे प्रश्न विचारून राजे प्रजाहिताविषयीं दक्ष आहेत किंवा नाहींत हें तो पाही, याविषयींचीं ग्रंथांतरींचीं वर्णनें आपल्या स्मरणांत असतील. अशाप्रकारें मनुष्याचे वडील बंधु जे ऋषि ते राजाचें लक्ष त्याच्या धर्माकडे लावीत व तो अंमल योग्यप्रकारें करतो किंवा नाहीं तें पहात असत. आज जगांत राजाच्या गादीस जो मान मिळतो, त्याचें कारण दैवी राजांची प्राचीनपरंपरा होय. आजचे राजे त्या थोर राजांच्या मानानें यथायथाच आहेत व आपल्या धर्माविषयीं नेहेमीं जागरूक असतात असेंही नाहीं. पण इतकें असूनही राजाचें पद म्हणजे भक्तीचें व आदराचें स्थान होय असें जनता मानिते; कारण जुन्या काळच्या थोर थोर राजांची प्रभा आजच्या राजपदांवर विलसत आहे, ती लोकांच्या मनांत स्वामिभक्ति उत्पन्न करते. या स्वामिभक्तीच्या झऱ्याचा उगम प्राचीनकाळांत आहे. एखादा राजा सद्गुणी आणि कर्तव्यदक्ष निघाला म्हणजे जनतेच्या हृदयांत त्या झऱ्याच्या पाण्याचें भरतें येऊन आजही खऱ्या राजनिष्ठेचा पूर लोटतो इतका जिवंतपणा अद्याप या परंपरेंत आहे.

## बंधुत्वाच्या धिक्काराचीं फळें.

**भीष्म** हे धर्माचे मूर्तिमंत अवतारच होत. राजा **युधिष्ठिरानें** पृच्छा केल्यावरून त्यास त्यांनीं राजधर्म सांगितला आहे व तो सांगतांना त्यांनीं त्यास एक इषारा दिलेला आहे. भीष्म म्हणतात, "युधिष्ठिरा, राजाच्या मागें ईश्वराचा नियम आहे–धर्म आहे–व त्याचें जो उल्लंघन करील त्यास खचित प्रायश्चित्त भोगावें लागेल. युधिष्ठिरा, दीनांचा प्रतिपाल त्वां दक्षतेनें केला पाहिजे. कारण दीनांच्या अश्रुपातानें राजांचीं सिंहासनें ढांसळून पडतात." हा उपदेश हल्लींच्या राजांनीं हृदयांत वागविण्याजोगा आहे. राजास शत्रु

असले तर त्यांचें निर्दालन करतां येतें. त्याच्या मार्गात अडचणी असल्या तर त्याही प्रयत्नान्तीं दूर होतात. पण दुःखी, कष्टी आणि अनाथ यांचा राजानें विशेषतः सांभाळ केला पाहिजे. त्यांचा आर्त स्वर ईश्वरास ऐकूं येतो व गरीबांची आबाळ झाल्यास पृथ्वीवरील राजास तो ईश्वराचा प्रतिनिधि असल्यामुळें ईश्वरासमोर जबाब द्यावा लागतो. बंधुत्वाच्या ध्येयास पायांखालीं तुडवून पुष्कळ राजांनीं आपलीं राज्यें उभारल्याचीं उदाहरणें इतिहासांत आहेत. बॅबिलोनियाचें राज्य घ्या, ईजिप्तांतील राज्य घ्या, ग्रीकांचें प्रजासत्ताक राज्य घ्या किंवा रोमचें साम्राज्य घ्या, त्या सर्वांत बंधुत्वाच्या ध्येयास झुगारण्यांत येऊन गरीबांची पायमल्ली करण्यांत आलेली होती. समाजांतील निकृष्ट वर्गाच्या दुःखाच्या पायावर हीं राज्यें प्रस्थापित झालेलीं होतीं. त्यांतील बहुतेक लोक गुलाम असत. या सर्व राज्यांत निर्बल लोकांवर जुलूम होत असे व सत्ताधारी माणसांनीं आपलें सामर्थ्य गरीबांस लुटण्याकडे खर्च करावें असा प्रकार चाले. याचा परिणाम असा झाला कीं, या सर्व राष्ट्रांपैकीं प्रत्येक राष्ट्र इतिहासांतून नामशेष झालें. ग्रीक राज्य, बॅबिलोनियन राज्य, इजिप्शियन राज्य, रोमन राज्य—हीं सर्व राज्यें आज कोठें आहेत? तीं ठार मेलीं आहेत. त्यांची माहिती पाहिजे असल्यास, त्यांच्या ऐश्वर्याची कल्पना हवी असल्यास, त्यांच्या चितेची रक्षा विसकटून पहावयास पाहिजे, एरवीं दुसरा मार्ग नाहीं, अशी स्थिति आली आहे. बॅबिलोनियाचें राज्य आज नाहीं, असीरियाचें राज्य आज नाहीं, निनिवेचें राज्य आज नाहीं, ग्रीकांचें राज्य आज नाहीं, रोमचें राज्य आज नाहीं—तीं सर्व इतिहासाच्या पटावरून एकामागून एक पुसून गेलीं आहेत. पण हीं सर्व राष्ट्रें लयास जाऊन त्यांचा मागमूसही आज सांपडत नाहीं, असें झालें असलें तरी त्या मालिकेंतील एक जुनें राष्ट्र अद्याप उभें आहे. ह्या जुन्या राष्ट्रांशीं समकालीन असणारें एक राज्य आजही जिवंत राहिलेलें आहे. ह्या सर्वांची राखरांगोळी झाली पण हिंदुस्थान आजमितीस जीव धरून आहे. ज्या हिंदुस्थानचा बॅबिलनशीं व्यापार असे तें हिंदुस्थान खिस्तशकाच्या विसाव्या शतकांत विद्यमान आहे. याचें कारण हिंदुस्थानच्या धर्मांत, हिंदुस्थानच्या वाङ्मयांत बंधुत्वाची शिकवण आहे हें होय. सर्व माणसें खरोखरी बंधु आहेत, या विचारास हिंदुभूमीवर प्राधान्य मिळालेलें आहे. ही शिकवण कालान्तरानें लोक विसरले व व्यवहारांतही तिचा

विकार होऊं लागला हें खरें. व त्यामुळेंच हिंदुस्थानास अर्वाचीनकाळीं उतरती कळा लागली आहे.

## वैश्य व शूद्र.

प्राचीनकाळच्या वर्णव्यवस्थेची रचना बंधुत्वाच्या तत्त्वावरच केलेली होती. मनु म्हणतो, शूद्र हा वयानें लहान असलेल्या मुलाप्रमाणें आहे. वयानें लहान असणें हा कांहीं अपराध नाहीं व त्याबद्दल लाज वाटण्याचेंही कारण नाहीं. पण शूद्र हा वयानें लहान असणारा जीवात्मा आहे असें कबूल केलें ह्मणजे समाजव्यवस्थेंत शूद्राचें स्थान कोणतें व समाजानें त्यास कसें वागविलें पाहिजे तें सहज ठरवितां येतें. लहानाशीं आपण ममतेनें वागतों, त्याचेविषयीं आपल्या पोटांत माया असते, कोणताही पदार्थ घरांत पुरेसा नसला तर आपण लहानास अगोदर देतों व त्याची कदापि उपासमार करीत नाहीं. शूद्राकडे या दृष्टीनें पाहिलें पाहिजे. समाजरूपी कुटुंबांतील तो लहान अर्भक होय. तेव्हां समाजानें त्याचेविषयीं प्रेमबुद्धि ठेविली पाहिजे. याच कारणास्तव शूद्रास बंधनें कमी असत व जसजसें वर्णव्यवस्थेंत वरच्या वर्णाकडे जावें तसतसे सामाजिक निर्बंध व विधिनिषेध वाढत असत. शूद्राच्या वरचा वर्ण वैश्याचा. समाजाच्या धारणपोषणाकरितां त्यानें द्रव्यार्जन करावयाचें हा त्याचा धर्म. समाजांतील बाकीच्या वर्णांचा योगक्षेम वैश्याच्या पैक्यावर चालावयाचा. वैश्यानें पैसा मिळवावयाचा तो स्वतःकरितां नसून समाजाचें पोषण व्हावें म्हणून मिळवावयाचा, या प्राचीन ध्येयास अनुसरून आजही वैश्यांनीं आपला दानधर्म ठेविलेला आहे. ते पै पै मिळून संपत्ति जोडतात व वेळ आली असतां अद्यापिही लाखांनीं व कोटींनीं पदरमोड करतात. पण वैश्यांच्या दानपद्धतीस आज निराळी दिशा लागावयास पाहिजे आहे. मागें जेथें खडक नव्हते तेथें आज खडक दिसत आहेत. पाण्याचा प्रवाह खडकावर न सोडतां तो गुलाबाच्या ताटव्यांकडे सोडणें यांत बागवानाचा शहाणपणा आहे; म्हणून आज वैश्यवर्गानें आपल्या दानाचा ओघ शहाण्या बागवानाप्रमाणें सुपीक जमिनीकडे वळविला पाहिजे. नुसतीं देवळें बांधून उपयोग काय? धर्माच्या अनास्थेस्तव लोक देवळांत येत नाहींत. तेव्हां रिकाम्या देवळाच्या कळसास सोन्याचा मुलामा चढवून काय उपयोग? तुमच्या मुलांस धर्माचें शिक्षण नाहीं. एकंदर सर्व शिक्षणच द्रव्याभावामुळें मागस-

लेलें आहे. शिक्षण लोकांच्या हातांत असावयाचें तें सरकारच्या हातांत गेलें आहे. शिक्षण राष्ट्रीय पाहिजे, त्यावर राष्ट्राचा अंमल पाहिजे, त्यासाठीं दानशूर वैश्यवर्गानें पैसा दिला पाहिजे. आज काशीच्या सेंट्रल हिंदु-कॉलेजाची हिंदु-युनिव्हर्सिटी होत असलेली आपण पहात आहों. त्यांत राष्ट्रीयत्व आहे. हा हिंदु-युनिव्हर्सिटीचा यत्न जनतेच्या दृष्टीनें जितका यशस्वी व्हावयास पाहिजे तितका झाला नाहीं हें मला कबूल आहे. पण त्यांत राष्ट्राचा हात आहे. मद्रासेकडे पचय्याप्पाच्या शिक्षणसंस्था आहेत, व त्यांपासून एखादी राष्ट्रीय युनिव्हर्सिटी पुढें मागें अस्तित्वांत येणें अशक्य नाहीं. धर्मशिक्षणाच्या बाबतींत देशी संस्थानें अग्रेसर व मार्गदर्शक आहेत. मुलांस धर्मशिक्षण द्यावें याविषयीं प्रथमतः जो नियम झाला तो हैद्राबादच्या निजामसाहेबांनीं केला, व हिंदूंपुरतीं सेंट्रल हिंदु-कॉलेजनें प्रसिद्ध केलेलीं धर्मपुस्तकें त्यांनीं मान्य केलीं. आपाचा धर्म मुलास शिकविला पाहिजे हा पहिला हुकूम महमदानुयायी प्रधानाच्या हातून सुटलेला आहे. म्हैसुरासही अशीच प्रगति आहे. तेथें शिक्षणांत धर्मशिक्षणाचा अंतर्भाव करण्यांत आलेला आहे. राजपुतान्यांतील व काठेवाडांतील कित्येक संस्थानांनींही तोच उपक्रम केलेला आहे. शिक्षण राष्ट्रीय हवें. त्यांत स्वधर्माविषयीं अभिमान वाटेल अशा प्रकारच्या धर्मशिक्षणाचा अंतर्भाव केला पाहिजे. तसेंच धर्म-शिक्षणानें मनाची वृत्ति आकुंचित होणार नाहीं याचीही खबरदारी घ्यावयास पाहिजे. खऱ्या शिक्षणाची ही दिशा आहे. हें सर्व यशस्वी होण्यास वैश्यांनीं द्रव्याची मदत करणें जरूर आहे. त्यांनीं हातभार लाविल्याशिवाय खासगी शिक्षणसंस्था सरकारी शिक्षणसंस्थांच्या बरोबरीच्या होणार नाहींत.

## ब्राह्मण व क्षत्रिय.

तिसरा वर्ण क्षत्रियाचा. क्षत्रियास पैसा मिळविण्याची मोकळीक होती; तसेंच त्यास सुखाचा उपभोग घेण्यासही आडकाठी नव्हती. पण क्षत्रियास एक अट असे; ती ही कीं, जर राष्ट्रास जरूर असेल तर स्वतःच्या सर्वस्वावर पाणी सोडण्यास त्यानें तयार असलें पाहिजे. लोकांच्या संरक्षणाकरितां, त्यानें आपल्या शरीराचा यज्ञ करण्यास एका पायावर तयार असलें पाहिजे. जिवाची पर्वा न करितां त्यानें समरांगणावर सर्वांच्या पुढें असलें पाहिजे. हा क्षत्रियधर्म झाला. इतर वर्णांस गुरुस्थानीं होणें हा ब्राह्मणांचा धर्म असे. शिक्षणाचीं सूत्रें ब्राह्मणांच्या हातीं असत. विद्या हेंच त्यांचें धन. दुसरें

धन ब्राह्मणानें संपादन करावयाचें नाहीं. तो ईश्वराचें मुख होय. अर्थात् त्यांचें वर्तन शुद्ध व निर्मळ असलें पाहिजे, त्याची रहाणी साधी असली पाहिजे व ऐषआराम मुळींच कामाचे नाहींत. ज्यास ज्ञान मिळालें त्यानें तें दुसऱ्यास देणें हें त्यांचें आद्य कर्तव्य होय. हा धर्म ब्राह्मणाचा होता. हा अत्यंत उदात्त आहे व प्राचीनकाळीं शेकडों वर्षें ब्राह्मण लोकांनीं तो पाळून जगास उत्तम धडा घालून दिला होता. पण सांप्रत ब्राह्मणधर्म लुप्त झाला असून त्यांतील सत्व सर्व नाहींसें झालें आहे. आज ब्राह्मण वकील होतात, डॉक्टर होतात व कधीं एन्जिन ड्रायव्हरही होतात, पण आपला धर्म म्हणून शिक्षक होत नाहींत. ब्राह्मणांचा धर्म सुटला, त्यांचीं कर्तव्यकर्में ते करीनासे झाले व त्यामुळें त्यांचेविषयीं जो पूज्यभाव जनतेस वाटावयाचा तो अर्थात् त्यांस वाटत नाहीं. उच्चवर्ण जर आपलीं कर्तव्यें योग्यप्रकारें करील तरच त्यास लोक हक्कानें श्रेष्ठपणा देतील, एऱ्हवीं नाहीं.

वर्णव्यवस्थेप्रमाणें लोक धर्म पाळीनासे झाल्यामुळें आज हिंदुस्थानांत समाजाची नवीन रचना करणें जरूर झालेलें आहे. हिंदुस्थानांत गुलामांची मोठी संख्या आहे. त्यांस कोणी गुलाम म्हणत नाहीं. त्यांस अस्पृश्य म्हणतात. घाणेरडें अन्न हा वर्ग खात असल्यामुळें, तसेंच त्याचे ठायीं शारीरिक स्वच्छ-पणा नसल्यामुळें उच्चवर्गाचीं माणसें त्यास स्पर्शही करीत नाहींत. म्हणून ते अस्पृश्य झाले आहेत. पण अनाथांच्या आसवांनीं ओलीं झालेलीं राजपदें नाम-शेष होतात या म्हणण्यांत जर तथ्य असेल, तर हिंदुस्थानाची धडगत नाहीं असें म्हणणें भाग आहे. जोंवर एकंदर लोकसंख्येंत एकशष्ठमांश माणसें हिंदु-स्थानांत अस्पृश्य आहेत, तोंवर हिंदुस्थानाचें भाग्य उदयास येण्यास अवकाश आहे असें समजलें पाहिजे. भंगी, झाडू, वगैरे लोकांवर वाईट व कष्टाचें काम सोंपविलेलें आहे व त्यांचेवर समाजाचा जुलूम होत आहे. एकषष्ठांश लोकांस अशाच हीनावस्थेंत ठेवून जर हिंदुस्थान देश बंधुत्वाच्या नियमास पायाखालीं सतत तुडवीत राहील तर त्याच्या आयुष्याची दोरी संपत आली आहे असें समजा. मग हिंदुस्थानच्या बरोबरीच्या प्राचीन राष्ट्रांची जी गत झाली तीच हिंदुस्थानची होईल. पूर्वी ह्या अस्पृश्य लोकांस तुम्हीं जिंकून पादाक्रांत केलें आहे, त्यांस वाईट रीतीनें वागविलें आहे, तुम्हीं त्यांस बहिष्कृत केलें असून घाणेरडीं कामें त्यांच्या माथीं मारिलीं आहेत. तुम्हांस स्वच्छपणानें रहातां यावें म्ह न त्यांची रहाणी घाणीची झालेली आहे. तुम्हीं सुशिक्षित

व्हावें म्हणून समाजानें त्यांस अज्ञानांत लोळत ठेविलें आहे. तुम्ही उन्नत व्हावें म्हणून निकृष्ट अवस्था त्यांच्या वांट्यास आलेली आहे. या अस्पृश्य वर्गांचा करुणस्वर ईश्वरास अद्याप ऐकूं गेला नाहींसें तुह्मांस वाटतें काय? तुम्ही दुसऱ्यांस गुलामगिरींत ठेविलें आहे तर तुमच्याही कपाळीं गुलामगिरी यावी असा ईश्वरानें निकाल दिला आहे.

## निकृष्टवर्गांचा उद्धार.

या हीन लोकांशीं उच्चवर्गांची वागणूक कशी असली पाहिजे हें ठरवितांना सर्व हलकीं कामें उच्चवर्गांस जर आपलीं आपणच करणें भाग पडलें तर काय होईल, याचा विचार करणें जरूर आहे. हातांत झाडू घेऊन तुमची स्वच्छता तुम्हांसच ठेवणें जरूर झालें तर तुम्ही आज आहां, इतके सभ्य व सुसंस्कृत राहूं शकाल काय? हीं कनिष्ठ कामें जर अस्पृश्यवर्ग करितो तर त्यांचा अनादर व तिरस्कार न करितां त्यांचेविषयीं मनांत सद्बुद्धि ठेवून कृतज्ञ असणें हें तुमचें कर्तव्य नव्हे काय? हा वर्ग हीं कामें करण्याचें जर टाकून देईल तर तें काम करण्याची पाळी तुमच्या बायकांमुलांवर येईल. अशी जर वस्तुस्थिति आहे तर तुम्हांस त्यांचा तिरस्कार करण्यास तोंड आहे काय? त्यांचा धिःक्कार करणें म्हणजे बंधुत्वास धाब्यावर बसविणें आहे. या निकृष्ट लोकांचें नष्टचर्य संपवून त्यांचा उद्धार जर तुम्ही करणार नाहीं तर राष्ट्रमालिकेंत उच्च स्थान मिळविण्याची आशा हिंदुस्थानानें सोडून द्यावी. इतर देशांतही निकृष्ट वर्गाचे लोक आहेत. माझ्या देहास ज्या देशानें जन्म दिला त्या देशांत जे लोक इस्पितळांत, हमालखान्यांत, किंवा तुरुंगांत येऊन मरतात, त्यांची संख्या एकंदर लोकसंख्येच्या एकदशांश आहे. हा तेथील निकृष्ट वर्ग होय. पण मला सांगण्यास दुःख वाटतें कीं, या वर्गाची स्थिति सुधारली पाहिजे ही जाणीव जशी इंग्लंडच्या लोकांस आहे तशी तुम्हांस नाहीं. इंग्लंड त्यांस वर काढीत आहे, इंग्लंड त्यांस शिक्षण देत आहे व त्यानें ते खास सुसंस्कृत होतील. काम जितकें हीन दर्जाचें व मलिन असेल त्या मानानें कामाचे तासही कमी करावयास पाहिजेत ही गोष्ट इंग्लिश लोकांस पटली आहे. जें काम मनुष्याची वृत्ति हीन करतें तें काम करणाऱ्यास रिकामा वेळ अधिक दिला पाहिजे. म्हणजे त्या फुरसतीमधील व्यवसायानें वृत्तीमधील मलिनता त्यास काढून टाकतां येईल. ही गोष्ट इंग्लिश लोकांच्या ध्यानांत येऊन चुकली आहे. या वर्गासाठीं घरें बांधणें वगैरे

खटपटी ते करीत आहेत व जें स्वातंत्र्य आपण मिळविलें त्याचा हक्काचा वांटा या लोकांस देण्याचा ते उपक्रम करीत आहेत.

ईश्वराच्या घरीं सारखा न्याय आहे. तुम्ही ईश्वरासमोर हात पसरून जर त्याचेपाशीं स्वातंत्र्याची भिक्षा मागत असाल तर आपल्यांतीलच निकृष्ट लोकांस स्वातंत्र्य देण्याची तुमची तयारी असली पाहिजे. एरवीं देवासमोर पसरलेल्या हातावर दान पडणार नाहीं; व रिक्त हस्तानें तुम्हांस परत यावें लागेल. तुम्हीं दुसऱ्यावर जुलूम कराल तर तुमच्या वांट्यासही जुलूमच येईल. जे दुसऱ्यांस आपले म्हणत नाहींत त्यांस कोणीही आपले म्हणणार नाहीं, हा ईश्वराचा नियम आहे. जर तुम्ही हा नियम न पाळाल व बंधुत्वाची अवहेलना कराल, तर ज्या देवराजाकडे हिंदुस्थानचें आधिपत्य आहे, त्याचा प्रसाद तुम्हांवर होणार नाहीं; व त्याच्या सामर्थ्याचा पाठिंबा तुमच्या पक्षास मिळणार नाहीं. पण तुम्ही जागृत होऊं लागलां आहां ही समाधानाची गोष्ट होय. अस्पृश्य वर्गाच्या शिक्षणाकरितां शाळा निघूं लागल्या आहेत. अशा शाळा म्हणजे बंधुत्वरूपी देवाचीं पूजास्थानें होत. हिंदुस्थानास राष्ट्र म्हणून एकजीव करण्यास यांचें सहाय्य होणार आहे.

## दैवी संपत्तीचें स्वरूप.

बंधुत्वाचें तत्त्व जर हिंदुस्थानानें आचरणांत आणावयाचें असेल तर प्रथम तुम्हीं सर्व माणसांत एकच आत्मा आहे हें तत्त्व ओळखिलें पाहिजे. ब्राह्मणांमध्यें व अतिशूद्रांमध्यें, अत्यंत शुचिर्भूत पुरुषांमध्यें व पराकाष्ठेच्या मलिन माणसामध्यें एकच आत्मा दाखविणारी समदृष्टि तुम्हीं संपादन केली पाहिजे. अध्यात्म-निर्झरांतून तुम्हांकडे वहात येणारें पाणी तुम्हीं जसजसें इतरांकडे अधिकाधिक सोडाल तसतसें तुम्हांकडेही तें अधिक येईल. तुमच्या द्वारां दुसऱ्याकडे वहाणाऱ्या जीवनाचा पाट तुम्ही जितका रुंद कराल तितकें त्यांत उगमापासून अधिक पाणी यावें हा अध्यात्मशास्त्राचा नियम आहे. हा नियम बंधुत्वाच्या तत्त्वाचा पर्याय आहे व पुढें समाजाची रचना बंधुत्वाच्या वळणावर जावयाची आहे. भावी समाजांत प्रत्येकास आपल्या अंगातील सर्व गुणांचा विकास करण्यास वाव सांपडेल, अशी व्यवस्था व्हावयाची आहे. प्रत्येकास प्रयत्न करण्यास अवकाश मिळावा व कोणाच्याही मार्गांत कृत्रिम अडचणी आणूं नये, हें भावी समाजव्यवस्थेचें धोरण

राहील. अंगांतील गुणांची सर्व बाजूंनीं वाढ करण्याकरितां भावी समाज व्यक्तीस सवलती देईल. व त्यानें जरी सर्व माणसें सारखीं झालीं नाहींत तरी समाजाची सुधारणा होईल. कारण माणसाच्या आंगच्या गुणांची व सामर्थ्याची वाढ खुंटविण्याचा कोणासही अधिकार नाहीं. कोणाच्याही मार्गांत अ-स्वाभाविक अडथळे उत्पन्न करून त्याच्या प्रगतीस विरोध करतां कामा नये. मुक्त हस्तानें तुम्हीं हें दान आपल्या बंधूस दिलेंत, ईश्वराकडून तुम्हांकडे येणारा जीवनप्रवाह बांध घालून न अडवितां तो तुम्हीं इतरांकडे पाट फोडून लाविलात ह्मणजे ईश्वराचें जीवन वाहून वाहून संपत नाहीं, तें सदैव दुथडी तुडुंब भरून वहात राहूं शकतें, याचें तुम्हांस साक्षात् ज्ञान होईल.

या मजसमोरील टेबलावर जर मीं सोन्याच्या मोहोरा ठेविल्या व तुम्हांस त्या वांटूं लागलें तर त्या घेण्यासाठीं तुमची कोण धांदल उडून जाईल बरें ! तुम्हीं सगळे उठून घाईत मजकडे धांवत सुटाल व येथें मोहोरा घेण्या-साठीं इतकी गर्दी होईल कीं, तींत बोट शिरकण्याचीही मारमार पडेल. तुम्हीं मोहोरा घेण्याकरितां धांवत याल याचें कारण इतकेंच कीं, जितक्या अधिक मोहोरा वांटल्या जातील तितक्या त्या कमी होतील व उशीर झा-ल्यास मागून येणारांकरितां एकही शिल्लक रहावयाची नाहीं. टेबलावरील राशींतून उचलून दिलेल्या दर मोहरगणिक वांटावयास काढलेल्या पुंजींतली एक एक मोहोर कमी होते हें तुम्हांस माहीत असल्यामुळें प्रत्येक जण दुसऱ्याच्या अगोदर येथें येण्याची धडपड करील व एका मोहोरेनें संतुष्ट न होतां जितक्या अधिक मोहोरा मिळतील तितक्या घेईल. जमल्यास उद्यांचीही तरतूद झाल्यास पाहील. भौतिक संपत्ति देऊन देऊन संपते म्हणून ती मिळविण्यासाठीं माणसें धडपड करितात. भौतिक गोष्टींत या कार-णामुळें चढाओढ सुरू होते व कलह माजतात. पण समजा, येथें सर्वांस पुरून उरण्याइतक्या मोहोरा आहेत याची तुम्हांस खात्री असली तर तुम्हीं येथें धडपडत येऊन गर्दी कराल काय ? आत्मसंपत्तीचा प्रकार भौतिक संपत्तीहून भिन्न आहे. आत्मसंपत्तीचें चैतन्य सतत वहात असतें. वाहून वाहून पसरत जाणें हा त्याचा मूलस्वभाव आहे. हें जितकें दुसऱ्यास द्यावें तितकें तें अधिक होतें. तें देऊन संपत नाहीं, किंवा वाहून ओहोटत नाहीं. जितका व्यय करावा तितकी त्याची वृद्धि होते. ज्ञान, इच्छा व क्रिया हे जे आत्मचैतन्याचे तीन प्रकार ते व्यय केल्यानें

कमी होत नाहींत. दुसऱ्यास दिल्यानें ते संपून जातील हा विचार विसरून आपण ते देण्यास तयार असलें पाहिजे. मला एखाद्या सत्य गोष्टीचें ज्ञान असलें व तें मीं दुसऱ्यास दिलें तर तें संपून जातें काय ? सत्य मीं लोकांस दिलें तरी फिरून मजजवळ कायम राहतें, दिल्यानें त्याचा व्यय होत नाहीं. माझ्या घरच्या निरंजनापासून हवीं तितकीं निरंजनें लावतां येतील, त्यानें माझें निरंजन पूर्ववत् तेवत रहाण्यास अडचण होणार नाहीं. जितके ज्ञानदीप अधिक लावावे तितका तितका प्रकाश अधिक होतो, म्हणून ज्ञान देण्यास भिऊं नका. तुम्हापाशीं ज्ञान असल्यास तें उराशीं धरून आपल्या बरोबरीच्या माणसांत न बसतां अज्ञ लोकांकडे जाऊन त्यांस तें मोकळेपणानें अर्पण करा. ज्ञान म्हणजे तिमाजी नाईकाची इस्टेट नव्हे. तुम्ही त्याचें जसजसें दान कराल तसतसें तें तुह्मांसच अधिक चांगलें समजेल व तुमच्या स्वभावांत मुरून जाईल. ज्ञान देण्यांत कद्रूपणा कराल, समाजशरीरांतून तें स्वैरपणें जर तुह्मी फिरूं न द्याल तर गोठलेल्या रक्ताप्रमाणें तें रोग उत्पन्न करील व हळूहळू तुमचीच ग्रहणशक्ति नष्ट होईल. शुचिर्भूतपणाचा प्रकारही ज्ञानासारखाच आहे. तुम्ही एकटे रहातां, जगाच्या मोहांत पडत नाहीं ह्मणून तुमचें अंत:करण निर्मळ व शुद्ध राहिलें आहे काय ? तसें असल्यास दूर व्हा, कारण तो शुचिर्भूतपणा नव्हे. ज्याच्या शुचिर्भूतपणास लोकांचा विटाळ होतो तो शुचिर्भूतपणा नसून तो शुचिर्भूतपणाचा नुसता आळ आहे. जी मनाची पवित्रता किंवा जो शुद्धपणा लोकसंसर्गानें मलिन होतो, तो खरा शुद्धपणा नसून स्वत:-चा मलिनपणा दुसऱ्यास दिसूं नये म्हणून त्यावर घातलेलें तें आच्छादन होय. अशुचि माणसांत जाऊन त्यांचा उद्धार करणें हें शुचिर्भूताचें कर्तव्य आहे. कांहीं लोक म्हणतात, वरच्यास खालीं ओढून उच्चनीच भाव नाहींसा करा व सर्वत्र समता उत्पन्न करा. ब्राह्मणास खेंचून खालीं आणा. श्रीमानास खालीं ओढा. पण याचा काय परिणाम होईल याचा कोणीं विचार केला आहे काय ? अशानें समता उत्पन्न होईल खरी, पण ती अज्ञानाची, अवनतीची, दु:खाची व दारिद्र्याची समता होईल. म्हणून या मार्गानें जाऊं नका. उलट दरिद्र्यांस त्यांच्या हीन स्थितींतून वर काढा व सर्वच सुखी होण्याकरितां व फाजील संपत्ति कोणासही मिळणार नाहीं अशी खटपट करा. अज्ञांचा उद्धार करा, व मन सुसंस्कृत करणारें ज्ञानामृत सर्वांस मिळण्याची सोय

करा. घाणीच्या पंकांत रुतलेल्यांस वर काढा. म्हणजे सर्व माणसें पवित्र व निर्मळ होतील. वरच्यांस खालीं ओढून सर्वांस अवनत न करितां पतितांचा उद्धार करा म्हणजे एकूण एक सर्व माणसांची उन्नति होईल व ज्ञान, सुख व शुचिर्भूतपणा राष्ट्रांत सर्वत्र खेळूं लागेल.

## ईश्वराचें सूत्र.

तुमच्या धर्मग्रंथांत हें बंधुत्व तुम्हांस शेंकडों ठिकाणीं सांगितलेलें आहे, " अहं ब्रह्माऽस्मि " असें म्हणण्याचा अमुक एकास अधिकार नाहीं असें आहे काय ? स्वतःचें ब्रह्माशीं एकत्व स्थापण्याचा जर प्रत्येकास हक्क आहे व जर तुम्ही त्या एकाचेच सर्व अंश आहां तर स्वतःचा सवता सुभा कोणासही करणें शक्य नाहीं. पायाच्या आंगठ्यास सर्प चावला तरी तें विष शरीरांत चोहोंकडे पसरतें. पायास दंश झाला तरी डोकें दुखूं लागतें, हातपाय मोडून येतात, हृदय बंद पडतें व अशा रीतीनें सर्व शरीराचा नाश होतो. राष्ट्रपुरुषाच्या पायांत—कनिष्ठ वर्गांत विष गेलें असल्यास तें सर्वांग शरीरांत भिनून जाईल हें लक्षांत ठेवा. जोंवर राष्ट्रांत एक माणूस दरिद्री आहे, जोंवर समाजांत एक व्यक्ति अज्ञानी आहे, तोंवर कोणासही उन्नतीच्या उच्च शिखरावर जाऊन शान्तीचा उपभोग घेणें शक्य नाहीं. विकार कोठेंही झाला तरी तो चोहींकडे पसरून समाजशरीराचें स्वास्थ्य बिघडवून टाकितो. शहराच्या घाणेरड्या भागांत प्लेग उत्पन्न होतो व संसर्गानें राजाच्या राजवाड्यांत येऊन पोहोंचतो. गरीब वस्तींत राहणाऱ्या कोष्टयाच्या घरीं जे दोषिक तापाचे जंतू असतात ते शिवण्याच्या दोऱ्याबरोबर श्रीमंताच्या कपड्यांत टांचले जातात, व एखाद्या धनधान्य सरदाराच्या रूपवती कन्येनें मोठ्या समारंभांत घालण्यास विकत घेतलेल्या पैठणींत आपलें घर करूं शकतात; अशा रीतीनें दरिद्र्याच्या घरचा संसर्ग श्रीमंताच्या घरीं येऊन श्रीमानास स्वर्गाची वाट दाखवितो. गरीबाच्या दुर्गंधियुक्त झोंपडींतून निघालेली वाट थेट राजवाड्यापर्यंत येऊन पोंचलेली आहे. ' ईश्वरें मोठें सूत्र केलें । मनुष्यमात्र गुंतोन राहिलें ॥ ' हें ईश्वरानें बांधलेलें सूत्र माणसाच्या शक्तीस तुटणें नाहीं. माणसें नुसतीं परस्परांच्याजवळ आलीं तरी त्यांच्या शरीरांतील परमाणूंचा विनिमय होतो. या मंडपांत व्याख्यान ऐकण्यास तुम्ही बसलां आहां इतक्या अवधींतही परस्परांच्या संसर्गानें एकाच्या शरीरांतील सूक्ष्म जीव दुसऱ्याच्या शरीरांत

जात आहेत. अशा रीतीनें जर रोग पसरूं शकतात—इतका जर माणसा-माणसाचा निकट भाव आहे तर—आपणास बंधुत्वानें राहिलें पाहिजे, असा त्याचा अर्थ होत नाहीं काय ? जोंवर हे निकट संबंध तुटत नाहींत तोंवर प्रेमानें नांदणारे बंधु आपण न होऊं तर एकमेकांच्या उरावर बसून एकाच दुःखाचे वांटेकरी होणारे भाऊबंद तरी आपणास होणें भाग आहे; अन्य मार्ग शक्य नाहीं. प्राचीनकाळच्या मोडलेल्या राज्यांचा इतिहास 'हिंदुस्थाना, सांभाळ,' असा आपणास इशारा देत आहेत. त्याकडे अवधान देऊन जर आपण सर्वात्मभावास मूर्त स्वरूप दिलें व बंधुत्व कृतींत उतरविलें—जर आपण अज्ञांस शहाणें, दरिद्रांस सुखवस्तु व व्याधिग्रस्तांस निरोगी केलें तर हिंद-भूमीचा देवराज आपला प्रसाद देऊन आपल्यास सुखी करील व हिंदुस्थानाचा भावी इतिहास प्राचीन इतिहासापेक्षांही अधिक थोर होईल. दान घेण्यास पुढें केलेले हिंदुस्थानचे हात जर निष्कलंक असतील तर थोड्याच अवकाशांत मोठें भाग्याचें दान त्या हातावर पडावें असा सांप्रतचा योगायोग आहे.

समाप्त.

# होमिओपाथिक चिकित्सासार.

पृष्ठसंख्या सुमारें ४२५. क्राऊन साईज. किं. रु. १।४. सुधारून वाढविलेली नवीन चवथी आवृत्ति. हें पुस्तक अगदीं साध्या, सरळ व सोप्या भाषेंत लिहिलेलें आहे. ह्याच्या साहाय्यानें घरच्याघरीं औषधयोजना करतां येते. इतर औषधोपाय खर्चाचे असल्यानें गरीबीच्या स्थितींत तर होमिओपाथिक उपचार फार फायदेशीर आहेत. या औषधांपासून अपाय होण्याची भीति नाहीं. ज्या ठिकाणीं, डॉक्टर वैद्याची मदत मिळणें शक्य नाहीं अशा ठिकाणीं साधारण शिकलेल्या मनुष्यानें हें पुस्तक व औषधें अवश्य संग्रहीं ठेवावीं. कुटुंबी मनुष्यास याचा फार फायदा होईल. विशेष माहिती खालील पत्त्यावर विचारावी.

आमचेकडे सर्व प्रकारचीं होमिओपाथिक औषधें, पेट्या, पुस्तकें, बाटल्या, बुचें, व डॉक्टर, वैद्य लोकांस लागणारें सामान, औषधी जिन्नस, इंग्रजी ग्रंथ वगैरे स्वस्त भावानें व खात्रीचे मिळतात. क्याटलॉग मागवा.

**एन्. बुलेल आणि कंपनी,**
बुधवार पेठ, पुणें सिटी.

---

# पक्की कल्हई पावडर.

## तांबे-पितळेच्या भांड्यांना १५ वर्षें टिकते.

## भांडीं जर्मनसिल्व्हरपेक्षां उत्तम दिसतात.

**एका पुडींत ७-८ भांडीं होतात.**

एका पुडीस ०—३—० डझन पुड्यांस २—०—० रु.

कल्हई करण्याची माहिती पुडीसोबत.

पत्ताः—एन्. बुलेल आणि कं.,
बुधवार—पुणें.

जगांतील सर्व धर्मांचें विवेचन केलें असलेला अत्युत्तम ग्रंथ.

# * धर्ममीमांसा. *

## पितृमूलक धर्म आणि आध्यात्मिक धर्म.

प्रसिद्ध जर्मन पंडित मोक्षमुल्लर यांच्या "Anthropological Religion" & "Psychological Religion" ह्या प्रख्यात इंग्रजी ग्रंथाचें मराठी भाषांतर. पंडित मोक्षमुल्लर यांच्या आध्यात्मिक व्यासंगाबद्दल सर्व जगाची खात्री झालेलीच आहे. हें पुस्तक किती महत्वाचें आहे हें यांतील खालीं लिहिलेल्या प्रकरणांवरून सहज लक्षांत येईल. भाषांतर प्रसिद्ध महाराष्ट्र लेखक शंकर बाळकृष्ण दीक्षित यांनीं केलेलें असून तें कादंबरीप्रमाणें रसाळ झालेलें आहे. यांतील प्रकरणें:- १. इतर धर्ममतांविषयीं सहिष्णुता. २. ईश्वराच्या अस्तित्वाविषयीं ऐतिहासिक प्रमाणें. ३. धर्ममीमांसेच्या साधनांची विश्वसनीयता. ४. पितृमूलक धर्माचें वास्तविक स्वरूप. ५. आत्मज्ञान. ६. अंत्यसंस्कार. ७. मृताविषयीं समजुती. ८. पितृमूलक धर्ममीमांसा—उपसंहार. ९. धर्माचें ऐतिहासिक विवेचन. १०. धर्मग्रंथांची खरी योग्यता. ११. प्राचीन धर्म आणि तार्किक शास्त्रें यांचा संबंध, आध्यात्मिक धर्माचा भौतिक आणि पितृमूलक धर्माशीं संबंध. १२. मृत्यूनंतर आत्म्याची गति. १३. पारलौकिक विचार. १४. खरें अमरत्व. १५. वेदान्त आणि त्याचे दोन पंथ. १६. मुसलमानी धर्माचें सुफी मत. आध्यात्मिक धर्म-उपसंहार. पृष्ठसंख्या ६००. कागद ग्लेज, बाइंडिंग उत्तम मजबूत असें आहे. किं. २॥ रु. ट. ख. वेगळा.

पत्ता:—म्यानेजर—महाराष्ट्र ग्रंथालय,
बुधवार पेठ, पुणें.

---

☞ हीं पुस्तकें आणि इतर सर्व प्रकारचीं मराठी थिऑसॉफिकल पुस्तकें महाराष्ट्र ग्रंथालय, बुधवार पेठ, पुणें शहर, येथें विकत मिळतील.